टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्रे विद्यांर्तगत राज्यशास्त्र विषयाच्या एम.फिल लघुशोध प्रबंध पदवीसाठी सादर

# 'अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान : विशेष संदर्भ राळेगणसिध्दी,'

(ता. पारनेर जि. अहमदनगर)


**संशोधक**

जितेंद्र आचमारे

PRN- 02214400341

**मार्गदर्शक**

**डॉ. माणिक सोनवणे**

**विभाग प्रमुख राज्यशास्त्र**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**


डिसेंबर २०१५

# प्रतिज्ञापत्र

मी, आचमारे जितेंद्र प्रल्हादराव प्रतिज्ञा पुर्वक प्रमाणित करतो की, ‘‘मा. अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान: विशेष संदर्भ राळेगणसिध्दी,’ ता. पारनेर जि. अहमदनगर.’’ या विषयावरील विद्यानिष्णांत (एम.फिल.) लघुशोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्रातील पदवीसाठी सादर केलेला आहे, हे संशोधन स्वतंत्र व नवे असुन या पुर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

दिनांक:
स्थळ: पुणे

**संशोधक**

**आचमारे जितेंद्र प्रल्हादराव**

PRN- 02214400341

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आचमारे जितेंद्र प्रल्हादराव यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील एम. फिल, पदवीसाठी सादर केलेल्या ‘‘मा. अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान: विशेष संदर्भ राळेगणसिध्दी,’ ता. पारनेर जि. अहमदनगर.’’ या विषयावरील लघुशोध प्रबंधातील माहिती मुळ संदर्भातून संकलित केली असुन योग्य त्या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. हे संशोधन स्वतंत्र व नवे असुन यापुर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

सदर लघुशोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे विद्यापीठाच्या विद्यानिष्णांत (एम.फिल) राज्यशास्त्र पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

दिनांक:

स्थळ: पुणे

**मार्गदर्शक**

डॉ. माणिक सोनवणे

विभाग प्रमुख राज्यशास्त्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.

# ऋणनिर्देश

स्वातंत्र्यानंतर भारतात नि:स्वार्थी आणि सेवाभावी वृत्तीने राष्ट्राच्या नवनिर्माणासाठी ज्या अनेक व्यक्तींचा उदय झाला, त्यांत ज्येष्ठ समाजसेवक 'अण्णा हजारे' यांनी शक्तिशाली भारत निर्मितीसाठी नि:स्वार्थ आणि सेवाभावी वृत्तीने योगदान दिले आहे. त्यावर निश्‍चितच संशोधन व्हावे असा ठाम आत्मविश्‍वास माझ्या मनी निर्माण झाला. कारण एक सामान्य फाटका तुटका कार्यकर्ता ज्याच्याकडे कुठलीही धनदौलत नाही, जो मंदिरातील आठ फुट बाय दहा फुटांच्या खोलीत राहतो आणि ध्येयाने प्रेरित होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर विकासाचे मार्ग कृतीतून स्पष्ट करुन दाखवतो, याची नोंद संशोधनातून व्हावी अशी मनस्वी इच्छा होती. ती इच्छा मी माझे मार्गदर्शक तथा गुरुवर्य डॉ.माणिक दा. सोनवणे सरांकडे व्यक्त केली. सरांनी माझा वैचारिक कल आणि इच्छा जाणून घेऊन मला 'अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान: विशेष संदर्भ राळेगणसिध्द्‌ी या लघु संशोधन प्रकल्पावर मार्गदर्शन करण्यास संमती दर्शवली. त्याच बरोबर त्यांनी मला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे जीवनचरित्र आणि कृतिकार्यावरील वेगवेगळया ग्रंथांच्या अध्ययनाचा मार्गदर्शनपर सल्ला देऊन संशोधनास वेळोवेळी प्रोत्साहन दिले. ते सातत्याने घडविणारे डॉ.माणिक सोनवणे सरांचे मार्गदर्शन संशोधनास उपयुक्त ठरले. त्यांच्या मार्गदर्शना मुळेच माझे हे संशोधन कार्य पुर्णत्वास गेले. हे विशेषत्वाने या ठिकाणी मी नोंदवितो. याबद्‌दल मी माझे मार्गदर्शक तथा गुरुवर्य डॉ.माणिक सोनवणे सरांचे शाब्दिक आभार व्यक्त न करता त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो. त्यांच्याप्रती असणारी कृतज्ञता मी विनम्रतापूर्वक व्यक्त करतो.

स्वामी विवेकानंदांच्या विचारातून समाजसेवेची प्रेरणा घेऊन गांधीवादी मार्गांनी समाजाला विकासाच्या वाटेवर नेणारे, सामाजिक आणि राजकीय कार्यातून तळागाळातल्या माणसाला सोबत घेऊन, भ्रष्टाचारमुक्त भव्य भारताचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी आत्मक्लेशातून **हृ**दयपरिवर्तन आणि **हृ**दयपरिवर्तनातून उन्नती घडवून आणणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे

यांनी केलेल्या ग्रामीण विकासात्मक कार्यावर संशोधन करण्यास मला मुखसंमती दिली आणि सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांच्याही ऋणात राहणे पसंत करीन. तसेच भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे कर्मचारी श्री. अमोल झेंडे व त्यांचे सर्व सहकारी यांनी देखील मला वेळोवेळी संशोधनासाठी आवश्यक साहित्य पुरविले, तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या एकुण सर्वांगीण कार्याबद्दल माहिती पुरविली त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

संशोधनासाठी मला प्रेरणा देणारे व ते पुर्ण करण्यासाठी मला सदैव जाणीव करुन देणारे डॉ.मंगला सोनवणे, दत्ता बहिरट काका व मला माझ्या संशोधनकार्यात वेळोवेळी मदत करणारे तसेच ग्रंथालयातील बेलसरे मॅडम भाग्यश्री शिंदे यांचेही ऋण मी शब्दरुपाने व्यक्त करतो.

ज्यांची मैत्री मला शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरली व जे बालपणापासून आजपर्यंत सदैव माझ्या सुख:दु:खात सहभागी होतात, ते माझे वर्गमित्र प्रा.बालाजी पांचाळ, डॉ.प्रमोद अच्चेगावे, यांच्याबद्दलची माझी मैत्रभावना आणि त्यांच्या प्रती असणारा माझा स्नेहभाव मला त्यांचे माझ्यावरील ऋण व्यक्त केल्याशिवाय शांत बसू देत नाही.

अपार कष्ट करुन आणि दु:ख सोसुन आम्हा भावंडांना कष्टापासून आणि दु:खापासून दुर ठेवण्यासाठी सदैव धडपडणारे, आपल्या जगण्यातून सर्व कुटुंबीयांना आत्मसन्मान व मुल्यदृष्टी देणारे, मला शिक्षणासाठी नियिमित प्रेरणा देणारे माझे वडील प्रल्हादराव आचमारे, तसेच माझ्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटातून माझी मुक्तता व्हावी यासाठी देवाकडे साकडे घालणारी तसेच संकटकाळी खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहून मला धैर्य देणारी, माझ्या प्रत्येक शुभकार्यात मला प्रेरणा देणारी माझी आई सौ. कमल आचमारे या दोघांच्या आशिर्वादामुळेच माझे संशोधनकार्य पुर्णत्वास गेले त्यामुळे मी माझी आई आणि वडील यांचा आजन्म ऋणी आहे. तसेच धाकटे बंधु संजय आचमारे, बहिण सौ. रेखा दंडवे व भावजी गणेश दंडवे, धाकटी बहिण रेणुका व भावजी श्रीनिवास हिंगमीरे यांनी वेळोवेळी संशोधन काळात माझे मनोबल

उंचावले. त्याचबरोबर यांनी माझ्या संशोधन कार्यात कुठलाही व्यत्यय येऊ दिला नाही, त्यामुळे या सर्व माझ्या कुटुंबीयांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. कमी वेळेत सुबक टंकलेखन करुन देणारे आमचे मित्र श्री.शाम खाकरे, तसेच प्रबंध लेखनाचे सुयोग्य मुद्रितशोधन करणारे मित्र यांचेही आभार या ठिकाणी मी व्यक्त करतो. याशिवाय अनेकांचे सहकार्य मला या संशोधन कार्यासाठी मिळाले, त्यांचा नामोल्लेख करणे आवश्यक असतानाही जागेच्या मर्यादेमुळे ते शक्य नाही त्या सर्वांचेसुध्दा मी मनापासून आभार व्यक्त करतो.

दिनांक:

स्थळ: पुणे

संशोधक

आचमारे जितेंद्र प्रल्हादराव

# तक्तासूची


| तक्ता क्र. | तक्त्याचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १.१ | नमुना निवडीचा आकृतीबंध | १३ |
| ४.१ | वयोगट | ८७ |
| ४.२ | शैक्षणिक माहिती | ८८ |
| ४.३ | कौटुंबिक वर्गीकरण | ८९ |
| ४.४ | व्यावसायिक वर्गीकरण | ९० |
| ४.५ | जातनिहाय वर्गीकरण | ९२ |
| ४.६ | राळेगणसिध्दीतील झालेल्या ग्रामविकासाशी ग्रामस्थांची सहमती | ९४ |
| ४.७ | ग्रामसभेची वारंवरिता | ९५ |
| ४.८ | ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती | ९७ |
| ४.९ | ग्रामसभेतील विषय | ९८ |
| ४.१० | ग्रामविकासात तरुणांचा सहभाग | १०५ |
| ४.११ | जलसिंचन साधनांचे वर्गीकरण | १०७ |
| ४.१२ | चऱ्हाईबंदी | १०८ |
| ४.१३ | कुऱ्हाडबंदी | ११० |
| ४.१४ | नसबंदी | १११ |
| ४.१५ | नशाबंदी | ११२ |
| ४.१६ | श्रमदान कार्यक्रमाचे वर्गीकरण | ११४ |
| ४.१७ | आजारांची माहिती | ११५ |
| ४.१८ | औषधांची माहिती | ११६ |

# आलेखसूची


| आ.क्र. | आलेख शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| ४.१ | वयोगट | ८७ |
| ४.२ | शैक्षणिक माहिती | ८८ |
| ४.३ | कौटुंबिक वर्गीकरण | ८९ |
| ४.४ | व्यावसायिक वर्गीकरण | ९१ |
| ४.५ | जातनिहाय वर्गीकरण | ९२ |
| ४.६ | राळेगणसिध्दीतील झालेल्या ग्रामविकासाशी ग्रामस्थांची सहमती | ९४ |
| ४.७ | ग्रामसभेची वारंवरिता | ९५ |
| ४.८ | ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती | ९७ |
| ४.९ | ग्रामसभेतील विषय चर्चा होणारे घटक | ९९ |
| ४.१० | ग्रामविकासात तरुणांचा सहभाग | १०५ |
| ४.११ | जलसिंचन साधनांचे वर्गीकरण | १०७ |
| ४.१२ | चऱ्हाईबंदी | १०८ |
| ४.१३ | कुऱ्हाडबंदी | ११० |
| ४.१४ | नसबंदी | १११ |
| ४.१५ | नशाबंदी | ११२ |
| ४.१६ | श्रमदान | ११४ |
| ४.१७ | आजारांची माहिती | ११५ |
| ४.१८ | औषधांची माहिती | ११७ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृ. क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | प्रस्तावना आणि संशोधन पध्द्ती | १—१७ |
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | संशोधन विषयाचे महत्व | ८ |
| १.३ | संशोधन विषयाची निवड | ९ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टये | ९ |
| १.५ | संशोधनाची गृहीतके | १० |
| १.६ | तथ्य संकलनाची साधने | १० |
| १.६.१ | प्राथमिक स्त्रोत | ११ |
| १.६.२ | दुय्यम स्त्रोत | ११ |
| १.७ | नमुना निवड | १२ |
| १.७.१ | सांख्यिकीय विश्लेषण | १३ |
| १.८ | संशोधनाची व्याप्ती | १३ |
| १.९ | संशोधनाची मर्यादा | १४ |
| १.१० | प्रबंध प्रकरण रचना | १४ |
| १.११ | सारांश | १६ |
| प्रकरण दुसरे | संदर्भ साहित्याचा आढावा | २०—४० |
| २.१ | प्रस्तावना | २१ |
| २.२ | पीएच.डी प्रबंध | २२ |
| २.३ | एम.फील लघुशोध प्रबंध | २४ |
| २.४ | एम.एड लघुशोध प्रबंध | २५ |
| २.५ | संबधित साहित्याचा अभ्यास | २५ |
| २.५.१ | पुस्तके | २५ |
| २.५.२ | मासिके | ३१ |

| | | |
|---|---|---|
| २.५.३ | वर्तमानपत्रे | ३२ |
| २.५.४ | संशोधन पेपर | ३६ |
| २.६ | पुर्नसंशोधनाची आवश्यकता | ३६ |
| २.७ | सारांश | ३७ |
| प्रकरण तिसरे | अण्णांचे जीवन आणि राळेगणसिध्दीच्या विकासातील योगदान | ४१—८३ |
| ३.१ | प्रस्तावना | ४२ |
| ३.२ | विकासाची व्याख्या | ४३ |
| ३.३ | ग्रामीण विकास | ४३ |
| | • ग्रामीण विकासाची व्याख्या | ४४ |
| | • ग्रामीण विकासाची संकल्पना | ४४ |
| | • ग्रामीण विकासाची संकल्पनेचा विकास | ४८ |
| | • ग्रामीण विकासाची व्याप्ती | ५० |
| | • ग्रामीण विकाससंबंधी दृष्टीकोन | ५१ |
| ३.४ | ग्रामविकासाची प्रारूपे | ५३ |
| | १.गांधी प्रारूप | ५३ |
| | २.नेहरू प्रारूप | ५७ |
| | ३.अण्णा हजारेंचे प्रारूप | ५९ |
| ३.५ | मा. अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्दी ग्रामीण विकासातील योगदान | ६३ |
| | अ) भौगोलिक क्षेत्राचा सदउपयोग | ६३ |
| | ब) वृक्ष मानवी जीवनाचा आधार | ६६ |
| | क) राळेगणसिध्दीचा ग्रामपरिवर्तन दिन | ६८ |
| | ड) ग्रामसभेला अधिकार | ७१ |
| | इ) अण्णांचे राळेगणसिध्दी विषयी महत्वकांक्षा एक दृष्टीक्षेप व अण्णांचे जीवन | ७५ |

| | | |
|---|---|---|
| | ई) अण्णांच्या दृष्टीकोनातून ग्रामीण विकासातील समस्या | ७९ |
| प्रकरण चौथे | महिती व राळेगणसिध्दीच्या वस्तुस्थितीचे विश्लेषण | ८४—१२१ |
| ४.१ | प्रस्तावना | ८६ |
| ४.२ | माहितीचे विश्लेषण | ८६ |
| ४.२.१ | वयोगट | ८६ |
| ४.२.२ | शैक्षणिक माहिती | ८८ |
| ४.२.३ | कौटुंबिक वर्गीकरण | ८९ |
| ४.२.४ | व्यावसायिक वर्गीकरण | ९० |
| ४.२.५ | जातनिहाय वर्गीकरण | ९१ |
| ४.३ | ग्रामविकासाशी संबंधित माहितीचे वर्गीकरण. | ९३ |
| ४.३.१ | राळेगणसिध्दीच्या ग्रामविकासासंबंधी ग्रामस्थांची मते | ९३ |
| ४.३.२ | ग्रामसभेची वारंवरिता | ९५ |
| ४.३.३ | ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती | ९६ |
| ४.३.४ | ग्रामसभेतील विषय | ९८ |
| ४.३.५ | ग्रामपरिवर्तन दिन | १०० |
| ४.३.६ | राळेगणसिध्दीतील सण व उत्सव यांचे विश्लेषण | १०१ |
| ४.३.७ | राळेगणसिध्दीचे वेगळेपण | १०२ |
| ४.३.८ | राळेगणसिध्दीच्या विकासात तरूणांचा सहभाग | १०४ |
| ४.३.९ | जलसिंचनाची साधने | १०६ |
| ४.४ | पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण | १०८ |
| ४.४.१ | चऱ्हाईबंदी | १०८ |
| ४.४.२ | कुऱ्हाडबंदी | १०९ |
| ४.४.३ | नसबंदी | १११ |
| ४.४.४ | नशाबंदी | ११२ |
| ४.४.५ | श्रमदान | ११३ |

| | | |
|---|---|---|
| ४.५ | राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती | ११५ |
| ४.५.१ | आजारांची माहिती | ११५ |
| ४.५.२ | औषधांची माहिती | ११६ |
| ४.६ | शासकिय अधिकाऱ्यांची विकासाबाबत मते | ११७ |
| ४.७ | राळेगणसिध्दीतील नविन प्रकल्प | ११९ |
| ४.८ | राळेगणसिध्दीतील समस्या | ११९ |
| ४.९ | सारांश | १२० |
| प्रकरण पाचवे | सारांश निष्कर्ष आणि उपाययोजना | १२२—१४२ |
| ५.१ | प्रस्तावना | १२३ |
| ५.२ | प्रकरणांचा सारांश | १२४ |
| ५.३ | निष्कर्ष | १२८ |
| ५.४ | उपाययोजना | १३८ |
| ५.५ | नवीन संशोधनाची दिशा | १३८ |

# परिशिष्टे


| अ.क्र. | | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | समंती अर्ज व प्रश्नावली | १४३ |
| २ | राळेगणमधील विकास कामांचा तक्ता | १४९ |
| ३ | अण्णा हजारे यांच्या राळेगणसिध्दीतील ग्रामविकास | १५० |
| ४ | राळेगणसिध्दीचा नकाशा | १५९ |
| ५ | राळेगणसिध्दी गावाचे फोटो | १६० |
| ६ | यादवबाबांचे दर्शन घेताना अण्णा हजारे | १६१ |
| ७ | ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना अण्णा व गावातील उत्सवाचे फोटो | १६२ |
| ८ | ग्रामस्थांची मुलाखत घेताना संशोधक | १६४ |
| ९ | तलाठी दाखला | १६५ |
| १० | ग्रामपंचायतने दिलेले सुभेच्छा पत्र | १६६ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना आणि संशोधन पध्दती


१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाचे महत्व

१.३ संशोधन विषयाची निवड

१.४ संशोधनाची उद्दिष्टये

१.५ संशोधनाची गृहीतके

१.६ तथ्य संकलनाची साधने

१.६.१ प्राथमिक स्त्रोत

१.६.२ दुय्यम स्त्रोत

१.७ नमुना निवड

१.७.१ सांख्यिकिय विश्लेषण

१.८ संशोधनाची व्याप्ती

१.९ संशोधनाची मर्यादा

१.१० प्रबंध प्रकरण रचना

१.११ सारांश

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना:

भारत हा खेडयांचा देश आहे. ग्रामविकास हाच राष्ट्र विकासाचा पाया आहे परंतु स्वातंत्र्या नतंर आजपर्यंत म्हणजेच ६५ वर्षात खेडयांचा उध्दार झाला नाही. ग्रामीण भागात आजही बरेच लोक दारिद्रय रेषेखालचे जीवन जगत आहेत. दुर्गम भागातील खेडयात मोठी भयावत अवस्था आहे. अन्न, वस्त्र, निवारा मिळवण्यातच गरिबांचे जीवन खर्ची पडत आहे. सामाजीक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकास खूपच कमी झाला आहे. जगण्यासाठी लागणारी किमान साधनेही त्यांना मिळत नाहीत. देशाच्या अर्थसंकल्पातील ग्रामविकासाच्या योजना तळागाळातील खेड्यापर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे ग्रामविकासात अडथळे येतात. खेड्यापाडयात आज अनेक प्रश्न आहेत. स्वच्छता परिवार नियोजन सेंद्रिय खतांचा वापर, ग्राम उद्योग, पिण्याचे पाणी, गटारव्यवस्था बायो व गोबर गॅस सारखी पर्यायी इंधन योजना शिक्षण, सुधारित शेती, ग्राम आरोग्य अशा अनेक घटकांचा ग्रामविकासासाठी विकास होणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने सन १९९३ मध्ये ग्रामीण भागातील लोंकाच्या विकासाकरिता पंचायतराज समस्या संदर्भात ७३ वी घटनादुरुस्ती करुन स्थानिक स्वराज संस्था ग्रामपंचायत, ग्रामसभा व महिलांना पंचायतराज संस्थात ३३ टक्के आरक्षण, महिला सबलीकरणास प्राधान्य देऊन ग्रामसभा ही गाव विकासास बांधील राहिल म्हणून घटनात्मक अधिकार प्रदान केला आहे.

म. गांधी यांच्या स्वावलंबी आदर्श गावाच्या संकल्पनेनुसार प्रथम खेडयांचा विकास होणे गरजेचे होते. ग्रामीण विकासाचे प्रथम खेडयांचा विकास होणे राहिल्यामुळे लोकांचे रोजगार व पोटासाठी शहराकडे मोठया

प्रमाणात स्थलांतर झाले आहेत. आज शहरे समुद्राला आलेल्या भरती सारखी आडवी तिडवी फुगत आहेत. झोपडयामध्ये बेसुमार वाढ होत आहे. त्यामुळे गुन्हेगारी सारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या शहरे वाढल्यामुळे मानवतेचे आणि पेट्रोल, रॉकेल, डिझेल यासारख्या निसर्गाच्या साधनसंपत्तीचे शोषण वाढले आहे. त्यामुळे पर्यावरणीय समतोल ढासळत जावून हवा, जमिन, पाणी दुषित होत चालले आहेत. त्यामुळे एका देशातील पर्यावरणीय धोके दुस–या देशालाही घातक ठरत चालले आहे.

विविध राज्यात आणि देशात पंचवार्षिक योजना खेड्यांच्या विकासाचा थोडा फार प्रयत्न चालू आहे. पण त्याचे नियोजनही मुंबई दिल्ली सारख्या शहरातून होते. गल्ली बदलल्याशिवाय दिल्ली बदलू शकणार नाही तसेच लोक सहभाग शिवाय कोणतीही योजना यशस्वी होणार नाही हे सुध्दा तितकेच महत्वाचे आहे.

ग्रामविकासाची व्याख्याही संकुचित होत गेली आहे. ग्रामपंचायत किंवा सोसायटीची इमारत, आर.सी.सी.ची बांधणी रस्ते करणे नळ योजना आणणे म्हणजे विकास. ग्रामविकासाची अशी संकुचित व्याख्या केली गेली तथापि महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना फक्त उंच उंच इमारती उभ्या करणे एवढीच मर्यादित नव्हती तर ज्या माणसांच्या साठी हे सगळे करायचे आहे ती माणसंच उभी झाली नाहीत तर उंच इमारती म्हणजे केवळ प्रदर्शन होईल. स्वत:चा विचार करत असतानाच आपण या समाजाच काही देण लागतो ही सामाजिक बांधीलकीची जाणीव माणसांमध्ये निर्माण होत नसेल तर समाज आणि देशाला उज्वल भविष्य कसे मिळणार? असा विचार ग्रामविकास कार्यात होणे आवश्यक आहे.

सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होणारा माणुस उभा करण्याचे काम अनुदानातून किंवा योजनेच्या आधाराने फक्त पैशाने

होणार नाही. त्यासाठी नेतृत्व महत्वाचे आहे. आज ग्रामविकास योजनेमध्ये नेतृत्व निर्मितीचा विचार फार कमी आहे. भ्रष्टाचारामुळे लोकशाहीच्या आणि कायदेयंत्रणेचा –हास होतो. मानवी हक्कांचा भंग होता, बाजारपेठा विस्कळीत होतात. जीवनाचा दर्जा खालावतो. सामुहिक गुन्हेगारीला भ्रष्टाचार खतपाणी घालतो. दहशतवाद आणि मानवी सुरक्षिततेला धोका निर्माण करणा—या अनेक बाबींना यातून उत्तेजन मिळते. भ्रष्टाचार हे आर्थिक अक्षमतेचे एक प्रमुख कारण आहे. तसेच दारिद्रय निर्मुलन आणि विकास यांच्या मार्गातीलही तो मोठा अडथळा आहे.

पुर्वी आपआपल्या कुवतीप्रमाणे गावच्या विकासासाठी घराघरातून बैलगाडया, महिला, पुरुष श्रमदानासाठी येत असत. मंदिर, समाजमंदिर रस्त्याचे काम अथवा शाळेचे काम आपले काम समजून सर्वाचे हात त्या कामाला लागत असत. त्यामुळे गाव हेच कुटुंब अशी भावना निर्माण होत असे. १९६२ मध्ये पंचायतराज व्यवस्था आली. मात्र अनुदान संस्कृती सुरु झाली आणि गावातील हे चैतन्य हळुहळू निघून गेले पुर्वी जी स्वाभिमानाने जीवन जगण्याची सवय होत गेली ती जाऊन अनुदान कर्जमाफीसाठी हात पसरण्याची लाचारीची सवय निर्माण झाली. कर्तव्याची जाणीव कमी होवून फक्त हक्कांची जाणीव वाढत गेली. त्यामुळे जे काही काही विकासाचे काम करायचे ते सर्व सरकारनेच करावे. अशी लोकांची धारणा झाली आणि सरकार कुणी वेगळे आहे आणि आम्ही कुणी वेगळे आहोत अशी लोकांची समजूत झाली. समाजातील लोक व सरकार मधील विचाराची दरी निर्माण झाली असतानाही समाजातील समाजसूधारकांचे कार्य उल्लेखनीय आहे त्यामध्ये पुढील प्रमाणे वेगवेगळया स्वरुपाचे कार्य दिसून येते.

पोपटराव पवारांची ख्याती अहमदनगर जिल्हा पारनेर तालूक्यातील आदर्श गाव हिवरेबाजारचे सरपंच म्हणून ओळख आहे,

यांनी गावातील पाणी व माती संरक्षण व जतन करण्यासाठी आणि पिक उत्पादन वाढविण्यासाठी ठिंबक सिंचन योजना राबविली. गावामध्ये स्वच्छता गृह, सिमेंट रस्ते, दिवाबत्ती, पिण्यासाठी पाणी आणि ग्रामसभेमध्ये स्त्री—पुरुषांना समान दर्जा देऊन गावचा सर्वांगिण विकास साधला आहे. पोपटराव हे अण्णा हजारेंचे अनुयायी आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेवून स्वताच्या गावाचा शासकिय योजनाचा लाभ घेवून विकास साधला आहे. हिवरेबाजारची ओळख आज जगाच्या कानाकोपऱ्यात पसरली आहे.

श्री.मुरलीधर देवीदास आमटे उर्फ बाबा आमटे (इ.स.२६डिसेंबर १९२४—९फेब्रुवारी२००८) हे एक मराठी समाजसेवक होते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा जिल्हयातील हिंगणघाट येथील ब्राम्हण जमीनदार कुटुंबात झाला. त्यांनी कुष्ठरोग्यांच्या शुश्रुषेसाठी चंद्रपूर महाराष्ट्र येथे आनंदवन नावाचा आश्रम सुरु केला. तत्कालीन समाजात कुष्ठरोग हे मागील जन्माच्या पापांचे फळ समजले जाई. यामुळे कुष्ठरोग्यास वाळीत टाकले जाई. इ.स. ९फेब्रुवारी २००८ रोजी वरोरा येथील निवासस्थानी रक्ताच्या कर्करोगाने त्यांचे निधन झाले. आज बाबांच्या पुढच्या पिढयाही विविध प्रकल्पाच्या माध्यमातून तेवढयाच निष्ठेने व सातत्याने काम करत आहेत. इ.स. १९४९ सालामध्ये त्यांनी महारोगी सेवा समितीची स्थापना केली. याशिवाय बाबा आमठेनी कुष्ठरोग्यांसाठी खालील संस्था स्थापल्या :

आनंदवन—वरोरा, सोमनाथप्रकल्प—मूल, अशोकवन—नागपूर, लोकबिरादरी प्रकल्प—नागेपल्ली, लोकबिरादरी प्रकल्प—हेमलकसा.

बाबांनी आनंदवनाच्या मुळच्या खडकाळ जमीनीत शेतीविषयक विविध प्रयोग केले. ते राष्ट्रीय एकात्मतेचे कट्टर पुरस्कर्ते होते. इ.स. १९८५साली शंभर दिवसाच्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. मेधा पाटकर यांच्या सोबत ते नर्मदा बचाव आंदोलनातही सक्रिय

होते. सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात त्यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांचे पुत्र प्रकाश आमटे व विकास आमटे, त्यांच्या सुना व नातू बाबांनी आरंभलेले कार्य पुढे नेत आहेत. 'कुष्ठरोग्याचे आयुष्य हे मरणापेक्षा भयाण आणि कबरीपेक्षा भयंकर असते. शुश्रुषाच करायची नव्हे, तर त्याला आत्मनिर्भर करण्याची अखंड तपस्या बाबांनी केली.'

भामरागड तालुक्यातील आदिवासीच्या विकासासाठी 'हेमलकसा' येथे बाबांनी लोकबिरादरी प्रकल्प सुरु केला. गेल्या ३५ वर्षापासून या प्रकल्पाची जबाबदारी बाबांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे व स्नुषा डॉ. मंदा आमटे समर्थपणे सांभाळत आहेत. या प्रकल्पाअंतर्गत आदिवासींना माहित नसलेल्या शेतीच्या नवीन पध्दती शिकवल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांसाठी शाळा, जेष्ठ नागरिकांसाठी उतरायण ही निवासी संस्था, वन्यप्राण्यांच्या रक्षणासाठी अनाथालय असे विविध उपक्रमही हेमलकसा येथे यशस्वीपणे चालू आहेत. डॉ. प्रकाश व डॉ. मंदा, आदिवासीना अथकपणे आरोग्य सुविधा पुरवीत आहेत. हे कार्य बाबांच्या प्रेरणेतूनच सुरु आहे. बाबा आमटेंच्या पत्नी साधनाताईनी लिहिलेल्या 'समिधा' या आत्मचरित्रपर पुस्तकातून साधनाताईच्या संयमी, त्यागी व बाबांच्या कार्यासह त्यांना सांभाळणाऱ्या समर्थ व्यक्तिमत्वाचा परिचय आपल्याला होतो.

अभय बंग हे ठाकुरदास आणि सुमनबंग यांचे पुत्र आहेत. ते दोघेही गांधीवादी कार्यकर्ते होते. गडचिरोली जिल्हयांच्या कुपोषणावर व नवजात अर्भकाच्या मृत्युवर डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी लिहिलेल्या 'कोवळी पानगळ' हा शोधप्रबंध खुप गाजला होता. हा शोधप्रबंध 'लॅन्सेट' या मानाच्या वैदयकिय मासिकात प्रसिध्द झाला होता. 'गांधीजी, लोक, आणि विज्ञान' या अभय बंगाच्या तीन महत्वाच्या प्रेरणा आहेत. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील शिक्षक कार्ल टेलर यांचाही अभय बंगावर प्रभाव आहे. रोजगार हमी योजनेतील किमान मजूरीचा दरमागाचा

शास्त्रीय अभ्यास केल्यावर तो दर ४ रुपये नसून १२ रुपये आहे असा निष्कर्ष अभय बंगानी मांडला आणि तो इतका मुद्‌देसूद होता की सरकारला तो मान्य करावा लागला. अशा प्रकारचे संशोधन करण्यासाठी अभय बंग प्रसिध्द आहेत. अभय बंग यांनी ब्रेथ काउंटर नावाच्या उपकरणाचा शोध लावला.

अण्णाच्या कार्याचाही इतर समाजसेवकां प्रमाणे राळेगणसिध्दीचा कायापालट करण्यात खुप मोठे योगदान दिसून येते, अण्णांनी स्वत:च्या गावाचा सर्वांगीण विकास करत असताना समाजातील इतर लोकांसाठी सुध्दा बरेच कार्य केले आहे, उदा. माहितीचा अधिकार, यासारख्या कायदयामुळे भ्रष्टाचारास मुळातच आळा घालण्यास मदत झाली आहे. तसेच दप्तर दिरंगाई, सर्वांसाठी राशन, गरिबांना न्याय, शेतकऱ्यांना दिलासा, सामान्य जनतेला स्वत:ची जाणीव तसेच सरकारला जबाबदारीची जाणीव करून देण्यात आणि जनतेचे सेवक असल्याची जाणीव राजकारण्यांना करून देवून राळेगणसिध्दीचे नाव जगाच्या नकाशावर ठसा उमठवण्याचे कार्य व लोकांनी अण्णांना दिलेली प्रती गांधी हि पदवी सर्व भारतीयांसाठी गौरवास्पद आहे. राळेगणशिंध्दी ते राळेगणसिध्दीचा प्रवास तो सूध्दा गांधीवादी विचाराने साकार करताना तेथील लोकांच्या जीवनावर अण्णांचा झालेला प्रभाव जाणून घेणे व अशा प्रकारे समाजातील सर्व समाज सेवकांकडून केलेल्या विकासाचा अढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. त्यासाठी पुढील पाच प्रकरणामध्ये शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करून मांडणी करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचे महत्व, विषयाची निवड, संशोधनाची उद्‌दिष्टये, गृहितके, संशोधनाची पध्दती, नमुना निवडीची पध्दती, नमुना निवडीचा आकृतीबंध, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, प्रबंध प्रकरण रचना यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## १.२ संशोधन विषयाचे महत्व:

- प्रस्तुत संशोधनाचे महत्व पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल.
- प्रस्तुत संशोधनामुळे अण्णा हजारे यांनी केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचे विशेष महत्व समजेल.
- प्रस्तुत संशोधनात अण्णा हजारे यांनी ग्रामपातळीवर विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचा परिचय समजण्याकरिता सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल.
- प्रस्तुत संशोधनात अण्णा हजारे यांनी प्रत्यक्ष कृतीत आणलेल्या विविध आदर्श योजनांचा अभ्यास करण्याकरिता मार्गदर्शक ठरेल.
- राळेगणसिद्धी गावात अण्णा हजारे यांनी स्थापन केलेल्या नापासांच्या शाळेतील नापास विद्यार्थ्यांच्या बदलांचा अभ्यास करण्याकरिता उपयुक्त ठरेल.
- अण्णा हजारे यांनी केलेल्या सामाजिक आणि ग्रामसुधारणा कार्यामागे मुख्य प्रेरणा काय होती हे समजून घेता येईल.

वरील सर्व मुद्याआधारे प्रस्तुत संशोधनातून अशा विविध बाजू समोर आणल्या जातील त्यांना सामाजिक व ग्रामसुधारणा योगदानाच्या विविध पैलूवर काम केल्या त्यामुळेच हे संशोधन संशोधकास अधिक महत्वाचे वाटले.

## १.३ संशोधन विषयाची निवड:

संशोधन विषयाची निवड करणे ही सामाजिक संशोधनाची अतिशय कठीण पायरी आहे. संशोधनाचा विषय जर काळजीपूर्वक निवडला तर संशोधन कार्यात अडचणी निर्माण होत नाहीत, म्हणून विषय निवडत असताना संशोधकाने सर्व प्रकारची सावधानता बाळगली पाहिजे. त्या संदर्भात ऑगबर्न यांनी संशोधकांना इशारा दिला की, ''संशोधकाने संशोधन कार्यासाठी अशा विषयाची निवड कधीही करू नये की ज्या संदर्भात प्रमाणसिध्द तथ्ये उपलब्ध नाहीत आणि जे विषय

पध्द्तीशास्त्राच्या दृष्टीने अतिशय कठीण आहेत.'' विषय निवडण्याच्या संदर्भात संशोधकाची थोडीशी चुक झाली तरी संशोधक आपले संशोधन योग्य पध्दतीने करू शकत नाही. या संदर्भात नॉर्थ रोप यांच्या मते, ''अशा संशोधकाची अवस्था दिशा चुकल्यामुळे भरकटत असलेल्या जहाजासारखी होते.'' म्हणून संशोधकाचे क्षेत्र मर्यादित असले पाहिजे व विषय निवडताना संशोधकाने काळजीपूर्वक निवडला पाहिजे.

अण्णांनी राळेगणसिध्द्ीची झालेली विदीर्ण अवस्था पाहून त्याच्या उध्दाराचा, विकासाचा ध्यास घेत एक पाऊल टाकले पण तेच पाऊल देशातील समस्त समाजाला एक नवी दिशा, नवा विचार देणारे पाऊल ठरले. गावातील श्रमदान, व्यसनमुक्तिपासून ते सरकारला जनहिताचे कायदे करायला भाग पाडणारं हे व्यक्तिमत्व नक्कीच सामान्य नाही. अण्णांनी अवघ्या ५ वर्षात राळेगणसिध्दीत विकास कामाची गंगा अवतीर्ण केली. समाज विकासाचा ध्यास घेतला की यश निश्चित मिळतं हेच अण्णांनी दाखवुन दिले. त्यांच्या या विकास कार्याचा आढावा घेण्यासाठी तसेच संबंधित विषयावर कोणत्याही संशोधकाद्वारे किंवा संस्थेद्वारे संशोधन झालेले नाही असे आढळून आल्यामुळे संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिदष्टये:

१. अण्णा हजारेंनी राळेगणसिध्दीच्या विकासासाठी अनुसरलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

२. ग्रामविकासात अंगिकारलेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

३. ग्रामीण विकासावर कार्यात लोकसहभागाचा आढावा घेणे.

४. राळेगणसिध्दीमध्ये झालेल्या बदलाचा आढावा घेणे.

५. निर्णय प्रक्रियेत गावातील स्त्री—पुरुषांच्या सहभागाचा आढावा घेणे.

## १.५ संशोधनाची गृहीतके:

सामाजिक संशोधनामध्ये गृहितकांना महत्वाचे स्थान आहे. संशोधनाच्या विषयाचे निर्धारण केल्यानंतर त्या विषयाच्या संदर्भात काही अनुमान किंवा संभाव्य उत्तरे काढली जातात. याचाच अर्थ संशोधन विषयाच्या संदर्भात काही संभाव्य उत्तरे किंवा अनुमानामुळे संशोधक आपले लक्ष काही निश्चित व आवश्यक तथ्यांवरच केंद्रीत करतो. त्यामुळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. या संभाव्य उत्तरांना किंवा अनुमानासच गृहितकृत्य किंवा सिध्दांत कल्पना असे म्हणतात.

**गुड आणि हॅट** : ''गृहितकृत्य म्हणजे असे विधान आहे की, ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परिक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते.''

- **संशोधनाची गृहितके**:

१. राळेगणसिध्दीच्या पंचक्रोशीतील ग्रामीण समाजाला दिशा देण्याचे काम अण्णा हजारेंनी केले आहे.

२. राळेगणसिध्दीच्या गावकऱ्यांनी अण्णा हजारेंच्या विचार व जीवनपद्धतीचा अंगिकार करुन आपली प्रगती साधली आहे.

३. अण्णांची कार्यपध्दती आणि जीवनपध्दतीवर गांधीवादी विचारांचा प्रभाव आहे.

४. राळेगणसिध्दीच्या ग्रामस्थांच्या जीवनावर अण्णा हजारेंच्या विचारांचा गाढा प्रभाव आहे.

## १.६ तथ्य संकलनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोत या साधनांचा वापर करून माहिती व आकडेवारी संकलित करण्यात आली आहे.

### १.६.१ प्राथमिक स्त्रोत:

१. **निरिक्षण:**

संशोधक ग्रामीण भागातील असल्याने ग्रामीण भागातील परिस्थितीशी परिचित आहे. ग्रामीण भागाशी प्रत्यक्ष संबंध येत असल्याने ग्रामीण व्यवस्थेशीसंबंधीत निरिक्षण करून अभ्यास करण्यात आला आहे.

२. **मुलाखत:**

संशोधन विषयाशी संबंधीत माहिती मिळविण्याच्या अनुषंगाने मुलाखतीच्या सहाय्याने माहिती संकलित करण्यात आली आहे. निवडलेल्या ग्रामस्थ, अधिकाऱ्यांकडून मुलाखतीच्या सहाय्याने माहिती मिळविण्यात आली.

३. **प्रश्नावली:**

सदर अध्ययनासाठी निवडलेल्या 'अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान: विशेष संदर्भ राळेगणसिध्दी' या शिवाय अभ्यास करण्यासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्रामस्थांकडून माहिती संकलित करण्यात आली आहे. एकुण लोकसंख्येच्या ५ टक्के प्रमाणे ११० प्रश्नावली ग्रामस्थ व प्रशासकिय अधिकारी यांच्याकडून भरून घेण्यात आली आहे.

### १.६.२ दुय्यम स्त्रोत:

प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त अशा सर्व प्रकारची लिखित स्वरूपाची माहिती व आकडेवारी द्वितीय स्त्रोताच्या सहाय्याने संकलित केली आहे. त्यामध्ये विविध शासकीय अहवाल, परिपत्रके, शोधप्रबंध, लघुशोधप्रबंध, विविध पुस्तके, विविध मासिके, दैनिक वर्तमानपत्रातून छापून येणारी माहिती, कार्यालयीन दफ्तर, इ. माहिती संकलित केली आहे.

## १.७ नमुना निवड:

गुड आणि हॅटच्या मते, नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे. तसेच बोगार्डसच्या मते, एका पुर्व निर्धारीत योजनेनुसार एककांच्या एका समुहामधुन एक निश्चीत प्रतिशत निवडणे म्हणजे नमुना निवड होय. प्रस्तुत अभ्यासाच्या अर्थपूर्ण माडंणीसाठी जी माहिती जमा करण्यात आली आहे. ती संभाव्यता नमुना निवड पध्दती मध्ये साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीत माझ्या संशोधनसासाठी लागू होत असलेली कोटा पध्दती नूसार निवडलेली राळेगणसिध्दीची लोकसंख्या २३१७ असून १७२५ मतदार आहेत. प्रस्तूत अभ्यासाच्या चौकटीत वय वर्ष १८ च्या पुढील सज्ञान ग्रामस्थाकंडून माहिती मिळविणे अपेक्षित आहे. म्हणून एकुण सज्ञान लोकसंख्येच्या साधारण ५ टक्के म्हणजेच ११० ग्रामस्थांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये गावातील स्त्री—पुरूषांबरोबरच सामाजीक कार्यकर्ते यांच्याशी अनौपचारीक, औपचारीक चर्चे बरोबरच मुलाखती व प्रश्नावली भरून घेण्यात आली आहेत.

कोटा नमुना या पध्दतीत सर्व प्रथम समग्राला वेगवेगळया वर्गात विभाजीत केले जाते. प्रत्येक वर्गामधून किती एकक निवडायचे आहे. हे निश्चीत करुन नंतर प्रत्येक वर्गामधून संशोधनकर्ता तितकेच एकक आपल्या इच्छेनुसार निवडतो. अशा प्रकारे निवडल्या गेलेल्या एककांना नमुना मानला जातो.

- **नमुना निवडीचा आकृतीबंध:**

  प्रस्तुत संशोधनामध्ये साधा यादृच्छिक मधील कोटा नमुना निवड पध्दतीने केलेल्या ग्रामस्थ संबंधिचा आकृतीबंध तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १.१**

**नमुना निवडीचा आकृतीबंध**

| अ.क्र. | जातीचे वर्गीकरण | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठा (सर्वसाधारण) | ३५ | ३१.८२ |
| २ | महार | २५ | २२.७३ |
| ३ | चांभार | १० | ०९.१० |
| ४ | कोळी | ०३ | ०२.७३ |
| ५ | पारधी | ०६ | ५.४५ |
| ६ | गोंधळी | ०३ | २.७३ |
| ७ | इतर मागासवर्गीय | २८ | २५.४५ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

संदर्भ—क्षेत्रीय पाहणी.

### १.७.१ सांख्यिकीय विश्लेषण:

प्रस्तूत अध्यनामध्ये प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताद्वारे माहिती व आकडेवारी संकलीत केली असून त्या संकलीत आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय परिमाणांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये तालिकीकरण, टक्केवारी, आलेख, यासारख्या सांख्यिकीय पध्दतीचा वापर केला आहे.

## १.८ संशोधनाची व्याप्ती:

१. सदर संशोधनात अण्णा हजारे यांच्या ग्रामविकास क्षेत्रातील कार्याचा अभ्यास केला जाणार आहे.

२. राळेगणसिध्दीच्या भौगोलिक क्षेत्राची अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

## १.९ संशोधनाच्या मर्यादाः

१. प्रस्तुत अभ्यास अहमदनगर जिल्हयातील पारनेर या तालुक्यातील राळेगणसिध्दी गावातील निवडक ग्रामस्थांपुरते मर्यादित आहे. इतर गावांचा येथे अभ्यास नाही ती भौगोलिक मर्यादा आहे.

२. ग्रामस्थांकडून विकासासंबंधी अचूक माहिती मिळणे कठीण आहे.

३. संशोधकाने गोळा केलेली माहिती प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतानुसार केलेली असल्याने ती १०० टक्के खरी असेलच असे नाही.

४. सदर संशोधनातील प्रतिसादकांच्या भावभावना, आवड, मनस्थिती सत्य, असत्य यावर संशोधकाचे नियंत्रण नाही.

५. तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे केवळ ६—७ धर्माचे लोकच राळेगणसिध्दी मध्ये राहतात अशी माहिती संशोधकास ग्रामपंचायतने पूरविलेल्या माहितीवरुन समजले त्यामुळे इतर धर्मांच्या लोकांचा अभ्यास करता आला नाही कारण गावात इतर धर्मांचे लोकांच नाहीत ही एक मर्यादा जाणवली आहे.

तरी देखील संशोधकाने माहिती मिळविताना शासकीय कार्यालय, अधिकारी, शेतकरी व संबंधित व्यक्तींना विश्वासात घेऊन येणाऱ्या अडचणींवर मात करून अधिकाधिक अचुक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.१० प्रबंध प्रकरण रचनाः

प्रस्तूत प्रबंधासाठी एकुण पाच प्रकरणांची रचना केलेली आहे. त्यासंबधी अधिक माहिती पूढील प्रमाणे दिलेली आहे.

### प्रकरण १ः प्रास्ताविक आणि संशोधन पध्दतीः

सुरुवातीला प्रस्तुत विषयाच्या संदर्भाने श्री अण्णा हजारे व राळेगणसिध्दी यांच्या संदर्भाने सविस्तर चर्चा केली असून अण्णांच्या कार्याचा व राळेगणसिध्दीचा आदर्श गाव म्हणून झालेल्या कायापालटाच्या संदर्भाने

चर्चा विश्व उभे केले आहे. त्यातून पुढे आलेले संशोधन प्रश्न व त्या प्रश्नांचे परिमार्जन इ. ची सविस्तर चर्चा केलेली आहे. संशोधन विषयाचे महत्व, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहितके, तथ्य संकलनाची साधने किंवा संशोधन पध्दती, नमुना निवडीचा आकृतीबंध, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा, संभाव्य प्रकरण योजना इत्यादी घटकाची मांडणी केली आहे.

## प्रकरण २: संदर्भ साहित्याचा आढावा:

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी निगडीत संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यासाठी पीएच.डी. प्रबंध, एम. फील. लघुशोध प्रबंध, एम. एड लघुशोध प्रबंध, पुस्तके, मासिके, संशोधन पेपर इ. चा आढावा, पुर्नसंशोधनाची आवश्यकता इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे.

## प्रकरण ३: अण्णांचे जीवन आणि राळेगणसिध्द्दीच्या विकासातील योगदान:

प्रस्तूत प्रकरणामध्ये विकासाची व्याख्या, ग्रामीण विकास,ग्रामीण विकासाची व्याख्या,ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाची संकल्पनेचा विकास, ग्रामीण विकासासंबंधी दृष्टीकोन, ग्रामीण विकासाची कार्यक्रम, ग्रामविकासाची प्रारूपे (नेहरू प्रारूप, गांधी प्रारूप, आणि अण्णा हजारेंचे प्रारूप), अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्द्दी ग्रामीण विकासातील योगदान, अण्णांच्या दृष्टीकोनातून ग्रामीण विकासातील समस्या इत्यादींचा अभ्यास केलेला आहे.

## प्रकरण ४: माहिती व राळेगणसिध्दीच्या वस्तुस्थितीचे विश्लेषण:

प्रस्तुत प्रकरणामध्ये वयोगट, शैक्षणिक माहिती, कौटुंबिक, व्यावसायिक, जातनिहाय वर्गीकरण, ग्रामविकासाशी संबंधित माहितीचे

वर्गीकरण, राळेगणसिध्दीच्या ग्रामविकाससंबंधी ग्रामस्थांची मते, ग्रामसभेची वारंवरिता, ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती, ग्रामसभेतील विषय, ग्रामपरिवर्तन दिन, राळेगणसिध्दीतील सण व उत्सव यांचे विश्लेषण, राळेगणसिध्दीचे वेगळेपण, राळेगणसिध्दीच्या विकासात तरूणांचा सहभाग, जलसिंचनाची साधने, पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण, राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती, शासकिय अधिकाऱ्यांची विकासाबाबत मते, राळेगणसिध्दीतील नविन प्रकल्प, राळेगणसिध्दीतील समस्या इत्यादींचा अभ्यास केलेला आहे.

## प्रकरण ५: सारांश, निष्कर्ष, आणि उपाययोजना:

प्रस्तूत प्रकरणामध्ये संकलित माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. तसेच 'राळेगणसिध्दी' या गावाच्या सर्वांगिण विकासाठी काही उपाययोजना सुचविल्या आहेत.

## १.११ सारांश:

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रस्तुत अभ्यासाच्या चौकटीत एकुण पाच प्रकरणच्या माध्यमातून केलेल्या मांडणीचा थोडक्यात सारांश दिला असुन संशोधन विषयाचे महत्व, निवड, उद्दिष्टये, गृहीतके, संशोधन पध्दती, नमुना निवडीचा आकृतीबंध, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, प्रबंध प्रकरण रचना इ. घटकांचे विस्तृत विश्लेषण करण्यात आले आहे.

**संदर्भः**


- http://en.wikipedia.org
- http://www.annahazare.org

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा


२.१ प्रस्तावना

२.२ पीएच.डी प्रबंध

२.३ एम.फील लघुशोध प्रबंध

२.४ एम.एड लघुशोध प्रबंध

२.५ संबधित साहित्याचा आढावा

२.५.१ पुस्तके

२.५.२ मासिके

२.५.३ वर्तमानपत्रे

२.५.४ संशोधन पेपर

२.६ पुर्नसंशोधनाची आवश्यकता

२.७ सारांश

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना:

कोणत्याही संशोधकास संशोधनाची समस्या निश्चित केल्यानतंर त्या संशोधनाच्या संदर्भात असणारी माहिती संकलित करण्यापूर्वी किंवा संशोधनासाठी आवश्यक असणारी साधने तयार करण्यापूर्वी त्यांची निवडलेल्या संशोधन समस्येच्या अनुषंगाने पूर्वी कोणकोणती संशोधने झाले आहेत? याचा शोध घेणे जरूरीचे असते.

आपल्या संशोधन समस्येशी निगडीत जी प्रमुख संशोधनाची क्षेत्रे आहेत त्यास क्षेत्रातील संशोधनाच्या निष्कर्षाचा आधार संशोधकाने घ्यावयाचा असतो. संशोधनासाठी विषय ठरविल्यानंतर संशोधकास त्या विषयावरील संशोधन साहित्याचा सांगोपांग अभ्यास करणे आवश्यक असते. पुर्वी झालेला विषय जसाचा तसा घेणे याला अर्थ नसतो कारण संशोधनात नाविन्य महत्वाचे असते. पुर्वी झालेल्या संशोधनातून शिल्लक राहिलेल्या किंवा त्या संशोधकाने सुचविलेल्या पुरवणी विषय काय आहे हे पाहता येते.

संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास केल्याने त्यास संशोधन समस्या, उदिष्टये, व्याप्ती व मर्यादा, संशोधन साधने, निष्कर्ष इ. अधिकाधिक सुस्पष्ट होण्यास मदत होते. संबधित संशोधन साहित्याचा अभ्यास केल्याने त्यास संशोधन साहित्याच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करताना, विषय करताना जॉन डब्ल्यू बेस्ट म्हणतात की, “The Researcher for related literature is one of the First Step in research process it is a valuable guide for defining the problem recognisation its significance, suggesting promissing data gathering devices appropriate study desiring and sources or data.”

संबंधित संशोधनाचे क्षेत्र कोणते? साधने कोणती वापरली होती, माहिती व तिची विशदिकरण तसेच निष्कर्ष व सुचना कोणत्या केल्या आहेत याची दखल घेऊन त्याच गोष्टींची पुनरावृत्ती होईल या विचाराने आपल्या विषय व संशोधन कार्यक्रम या गोष्टीची निश्चिती करायची असते. त्यासाठी पुर्वीच्या संशोधनाच्या अहवालातील आवश्यक बाबी आपल्या अहवालात सादर करणे जरूरीचे असते.

संशोधकाने निवडलेला अभ्यासाचा विषय हा 'ग्रामीण विकास' या क्षेत्रात येतो. संबंधित विषयासंबंधी पुर्वीच्या संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने विविध संस्थाच्या ग्रंथालयांना भेटी दिल्या आहेत. त्यामध्ये पुढील प्रमाणे संदर्भ साहित्य अभ्यास करण्यास मिळाले आहेत.

## २.२ पीएच.डी प्रबंध:

संशोधन विषयाची निवड केल्यानंतर संशोधकाने या विषयाशी संबंधित अशा साहित्याचा व पुर्वसंशोधनाचा घेतलेला आढावा पुढीलप्रमाणे आहे.

१. **संशोधक मेश्राम लेखचंद उध्दव**[१] यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, अंतर्गत राज्यशास्त्र विभागात जानेवारी २००८ मध्ये शीर्षक, ''नागरिकांचे सबलीकरण; महाराष्ट्राच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराचा चिकीत्सक अभ्यास'' या विषयावर अभ्यास करून पीएच.डी प्रबंध सादर केलेला आहे.

सदर संशोधनात माहितीचा अधिकार या कायद्याचा चिकीत्सक अभ्यास केला आहे. त्यांच्या गृहीतकांच्या आधारे आपल्याला असे दिसुन येते की, माहितीचा अधिकार कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता आलेली आहे असे त्यांच्या प्रस्तुत संशोधनातुन जाणवते. तसेच हा कायदा राजकिय लोकांना अडचणीचा वाटतो कारण शासन व्यवहार कसे चालतात हे लोकांना कळु नये अशी सर्वच राजकर्त्या, राजकिय पक्षांची

धारणा असते या कायद्यामुळे कोणत्या योजनेवर किती खर्च झाला हे सर्व उघड होणार असल्यामुळे राजकिय लोकांना लपवायला काहीच शिल्लक राहणार नाही त्यामुळे हा कायदा अडचणीचा वाटतो, त्यानंतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा या कायद्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक दिसुन येतो आणि सर्व सामान्य लोकांना या कायद्याची माहिती मिळाल्याने जागृती निर्माण होते.

२. **संशोधक पारधे शर्मिला भाऊसाहेब**[२] यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिक्षणशास्त्र आणि विस्तार या विभागात जानेवारी २०११ मध्ये, शीर्षक ''मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजीक कार्याचा राळेगणसिध्दीच्या संदर्भात समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावर प्रबंध सादर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात मा. अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दी परिसरात केलेल्या सामाजीक कार्याचा अभ्यास केला आहे त्यांत पंचसुत्री तसेच जलसंधारण, हरितक्रांती, धवलक्रांती, आरोग्य व कुटुंबनियोजन, महिलासबलीकरण, धान्यबॅक अशा विविध उपक्रमांचा अभ्यास केला, तसेच अण्णांनी केलेल्या शैक्षणिक कार्यात नापासांच्या शाळेचा अभ्यासही केला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना दैनंदिन शिक्षणाबरोबर व्यवसाय प्रशिक्षण व संस्कार दिले जातात, त्यांना दृकश्राव्य साधने हि उपलब्ध करून दिले जातात. तसेच राळेगणसिध्दीमध्ये ग्रामसभेद्वारे ग्रामसुधारणा घडवून आणली आहे.

वरिल सर्व घटकांचा अभ्यास संशोधकांनी त्यांच्या प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

३. **संशोधक सटाले सिध्देश्वर नामदेव**[३] यांनी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ'' अंतर्गत राज्यशास्त्र विभागात सप्टेंबर २०१२ मध्ये शीर्षक, ''मा. अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व'' या विषयाचा अभ्यास करून प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये अण्णाच्या राजकीय, आर्थिक

व गांधीवाद यामुळे समाजावरील प्रभावाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात अण्णांनी स्वामी विवेकानंद व महात्मा गांधी यांनी दाखविलेल्या मार्गांनी समाजाला विकासाच्या दिशेने सामाजिक, राजकीय, आर्थिक, ग्रामीण कार्यातुन तळागळातल्या माणसाला सोबत घेऊन भ्रष्टाचारमुक्त भारताचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी आत्मक्लेशातून, ह्रदय परिवर्तनातून उन्नती घडवून समाजाला व देशाला कार्यातून जाणीव करून दिल्याचे समजते. महात्मा गांधीच्या विचारांचा अण्णाच्या जीवनावर खूप मोठा प्रभाव पडल्याचे दिसुन आले.

एकंदरीत अण्णांनी समाजासाठी लहान बालकांपासून ते मोठयां पर्यंत सर्वांगीण विकास करण्यावर रक्ताचा एक थेंबही न सांडता बदल घडूवन आणल्याचे समजते.

## २.३ लघुशोध प्रबंध एम.फिल:

१. **संशोधक थोरात सुदाम सखाराम**[४] यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अंतर्गत राज्यशास्त्र विभागात सन २००८ मध्ये शीर्षक, ''डॉ. मणिभाई देसाई यांचे ग्रामविकासातील योगदान'' या विषयाचा अभ्यास करून लघुशोध प्रबंध (एम.फिल्) सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने एक व्यक्तीमत्व म्हणुन डॉ. मणिभाई देसाईंनी केलेल्या ग्रामीण विकासातील केलेल्या कार्याचा व सुधारणांचा त्याही गांधीवादी पध्द्तीने झालेल्या ग्रामविकासाच्या बदलांचा अभ्यास करून प्रबंध सादर केला आहे.

ग्रामिण विकासाचा आदर्श मार्ग म्हणुनच बाएफची स्थापना केली. बाएफ द्वारे त्यांनी एका संशोधन संस्थेची स्थापना केली. पर्यावरण विकासासाठी प्रयत्न केले. तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तेथील परिसराचा ग्रामविकास घडवून आणला.

## २.४ लघुशोध प्रबंध एम.एड:

**संशोधक पांडुळे अमृत रामदास**[५] यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, सन २००८ मध्ये शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभागाअंतर्गत शीर्षक''राळेगणसिध्दी येथील नापासांच्या शाळेत दैनदिन कामकाजात शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास'' या विषयावर संशोधन पुर्ण करून एम.एड पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधनात अण्णांनी सुरू केलेल्या नापासांची शाळा म्हणजेच श्री. संत निळोबाराय विद्यालय होय. या विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्यांचा आणि शिक्षकांच्या सहशिक्षकांच्याही समस्यांचा अभ्यास केला आहे. तसेच या विद्यालयातील विद्यार्थी कशा पध्दतीने वर्तन करतात, शाळेतील शिस्त, अभ्यास, अभ्यासपूरक कार्यक्रम, शिक्षाबद्दल विद्यार्थ्यांची उदासिनता, विद्यार्थ्यांची वर्गातील एकुण संख्या या सर्व घटकांचा अभ्यास केला आहे. तसेच त्यांनी समस्येला अनुरूप अशा उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

## २.५ संबंधित साहित्याचा अभ्यास:

मा. अण्णा हजारे यांच्या सामाजिक, आर्थिक, ग्रामीण कार्याचा अभ्यास करताना त्यांचे कार्यावर आधारित इतर लेखकांनी लिहलेले साहित्य, त्यांचे लेख, वृत्तपत्रातील लेख, बातम्या, मासिके, संशोधन पेपर, ग्रामिण विकासावर आधारित असलेले वृत्तपत्रे या सर्वांचा संदर्भ साहित्य म्हणून अभ्यास केला त्याचा सारांश पुढील प्रमाणे दिला आहे.

### २.५.१ पुस्तके:

१) **कुऱ्हाडे, पांगारे, लोकुर** आदर्शगाव संकंल्प आणि प्रकल्प[६] जनतेच्या कार्यात शासनाचा सहभाग, प्रकाशन. पुणे हिंद स्वराज्य ट्रस्ट, (१९९६)

सन १९९२ साली महाराष्ट्र शासनाने आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प योजना सुरू केली, या योजनेमुळे योजना संपुर्ण देशभरात पसरलेली आहे. राळेगणसिध्दी गावातील विकास केंद्रीभूत ठेऊन इतर गावांना मार्गदर्शन पर एक उत्कृष्ठ नमुना म्हणून राळेगणसिध्दीला पाहिले जाते. राळेगणसिध्दीतील विकासाची सुत्रे लक्षात घेऊन त्याचा उपयोग एक राज्यस्तरीय कार्यक्रम म्हणुन केला गेला. सदरील पुस्तकात या योजनेचे प्रत्यक्ष काम, अमंलबजावणी याची रचना त्यामुळे ग्रामविकासात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला त्याचा उपयोग होईल. विषयाची सांगोपांग चर्चा, हि पुस्तकामध्ये संशोधनाच्या दृष्टीने संशोधकास महत्वपूर्ण वाटली.

२) **वारखडे सुरेशचंन्द्र** राळेगणसिध्दीचा कर्मयोगी अण्णा हजारे[७] आवृत्ती (२००३), प्रकाशन कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे.

सदरील पुस्तकात अण्णांच्या जीवनकथेमध्ये जीवन जगताना घडलेल्या घडामोडी बालपन, तारूण्य, सैन्यातील जीवन, ग्रामविकासाविषयी कल्पना, जीवनाचे अंतिम ध्येय, ग्रामउध्दाराची प्रेरणा, कार्य करताना आलेल्या अडचणी, त्यावर धैर्याने केलेली मात, सारे सारे अण्णांची आणि राळेगणसिध्दी बदलची माहिती यात आहे. अण्णा सत्याचे पाठीराखे आहेत. तन, मन, धन कशाचाही विचार न करता त्याग करणार, अण्णा समाजातील अन्याय दुर करण्यासाठी दृढ जिद्दीने आणि करारी मनाने प्राण पनाला लाऊन काम करणार. महात्मा गांधीचा वारस शोभावा असे अण्णांचे विचार आहेत. आपल्या सर्वसर्वांचे दान करून आणि रात्रंदिवस राबराबून त्यांनी राळेगणचा सर्वांगीण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास, ग्रमविकास घडविला आहे. एक आदर्श खेडे निर्माण केले आहे. एके काळी व्यसनांच्या विळख्यात सापडून मृत्यूपंथाला लागलेल्या राळेगणातील प्रत्येक घरात अण्णांनी चैतन्य निर्माण केले आहे. यादवबाबाच्या मंदिरापासुन वृक्षारोपण, पाणी व्यवस्था, इंधन, धान्य बॅक, गावातील सामुदायीक विवाह, हुंडाबंदी,

गावचे समाज व राजकारण, अंधश्रध्देचा लढा आणि स्वत:च्या गावात अण्णांना कार्यामुळे मिळालेला मान, पद्‌मश्रीचा बहुमान इ. गोष्टींचा संशोधकास संशोधन करताना सदरील पुस्तकाची महत्वपुर्ण मदत झाली आहे.

३) **भालेराव शाम** वाट हि संघर्षाची, आवृत्ती(२००७)[८] प्रकाशन, सिग्नेट पब्लिकेशन्स पुणे.

ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांच्या संपुर्ण जिवनावर आधारीत प्रस्तुत पुस्तक आहे. मा. अण्णा हजारे यांचे संपुर्ण जीवन संघर्षमय असल्याचे यातून समजते.

प्रत्येक व्यक्तीस जिवन प्राप्त झाले आहे, ते सेवेसाठी सेवेतुनच खरा आनंद मिळतो, प्रथमत: स्वत: पासुन कोणतेही कार्य सुरूवात केल्याशिवाय इतरांना सांगण्याचा अधिकार प्राप्त होत नाही, या म्हणीनुसार अण्णांनी राळेगणसिध्दीमध्ये परिवर्तनास सुरूवात केली, दारूबंदी, हातभट्टी, नसबंदीही सारखे काम करताना प्रचंड विरोधास सामोरे जावे लागले. परंतु आईच्या नात्याने धकदडपशाही दाखवून सुधारणा करण्यावर भर दिला आणि त्यातुनच ग्रामपरिवर्तन होत गेले. नवनवीन योजनांचा अभ्यास करून त्या गावात आणुन ग्रामस्थांच्या मदतीने ग्राम व ग्रामीण विकास केला गेला. याच बरोबर अनेक संघर्षमय अनुभव या पुस्तकात एकत्रित रित्या आहे. त्या सर्वांचा अभ्यास करण्याकरिता संशोधकास मदत झाली.

४) **वाघ बाळासाहेब**, ग्रामविकासाची पाऊलवाट राळेगणसिध्दी[९] आवृत्ती (२००९) प्रकाशन, मिडिया सेंटर राळेगणसिध्दी.

सदरील पुस्तकात गावातील श्रमदान, व्यसनमुक्ती पासुन सरकारला जनहिताचे कायदे करायला भाग पाडणारे हे व्यक्तीमत्व नक्कीच सामान्य नाही याच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विविध पैलुबाबत माहिती यामध्ये आहे. स्वार्थीपणामुळे गावाचा विकास मागे पडला, गाव ओस पडल्यागत झाले हेते. पण हि परिस्थिती अण्णांनी ५ ते ६ वर्षात

राळेगणशिंध्दीचे रूपातंर राळेगणसिध्द्ीमध्ये अनेक विकास कामे तसेच योजनांचा लाभ घेत 'समाज विकासाचा ध्यास घेतला कि यश निश्चित मिळतेच' याचे प्रात्यक्षिकच दाखवले आहे. यादव बाबांच्या मंदिरांच्या जिर्णोध्दारापासुन सुरूवात करत गावासभोवतालचा भौगोलिक परिस्थितीचा सदउपयोग करत अण्णांनी गावात भरपूर वृक्षारोपन केले, वृक्षांचे फायदे ग्रामस्थांना पटवून दिले त्यातुनच गावापातळीवर अनेक शासकिय योजना आणि श्रमदान यांची सांगड घालून राबवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सदरील पुस्तकात त्यांच्या जीवनातील कांही प्रसंगही दिसुन आले आहेत. राळेगणसिध्द्ीत अण्णांच्या खादयांला खांदा लावून ग्रामपातळीवर विकास कामे करणारे त्यांचे सहकारी व राळेगणसिध्द्ीचे नेमके स्थान, हि माहिती सदर पुस्तकात आहे. ग्रामीण पातळीवरील अनेक विकास कामांचा अभ्यास करण्यासाठी या पुस्तकाची मदत संशोधकास महत्वाची ठरली आहे.

५) **वारघडे सुरेशचंद्र** राळेगणसिध्द्ी ग्रामविकासाची पाऊलवाट [१०] आवृत्ती(२००९), प्रकाशन, राळेगणसिध्द्ी परिवार.

सदरील पुस्तकात राळेगणसिध्दी गावात राबविलेल्या विविध योजनांची एकत्रितरित्या माहिती तसेच गावातील नवनवीन प्रयोग त्यांची यशस्वी अमलबजावणी व त्याचे परिणाम एकत्रितरित्या मांडलेले आहेत. सन १९७५ पुर्वीची गावची माहिती सांगणारे आणि १९७५ नंतर विकासकामांच सुरूवातीपासून संपुर्ण गावचा विकास झाल्यानतंरची महत्वपुर्ण माहिती यात दिलेली आहे. त्याचा अभ्यास करताना संशोधकास उपयोग झाला.

सन १९९२ साली ऑगस्ट क्रांती दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षादिनी 'आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प,' समिती स्थापना झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्याच्या बैठकीत कै.अच्युतराव पटवर्धन यांनी राळेगणसिध्दी सारखा विकास, महाराष्ट्रातल्या दुष्काळग्रस्त भागातील ३०० खेड्यांचा करावा. महात्मा गांधीजींचे स्वयंपूर्ण व स्वावलंबी

खेड्याचे स्वप्न साकार करावे असा विचार मांडला. 'आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प,' या योजनेची रचना व कार्ये, राज्य समिती, सुकाणू समिती, तांत्रिक समिती, जिल्हा स्तरीय समिती, ग्रामसभेचे महत्व, नसबंदी, नशाबंदी, श्रमदान, कुऱ्हाडबंदी, चऱ्हाईबंदी या पाच कल्याणकारी योजनांचे महत्व, गावापतळीवरील क्षेत्रीय समन्वय, लोकजागृती व लोक शिक्षण, देशाला दिशा देणारी योजना इ. कल्याणकारी योजनांचे प्रोत्साहन देणारी अशी माहिती आहे.

६) **हजारे अण्णा** माझे गाव माझे तीर्थ आवृत्ती (२०११जानेवारी)[११], प्रकाशन राळेगणसिध्दी परिवार.

संबंधित पुस्तकामध्ये मा.अण्णा हजारे यांच्या आत्मचरित्रातुन त्यांनी आपल्या बालपणापासुनच्या आठवणी, खेळ, झालेले संस्कार, प्रभाव, प्रसंग नमुद केलेले आहेत. त्यांना अन्यायाबद्दल लहानपणा पासुनच चीड होती म्हणुनच वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी भाजीवाल्याकडून हप्ते गोळा करणाऱ्या पोलीसाला दंडुक्याने चोप दिल्याचे तसेच आणखी काही प्रसंग नमुद केलेले आहे. लहानपणापासून ते आज तागायत समाज कार्याची आवड असल्याने सैन्यातील प्रसंग किंवा इतरही प्रसंग त्यांनी आपल्या या पुस्तकात नमुद केलेले आहेत. सैन्यातून सेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर गांधीजींचे विचार, स्वामी विवेकानंदाच्या पुस्तकातून मिळालेली प्रेरणा, आईचे संस्कार तसेच त्यांच्या जीवनावर पडलेला प्रभाव इ. च्या बळावर आपल्या गावाचा विकास करण्याचे ठरवुन त्या दिशेने एक एक पाऊल टाकत व्यसनमुक्ती पासुन ते ग्रामपरिवर्तन दिन, धान्य बॅक या अशा अनेक शासकिय योजनांची व गावकऱ्यांच्या श्रमदानाची सांगड घालत विविध योजना गावात ग्रामस्थांच्या मदतीने यशस्वीरित्या राबविल्या आणि गावाने संपुर्ण राज्याला आदर्शाच्या रूपात जगाच्या नकाशावर नेऊन ठेवले आहे, या व अशा अनेक ग्रामीण विकासाच्या विविध योजनांचा सविस्तरपणे अभ्यास करण्यासाठी सदर पुस्तकांचा संशोधकास संशोधन करताना उपयोग झाला.

७) **पठाडे संजय** स्वातंत्र्याची दुसरी लढाई [१२], आवृत्ती (२०११),प्रकाशन, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन (न्यास), राळेगणसिध्दी.

सदरील पुस्तकामध्ये अण्णांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज देण्यास नकार दिला होता. तसेच वीज पुरवठयाची समस्या हि अण्णांनी सोडवली. भ्रष्टाचारी मंत्र्याचा म्हणजेच पाटबंधारे खात्यातील मंत्री, आघाडीतील सरकारातील मंत्री यांचा भ्रष्टाचार उघड केला. तसेच माहितीच्या अधिकारासाठी कशा पध्दतीने लढा दिला याचा उल्लेख केला आहे. विकेंद्रित कायदयासाठी प्रयत्न केले. सहकारी पत संस्थांचे शुध्दीकरण, मुद्रांक घोटाळयाविरूध्द लढा, टोल वसुली विरूध्द कशा पध्द्तीने संघर्ष केला हे सांगितले. हे सर्व कार्य करतांना खुप मेहनत करावी लागते आणि या कार्यासाठी आंदोलन करावे लागते. त्यासाठी संघटन, विस्तार व कार्यपध्द्ती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आंदोलनाचे नियोजन, या सर्वांची सविस्तर माहिती सदरील पुस्तकात दिलेली आहे.

८) **झगडे रामचंद्र शंकरराव** मृदगंध, पाणलोट क्षेत्र विकासातून मृध्दीकडे[१३], आवृत्ती (२०१४) प्रकाशन, हिंद स्वराज्य ट्रस्ट राळेगणसिध्दी.

सदरील पुस्तकात ग्रामविकासामध्ये पाणलोट क्षेत्रातील विकासात केलेल्या संपुर्ण कामाचा अनुभव मांडला आहे. जेष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे नेहमी म्हणतात, ‘देशाची अर्थव्यवस्था बदलायची असेल तर प्रथम खेडयाची अर्थव्यवस्था बदलली पाहीजे’ भारत हा कृषीप्रधान देश असल्याने शेतीच्या विकासासाठी पाणलोट क्षेत्र कार्यक्रम अत्यंत महत्वाचा आहे. ज्या भागात पाणलोटाचे काम करायचे आहे, ते क्षेत्र कसे असावे, क्षेत्राची निवड कशी करावी नियोजन कसे करावे याची तपशीलवार देण्यात आली. माथा ते पायथा ही अण्णांनी सांगीतलेली कार्यपध्दती सोप्या भाषेत मांडल्याने ती सहज समजते, ग्रामविकास आणि पाणलोट क्षेत्रविकास या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या

पुस्तकाचा शास्त्रशुध्द पध्दतीने राबविण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन केलेले आहे. सदरील पुस्तकाचा संशोधनात संशोधकास खुप मदत झाली आहे.

### २.५.२ मासिके:

१) **ग्रामसभा (२००८) ''ग्रामसभा: अधिकार व माहिती''**[१४]

राळेगणसिध्दी भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास घटनेने ग्रामसभेला स्वयंभू रचनावर ठेवले आहे. महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला जादा अधिकार देण्याबाबत कायदे केलेले आहेत. या कायदयांचा अभ्यास करून लोकशिक्षण लोकजागृती होणे गरजेचे आहे. अन्यथा कायदे कितीही चांगले असले तरी नागरीकांना त्याचा उपयोग होत नाही.

सदर पुस्तिकेत ग्रामसभेला सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने अनेक शासननिर्णय व अध्यादेश काढलेले आहेत ते सर्व एकत्रिततरित्या आहेत.

२) **लोकराज्य (ऑक्टोबर २०१०)**[१५] महात्मा गांधी प्रणीत पंचायतराज मुंबई, माहिति व जनसंपर्क महासंचालनालय.

ग्रामोद्योगाची जोड शेतीला जोडधंदा म्हणुन देणे आवश्यक आहे. पंचायतराज संस्था आणि ग्रामविकास विषयी मांडलेल्या विचारांचा आढावा महात्मा गांधी प्रणीत पंचायतराज या लेखामध्ये गेडाम शंकरराव यांनी सांगितलेला आहे. जनतेकडुन मोठया प्रमाणावर उत्पादन करण्याकरीता ग्रामपंचायत कारभाराबरोबरच घरगुती धंदयाची, ग्रामोधोरणाची जोड शेतीला देणे हे ग्रामीण समाजाचे स्वरूप स्थिर राहण्याकरीता आणि स्वयंपुर्ण ग्रामसंस्थांच्या निर्मितीकरीता आवश्यक आहे. दळणाच्या धंदयापासून ते लोहार काम, सुताराकाम अशा अनेक धंदयाची ग्रामीण धंदयामध्ये मोजदाद करता येईल, त्या करीता खरे तर खेड्यांतील कारागिरांना कच्चा माल खरेदीसाठी सरकारने सहाय्य केले असे प्रतिपादले आहे.

३) **खोरे अरूण, (ऑक्टोबर २०१०)**[१६] ''लोकराज्य: गांधीजींचे तत्वज्ञान कधी नव्हे इतके आज प्रस्तुत'' मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

महात्मा गांधीजीच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेकांनी ग्रामविकासाच्या वाटेवरून मार्गक्रमण केले त्यापैकी मोहन धारिया हे एक अग्रगण्य नेतृत्व ते गांधीजीचे तत्वज्ञान अनुसरून गेली तीन दशके 'वनराई' या संस्थेच्या माध्यमातुन काम करत आहे. गांधीजींच्या ग्रामविकास विचारांवर आधारित शहरांतून गावाकडे परतण्याचे आवाहन करणारा हा आशयपुर्ण उपक्रम धारियांच्या नेतृत्वाखाली वनराईने राबवला. या उपक्रमात ग्रामराज्य व्यवस्था, स्वयंपूर्णता, स्वच्छ व हिरवेगार, शिक्षणाची नवी सुरूवात, नई तालिम, ग्रामसभा, ग्रामीण भारताचा एकात्मिक विकास इ. संकल्पना पुणे जिल्हयातील गावडेवाडी, कोकणातील वरंध आणि मराठवाडयातील झरी या गावात राबविला. यात सामान्य शेतकरी हाच केंद्र बिंदू मानुन जोडीला अनुभवही आहेत. त्यांचा विकास महत्वाचा त्याचा परिणाम म्हणजे मुंबई पुण्याकडे नोकऱ्या शोधण्यासाठी गेलेली १६५ कुटुंबे गावडेवाडीत परत आली. 'खेडी सुधारा विकसित करा' असे आवाहन गांधीजीने केले होते. त्याच मंत्राचा उपयोग आज ही भारतातली ग्रामविकासाची शक्ती वाढविण्यात होईल असे प्रतिपादले आहे.

### २.५.३ वर्तमानपत्रे:

१) **आपला महानगर, कर्मयोगी ०७.०९.१९९० संध्या नरे**[१७]

या लेखात आजच्या युगात ''कर्मयोगी'' म्हणावं अस व्यक्तीमत्व दुर्मिळ झालं आहे. असे कर्मयोगी म्हणजे अण्णा हजारे होय. असा लेख संध्या नरे यांनी मांडला.

अण्णांच व्यक्तीमत्व, गावाचा कायापालट, अण्णांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने गावात फुलवलेले नंदनवन, कसे उभे केले, नशाबंदी, नसबंदी, कुऱ्हाडबंदी, चाराबंदी हि चतु:सुत्री राबवीली. स्वत:चा विकास

घडवला. गावात ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' ची मोहीम, नैतिकता निर्माण करण्यासाठी, वाढवण्यासाठी अणांनी व्यसनमुक्तीचा कार्यक्रम हाती घेतला. कर्ज, नापासांची शाळा, अंधश्रध्दा, अस्पृशता, सामुदाईक विवाह, हुंडा, वांझोटया, दारुभट्टया यांची चर्चा या लेखात आढळुन येते.

**२) केसरी ४ सप्टेंबर १९९२ देशाच्या विकास नकाशात राळेगणसिध्दी, कुलकर्णी एस.के.**[१८]

राळेगणचीसिध्द्ीची प्रसिध्दी सर्वत्र पसरली आणि देशभरात ''राळेगणसिध्द्ी पॅटर्न'' रूढ होत आहे. त्याचा एक वेगळा आणि धावता परिचय प्रस्तुत लेखात झालेला आढळून येतो.

आज राळेगणसिध्द्ीचा विकास पाहण्यासाठी महाराष्ट्रा बरोबर, कर्नाटक आणि गुजरातमधुन विशेष संख्येने ग्रामीण भागातुन लोक येत असल्याचे दिसुन येते. अर्थात राळेगणसिध्द्ीचा विषय आता प्रांरभी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रपुरताच मर्यादीत राहिलेला नाही. तर तो देशभर पोहचलेला दिसतो.

वृक्षारोपण, महाराष्ट्र शासनाचे राळेगणपॅटर्न, या विषयी लक्ष दिल्याचे आढळून येते. लंडनपर्यंत राळेगणचे नाव पोहचले आहे. देशाच्या विकासात राळेगणचे नाव नकाशात दिसुन आले.

**३) महानगर ०३/०१/१९९७ ''अण्णा हजारे: सचोटीचं मूर्तिमंत प्रतिक'' शौरी अरूण** [१९]

अण्णां हजारें, ''राळेगणसिध्दी एक खंर खुरं परिवर्तन'' या छोटयाशा पुस्तिकेत हे विचार मांडले गेले असा हा लेख त्यामध्ये अरूण शौरी यांनी  पुस्तकांविषयी महाराष्ट्राबाहेरील सर्वांनी वाचावे असे आहे. अण्णांचा व्यवहारी शहाणपण, परखडपणा आणि सचोटी, गांधीनी आणि विनोबाजींच्या विचारातील साधेपणा या साऱ्यांचं दर्शन त्याच्यामध्ये होतं. शिवाय यात केवळ पुस्तकी ज्ञान नसुन प्रत्यक्ष अनुभवाचे बोल यामध्ये

आढळुन येतात असे मत, अरूण शौरीनी माझ्या मते या लेखात व्यक्त केले आहे.

## ४) लोकसत्ता (२२ ऑगस्ट १९९८) संपादकीय[२०]

२३ ऑगस्ट अण्णा हजारे यांच्या नि:स्वार्थी जीवनाला नुकतीच ६० वर्षे पुर्ण झाली. या निमीत्ताने राळेगणमधील गावकऱ्यांनी समारंभ आयोजित केला. अण्णांचे जीवन म्हणजे एका निष्काम कर्मयोग्याच्या जीवनाची गाथा आहे. त्यांचे जीवन, गावातील समस्यांची मुळ कारणांची चर्चा यामध्ये दिसुन आली. तसेच यामध्ये अण्णांमुळे झालेले ग्रामविकासातील बदल पहावयास मिळाले. अण्णामुळे राळेगणला ''क्रांतिग्राम'' म्हणतात यामुळे गावकऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले व कर्जमुक्त गावकऱ्यांनी हरिजनांचे कर्ज फेडले. जलसंधारण, पाण्याचे योग्य प्रमाणात पाणी वाटप, नियोजन, जलसंधारणात सुधारणा, शाळेचे वसतिगृह हे पुर्णत: श्रमदानातून उभे केले आहे. अशा प्रकारे राळेगणच्या विकासाचा आढावा या लेखातुन आढळतो.

## ५) सकाळ २३ ऑगस्ट १९९८ अण्णा हजारे ''आदर्श ग्रामविकासाची दिशा'' प्रा.प्रधान ग.प्र.[२१]

अण्णा हजारे यांच्या एकसष्टी निमित्य त्यांच्या कर्मभुमीत राळेगणसिध्दी येथे (दि.२३) रोजी सत्कार झाला. अण्णांच्या एका सहकाऱ्याला ते काय व कसे वाटले आणि त्यांच्या कार्याचे स्वरूप, ते मांडणारा हा लेख या लेखामध्ये, भ्रष्टाचाराच्या विरोधात अण्णा हजारे यांचे विचार आहेत त्याचा आढावा पहावयास मिळतो.

भ्रष्टाचार निर्मुलन आंदोलन अपेक्षेप्रमाणे वाढले नाही, हे सत्यता या लेखातून दिसुन येते. अण्णा हे राजकीय पुढारी नाहीत या आंदोलनाचा मुख्य हेतु भ्रष्टाचाराविरोधी जन आंदोलन वाढेल अशी अण्णांची अपेक्षा आहे. सध्याच्या समाजस्थितीत ही अपेक्षा पुर्ण होऊ शकणार नाही असे विचार लेखातून पहावयास मिळाले.

६) **रविवार सकाळ १ऑगस्ट १९९९,**[२२] विकासात प्रजेचा सहभाग, मल्हार अरणकल्ले.

गाव सुधारायचं असेल, तर तिथं पाणलोट क्षेत्र विकासाची काम व्हायला हवीत. गावातील लोक एकत्र आले तर कामाची व्याप्ती वाढविता येते. शेतीचे उत्पादन वाढते, दुधदुभते वाढते, शेतकरी सुखी होतो. कामांच दृश्य परिणाम दिसायला किमान ४ वर्षे तरी लागतात. त्यासाठी चिकाटी हवी प्रतिक्षेची तयारी हवी. ग्रामविकासाची संकल्पना, नेमकं काय? ग्रामविकासाची दिशा चुकली की, त्याचे दुष्परिणाम, ग्रामविकासाची जागृती, आदर्श गावयोजना का फसली व तिची दिशा का चूकली हे सर्व करताना येणाऱ्या अडचणी आणि हे सर्व काम करत असताना अण्णांना येणाऱ्या अडचणी याचे कारण चांगल्या कामानांही विरोध हा होतोच. या सर्व प्रश्नाची उत्तरे मुलाखतीच्या माध्यमातून मांडली आहेत.

७) **सकाळ २१ऑगस्ट २००९ "सुराज्याची लढाई लढणारा महात्मा'' लेखक बोठे, बाळ ज**[२३].

हप्ता वसुल करणाऱ्या पोलीसाच्या टाळक्यात काठी घालणारा पंधरा वर्षाचा युवक, लष्करी जवानांना चांगले जेवण मिळत नसल्याने लेफ्टनंट जनरल पर्यंत दाद मागणारा तिशीतला तरूण आणि आज सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणारा बहात्तरीचा जेष्ठतम, प्रामाणिक आचारविचारांवर एका महात्म्याने स्वराज्य मिळवून दिले तर दुसरा महात्मा या स्वराज्याचे 'सुराज्य' होण्याची लढाई लढतोय. हे ललामभूत व्यक्तीमत्व म्हणजे जेष्ठ समाजसेवक कि.बा. उर्फ अण्णा हजारे यांची कारभारी जिल्हयाचे यात अण्णा हजारेंच्या जीवन कार्याचा परिचय प्रतिपादलेला आहे.

**८) रविवार केसरी २७.४.२०११ राळेगणसिध्दतील फकीर, नेहुलकर रामदास**[२४].

जनलोकपाल विरोधक आणि भ्रष्टाचार निर्मुलनाच्या मुद्‌यावरून दिल्लीत उपोषणास सुरूवात केली. या संदर्भात माहिती देणारा लेख केसरीमध्ये प्रसिध्दीस आला. त्यामध्ये बाल जीवन विषयक, शिक्षण विषयक, राळेगणसिध्दी या गावाची माहिती, पाकिस्तानी सैन्य हल्ला, यातून ते सुदैवाने बचावले, साक्षात मृत्यू त्यांनी डोळयांनी पाहिला. आता या पुढील आयुष्यावर आपला अधिकार नाही. आपले जिंवत राहणे हा आपला पुनर्जन्म आहे हे आयुष्य आता स्वत:साठी नव्हे तर समाजासाठी अर्पण करण्याचा निर्धार त्यांनी केला. घर संसार न करता समाजसेवा हेच जीवन ध्येय त्यांनी ठरवले, अशा प्रकारे कोणत्याही प्रकारचा हव्यास न करता राळेगणचा फकीर होऊन कार्ये अण्णांनी केले.

### २.५.४ संशोधन पेपर:

१. **डॉ. सोनवणे माणिक फेब्रुवारी२०१३**,[२५] Anna Hazre- A New Gandhi

डॉ.सोनवणे यांच्या मते, अण्णा हजारे स्वत: गांधीवादी विचाराने प्रभावित आहेत अण्णा एक धाडसी नेतृत्व म्हणुन आदर्श आहेत त्यांनी देशातील भ्रष्टाचार, माहितीचा अधिकार, जनलोकपाल बिल या माध्यमातून देशात क्रांती घडवून आणली राळेगणसिध्दी सारख्या छोटया खेडेगावात विकास घडवून आणला. अनेक तरुणांना आदर्श निर्माण व्हावा असे व्यक्तिमत्व अण्णांनी तयार केले अशा नविन गांधीची समाजविकासासाठी गरज आहे.

## २.६ पुर्नसंशोधनाची आवश्यकता:

अण्णा हजारे यांच्या जीवनावर, कार्यावर अनेक लिखाण, संशोधन झालेले आहे. पीएच.डी, एम.फिल, एम.एड, विविध पुस्तके, मासिके

आणि संशोधन पेपर द्वारे अण्णांच्या ग्रामपातळीवर केलेल्या विविध आंदोलनाचा, माहितीचा अधिकार, राळेगणसिध्दीतील नापासांची शाळा, महात्मा गांधीचा अण्णांच्या जीवनावर पडलेला प्रभाव, विकासामध्ये प्रजेचा सहभाग अशा विविध विषयावर लेखन झालेले आहे. परंतु राळेगणसिध्दी मधील ग्रामविकास तेथील सामाजिक, आर्थिक पार्श्वभुमी, प्रत्यक्ष तेथील गांवकरी, भौगोलिक स्थानाचा अभ्यास, ग्रामपरिवर्तन, त्याच बरोबर तेथील शेती व इतर व्यवसाय विषयक माहिती, अशा विविध घटकांचा अभ्यास संशोधकांने केला आहे म्हणुन पुर्नसंशोधनाची आवश्यकता दिसुन आलेली आहे.

## २.७ सारांश:

उपलब्ध संदर्भ साहित्याच्या माध्यमातून आतापर्यंत अण्णांच्या जीवनावर बरेच संशोधन झाल्याचे दिसुन आले. त्यामध्ये पीएच.डी, एम. फील, एम.एड, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संशोधनपेपर असे अनेक स्तरावर झालेल्या संशोधनाच्या आढावा घेतलेला आहे.

यातुन संशोधकास असे आढळून आले की, मा. अण्णा हजारे यांचा सर्वसामान्य व्यक्तीवर पडलेला प्रभाव व त्यातून राळेगणसिध्दी या गावाचा ग्रामविकास जाणून घेतला. अण्णांनी परिसरात सामाजिक व ग्रामीण कार्य केलेले जाणून घेतले आहे. हि वस्तुस्थिती विचारात घेवुन संशोधकाने सदर संशोधन विषय अभ्यासासाठी घेतलेला आहे.

## संदर्भः


१. मेश्राम लेखचंद उध्दव, शीर्षक ''नागरिकांचे सबलीकरण; महाराष्ट्राच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराचा चिकीत्सक अभ्यास'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, अंतर्गत राज्यशास्त्र विभागात विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध, जानेवारी २००८.

२. पारधे शर्मिला भाऊसाहेब, शीर्षक ''मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजीक कार्याचा राळेगणसिध्दीच्या संदर्भात समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास'' सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिक्षणशास्त्र आणि विस्तार या विभागात विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध, जानेवारी २०११.

३. सटाले सिध्देश्वर नामदेव, शीर्षक ''मा. अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व'' डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत राज्यशास्त्र विभागात विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध, सप्टेंबर २०१२.

४. सुदाम सखाराम, शीर्षक, ''डॉ. मणिभाई देसाई यांचे ग्रामविकासातील योगदान''
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अंतर्गत राज्यशास्त्र विभागात विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध, सन २००८.

५. पांडुळे अमृत, "राळेगणसिध्दी येथील नापासांच्या शाळेत दैनदिन कामकाजात शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास", एम.एड पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध, २००८.

६. कुऱ्हाडे, पांगारे, लोकुर, "आदर्शगाव संकंल्प आणि प्रकल्प, जनतेच्या कार्यात शासनाचा सहभाग", प्रकाशन. पुणे हिंद स्वराज्य ट्रस्ट, १९९६.

७. वारखडे सुरेशचंद्र, "राळेगणसिध्दीचा कर्मयोगी अण्णा हजारे", प्रकाशन कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, आवृत्ती २००३.

८. भालेराव शाम, "वाट हि संघर्षाची", प्रकाशन, सिग्नेट पब्लिकेशन्स पुणे, आवृत्ती (२००७).

९. वाघ बाळासाहेब, “ग्रामविकासाची पाऊलवाट राळेगणसिध्दी” प्रकाशक, मिडिया सेंटर राळेगणसिध्दी, आवृत्ती २००९.

१०. वारघडे सुरेशचंद्र, “राळेगणसिध्दी: ग्रामविकासाची पाऊलवाटे” प्रकाशन, राळेगणसिध्दी परिवार, आवृत्ती २००९.

११. हजारे अण्णा, “माझे गाव माझे तीर्थ”, प्रकाशन, राळेगणसिध्दी परिवार, आवृत्ती २०११ जानेवारी.

१२. पठाडे संजय, “स्वातंत्र्याची दुसरी लढाई”, प्रकाशन, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन (न्यास) राळेगणसिध्दी, आवृत्ती २०११.

१३. झगडे रामचंद्र शंकरराव, “मृदगंध, पाणलोट क्षेत्र विकासातून समृध्दीकडे”, प्रकाशन, हिंद स्वराज्य ट्रस्ट राळेगणसिध्दी, आवृत्ती २०१४.

१४. ग्रामसभा (२००८) ‘‘ग्रामसभा: अधिकार व माहिती’’

१५. गेडाम शंकरराव, लोकराज्य, महात्मा गांधी प्रणीत पंचायतराज मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, ऑक्टोबर २०१०.

१६. खोरे अरूण,‘‘लोकराज्य: गांधीजींचे तत्वज्ञान कधी नव्हे इतके आज प्रस्तुत’’ मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, ऑक्टोबर २०१०.

१७. नरे संध्या, आपला महानगर, कर्मयोगी, ०७.०९.१९९०.

१८. कुलकर्णी एस.के., केसरी, देशाच्या विकास नकाशात राळेगणसिध्दी, ४ सप्टेंबर १९९२.

१९. शौरी अरूण, महानगर,‘‘अण्णा हजारे: सचोटीचं मुर्तिमंत प्रतिक’’,०३.०१.१९९७.

२०. संपादकीय, लोकसत्ता २२ ऑगस्ट १९९८.

२१. प्रा.प्रधान ग.प्र., सकाळ, अण्णा हजारे ‘‘आदर्श ग्रामविकासाची दिशा’’२३ ऑगस्ट १९९८.

२२. अरणकल्ले मल्हार, रविवार सकाळ, विकासात प्रजेचा सहभाग, १ ऑगस्ट १९९९.

२३. बोठे, ज बाळ, सकाळ,''सुराज्याची लढाई लढणारा महात्मा'' २१ऑगस्ट २००९.

२४. नेहुलकर रामदास, रविवार केसरी,''राळेगणसिध्दतील फकीर'' २७.४. २०११.

२५. डॉ. सोनवणे माणिक, Anna Hazre- A New Gandhi फेब्रुवारी२०१३.

# प्रकरण तिसरे

## अण्णांचे जीवन आणि राळेगणसिध्दीच्या विकासातील योगदान

३.१ प्रस्तावना

३.२ विकासाची व्याख्या

३.३ ग्रामीण विकास

ग्रामीण विकासाची व्याख्या

ग्रामीण विकासाची संकल्पना

ग्रामीण विकासाची संकल्पनेचा विकास

ग्रामीण विकासासंबंधी दृष्टीकोन

३.४ ग्रामविकासाची प्रारूपे

१. गांधी प्रारूप

२. नेहरू प्रारूप

३. अण्णा हजारेंचे प्रारूप

३.५ अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्दी ग्रामीण विकासातील योगदान

अ) भौगोलिक क्षेत्राचा सदउपयोग

ब) वृक्ष मानवी जीवनाचा आधार

क) राळेगणसिध्दीचा ग्रामपरिवर्तन दिन

ड) ग्रामसभेला अधिकार

इ) अण्णांचे राळेगणसिध्दी विषयी महत्वकांक्षा एक दृष्टीक्षेप व अण्णांचे जीवन.

ई) अण्णांचे दृष्टीकोनातून ग्रामीण विकासातील समस्या

# प्रकरण तिसरे

# अण्णांचे जीवन आणि राळेगणसिध्दीच्या विकासातील योगदान

## ३.१ प्रस्तावनाः

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखले जाते अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्हयाचे क्षेत्रफळ १७४१३ चौरस किलोमीटर असुन ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६ टक्के इतके आहे. या जिल्हयाच्या उत्तर सीमेवर नाशिक, ईशान्येस औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असून, दक्षिण सीमेवर सोलापुर, पश्चिम सीमेवर ठाणे व पुणे जिल्हे लागून आहेत. महाराष्ट्रात फक्त दोन जिल्हे असे आहेत की त्यांना सात जिल्हयांच्या सीमा लागून आहेत. अहमदनगर त्यांपैकी एक असून, मराठवाडयात परभणी हा दुसरा असा जिल्हा आहे.

पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पुर्वेकडील सखल भाग हे जिल्हयाचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे आहे, तर पुर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्हयातील १५८१ खेडी १४तालुक्यांत विखुरलेली आहेत. १४ पंचायतसमित्या, १३११ ग्रामपंचायती, १ महानगरपालिका, ८नगरपालिका, १ नगरपंचायत, १ कटकमंडळ जिल्हयात आहेत. जिल्हयात १४ तालुके असून त्यांपैकी एक पारनेर तालुका होय.[१]

पारनेर तालुक्याचे क्षेत्रफळ १९,३,०२८ हेक्टर असुन, कृषीक्षेत्र १४,७,७६३ हेक्टर आहे. तर वनक्षेत्र १८,७९२ हेक्टर आहे. तालुक्यात १३१ खेडी असून २,४६,५५५ लोकसंख्या आहे.[२]

कृषी,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रगती केलेले पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी हे गाव आदर्श खेडे म्हणून प्रसिध्द असून

भारतातील विविध राज्य प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते तेथे अभ्यासासाठी भेटी देत असतात. राळेगणसिध्दी या अत्यंत मागास गावाचा कायापालट भारतीय लष्करातील सेवानिवृत्त सेवक पद्मभूषण श्री. अण्णासाहेब हजारे यांनी केला. कृषी सिंचन, सामाजिक वनीकरण, गोबरगॅस, कुटुंबनियोजन, शिक्षण, समाजकल्याण इ. क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती घडवून आणली.

## ३.२ विकासाची व्याख्या:

१. ''देशातल्या सर्व जनतेचे विशेषत: जे बहुसंख्य परंतु दरिद्री व अतिदरिद्री व म्हणुन दुबळे आहेत, त्यांचे जीवन सर्वागांनी अधिक सुखाचे व समृध्द व्हावे, त्यांना सामाजिक न्याय व सुरक्षा मिळावी, ते सक्षम व्हावेत, समाजातील विषमता व शोषण कमी व्हावे म्हणजे खरा विकास.

विकासाच्या संकल्पनेमध्ये 'मानवी विकासाचे' फार महत्व आहे. या मानवी विकासात मुख्यत: आरोग्य म्हणजे लोकांचे सरासरी आयुष्यमान, अर्भकांच्या मृत्यूचे दर हजारी प्रमाण, शिक्षण म्हणजे साक्षरता, लोकसंख्येची सरासरी वार्षिक आर्थिक प्राप्ती, या व्यतिरिक्त राजकीय हक्क, मानवी हक्क आणि व्यक्तिगत प्रतिष्ठा या गोष्टीही विचारात घेतल्या जातात.[३]

२. विकास म्हणजे उपलब्ध साधनाद्वारे अपेक्षित परिवर्तन घडवून आणण्याची व वाढ करण्याची प्रक्रिया होय.

३. भारताचे माजी अर्थमंत्री श्रीमान सुब्रहमन्यम यांच्या मते, ''विकास म्हणजे नैसर्गिक साधनाचा पध्दतशीर शास्त्रीय व एकात्मिक दृष्टीने उपयोग करणे होय.''[४]

## ३.३ ग्रामीण विकास:

ग्रामीण विकास हि परिवर्तनाची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन ग्रामीण समाजाच्या पारंपारिक राहणीमानाच्या प्रागतिक मार्गात करण्याची प्रक्रिया आहे व हया परिवर्तनाकरिता ग्रामीण जनतेला स्वत:च्या क्षमतेने साधनांनी

स्वत:चा विकास करण्याकरिता सहाय्य करायचे आहे. ग्रामीण विकास हा ग्रामीण जनतेच्या कल्याणाशी संबंधित अशा क्षेत्रातील काही उपक्रमांच्या पुर्ततेचा कार्यक्रम आहे असे अभ्यासातून दिसून येते. ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्दिष्ट समाजाची सर्वांगीण म्हणजे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करणे हे आहे. ग्रामीण विकास प्रक्रिया या अर्थाने लोकांत सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टया परिवर्तन करण्यावर भर देते. दारिद्रय, बेकारी, निरक्षरता यांचे मोठे प्रमाण ग्रामीण अर्थव्यवस्थेत आढळते. त्यामुळे ग्रामीण विकासाला आर्थिक विकासात अधिक महत्वाचे स्थान आहे. आर्थिक विकासाचा वेग हा मुलत: ग्रामीण विकासावर आधारित आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था हा कमी विकसित देशाचा मूलाधार आहे. केवळ नागरी क्षेत्रापुरता आर्थिक विकासाचा विचार करून भागणार नाही.

- **ग्रामीण विकास व्याख्या:**

१. चेस्टर बोल्स: यांच्या मते विकासाचा अर्थ शेती विस्तारापुरती मर्यादित नाही. तर लघुउद्योग, शाळा प्रशिक्षण केंद्र, प्रगत दळणवळण, खेड्यातील विद्युतपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण केंद्र यांची वृध्दी आणि ग्रामीण संस्कृतीला उत्तेजन देणे या बाबींचाही त्यात समावेश होतो.

२. संयुक्त राष्ट्र संघाच्या मते शासनाच्या व लोकांच्या संघटीत प्रयत्नाद्वारे सर्व समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला हातभार लावणारी शिकवणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामविकास होय.[५]

- **ग्रामीण विकास संकल्पना:**

आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण विकास हि संकल्पना अनेक विविध अंगांनी चर्चिली आहे. खेडयांचा संपुर्ण विकास हे ग्रामीण विकासाचे मुख्य सूत्र होय. विकास संकल्पनेचा सर्वसाधारण अर्थ प्रगती

अथवा उन्नती असा होतो. विकासाच्या बाबतीत तज्ज्ञांनी मांडलेली मतांचे प्रगटीकरण या अभ्यासात शास्त्रीय व सौध्दांतिक स्वरूपात करण्यांचा प्रयत्न करण्यात आला. गॉर्डन चाईल्ड यांच्या मते प्रथमत: लेखनकला ही विकासाची पहिली पायरी होय तर धातूचा शोध आणि आमधांचा वापर ही विकासाची दुसरी पायरी होय.[६] मॅक आयव्हर यांच्या मते आर्थिक जीवनातील भौतिक साधने सामाजिक संघटनातील बदल हे विकासाचे एकक मानता येतील. विकासाच्या प्रक्रियेत डॉ. धारूरकर यांच्या मते लोकशिक्षणाचा प्रसार करणे, निर्मुलन तसेच सामाजिक व आर्थिक विकासासाठी प्रसार माध्यमांचा सहभाग महत्वाचा असतो.[७] विकास हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विकासात लोकसहभाग आवश्यक असतो.

अलेक्स थिओ यांच्या मते, कुठलाही समाज हा विशिष्ट कालावधीनंतर सामाजिक संस्थाचा विकास करीत असतो. या संस्थांद्वारे समाजातील रीती, श्रध्दा, कार्यपध्द्ती यांचा विकास समाजाच्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी वापर केला जातो.[८] अशा नव्या संस्था विकसित करणे म्हणजे विकासाला चालना देणे असते. विकास हि चर्चा चिंतन व विचारांवर आधारलेली प्रक्रिया आहे.

आरची यांच्या मते:

It is the dialogue and the discussions that are started among the media audience that leads to the development whether it is politics or social habits the media has the potential to implant the germs of new ideas in the minds of audience. The role of the media in developing countries like India therefore becomes very important.[9]

''भारत एक विकसनशील देश आहे येथील जवळपास ७२ टक्के लोकसंख्या खेडयात राहते त्यामुळे देशाच्या विकासात ग्रामीण विकासाला महत्व प्राप्त होते. जर भारताला विकसित देश बनवायचे असेल तर

ग्रामीण विकासाला प्राधान्यक्रम दिलाच पाहिजे. अनेक पंचवार्षिक योजनात ग्रामीण विकासासंबंधी कार्यक्रमाना विशेष महत्व दिले आहे. सामुदायिक विकास आणि पंचायतराजच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे अनेक कार्यक्रम राबवले जात आहेत. थोडक्यात ''भारत गावाचा देश आहे आणि शेवटी ग्रामीण विकास हाच भारताचा विकास होऊ शकतो आणि हेच एक महत्वपुर्ण सर्वमान्य तसेच स्वयंसिध्द तथ्य आहे, वास्तव आहे.''[१०] ''ग्रामीण विकास एक लवचिक संकल्पना आहे तिचा लोक आपल्या बौध्दिक कुवतीनुसार आणि आवश्यकतेनुसार अर्थ लावतात. प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी ग्रामीण विकास कार्यक्रमांना प्राथमिकता देणे म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण विकास कार्यक्रमात कृषी विकास, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण आरोग्य, शिक्षण, दळणवळण साधने यात सुधारणा, ग्रामीण गृहनिर्माण, राहणीमानाचा दर्जा उंचावणे विविध ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी करणे व त्याद्वारे लोकांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणने इत्यादी बाबींचा समावेश होतो. थोडक्यात ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास अर्थात, आर्थिक, राजकीय, भौगोलिक व प्रशासकीय विकास म्हणजे ग्रामीण विकास होय.[११] ग्रामीण विकास ही एक अशी संकल्पना आहे की, तिला समजणे सहज सोपे आहे. परंतु परिभाषित करणे कठीण आहे. ग्रामीण विकास हा शब्द ग्रामीण आणि विकास या दोन शब्दांचा बनलेला आहे. त्याचा आशय गावाच्या समग्र विकासाशी संबंधीत आहे. असा एक समुदाय जो निश्चित संख्येने ग्रामीण क्षेत्रात राहतो त्याला गांव असे म्हणतात. त्या गावाचा सर्वांगिण विकास म्हणजे ग्रामीण विकास होय.

विकासनीती १९७५ नुसार, ग्रामीण विकास एक अशी रणनीति आहे कि ग्रामीण भागातील गरीब, निर्धन, अल्पभूधारक, सिमांत शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात सुधारणा घडवून

आणते. पार्थसारथी यांच्या मते, 'ग्रामीण विकासाचा संबंध मानवी आणि भौतिक साधनांचा सदउपयोग करून, गरीबांच्या राहनीमानात सुधारणा करणे व त्यांचा जीवनस्तर उंचावणे हा आहे'. यासाठी पैसा आणि तंत्रज्ञान यांचा चांगला उपयोग व गरीबांची सक्रीय भागादारी आवश्यक असते. अंकर देशमंड यांच्या मतानुसार, ''ग्रामीण विकास प्रक्रिया, ग्रामीण क्षेत्रातील कृषी, व्यापार, पशुपालन, मत्स्यपालन, ग्रामीण उद्योग आणि हातमाग यासारख्या सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात उपलब्ध मानवी आणि भौतिक साधनांचा, ग्रामीण जनतेचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, तसेच त्यांची सक्रीय भागीदारी, व्युहरचना, नीती व कार्यक्रम यांचा समन्वय आहे.[१२] विनोबा भावे यांच्या मतानुसार, ''गावाची लक्ष्मी पाच मार्गानी शहरांकडे जाते, ते मार्ग आहेत, बाजार, विवाह, सावकार, सरकार व व्यसन''. हे पाच मार्ग आडवल्यास गावची लक्ष्मी गावात थांबेल. गावाला गोकुळ बनवावे लागेल तरच ग्रामीण अर्थव्यवस्था आदर्श गाव उभा करू शकेल. उमा लैली यांच्या मते, ''ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या अनेकाअनेक कमी उत्पन्न गटातील लोकांच्या जीवनस्तरात किंवा राहणीमानात सुधारणा घडवून आणणे तसेच त्यांच्या विकासक्रमाला आत्मनिर्भर बनविणे होय.[१३] वरील अनेक विचारवंतांच्या व्याख्यांवरून ग्रामीण विकासाच्या संकल्पनेविषयी पुढील निष्कर्ष मांडता येतील.

१. ग्रामीण म्हणजे, 'ज्यांचा व्यवसाय, सामाजिक संघटन आणि राहणीमानाची शैली गैरशहरी आहे व मुख्य व्यवसाय शेती किंवा शेतीवर आधारित आहे.
२. विकास म्हणजे तांत्रिक, औद्योगिक, वैज्ञानिक इत्यादी क्षेत्रातील प्रगती किंवा वाढ होय. यावरून ग्रामीण विकास म्हणजे..

१. ग्रामीण भागाचा विकास होय.

२. शहरी क्षेत्राबाहेर राहणाऱ्या लोकांचा जीवनस्तर उंचावण्याचा व त्यांना किमान आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा सामुहिक प्रयत्न होय.

३. हि एक व्यापक संकल्पना असून जी संपूर्ण समाजाला समग्र विकास करण्याशी संबंधित आहे. यामध्ये आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या योजना अधिक महत्वपुर्ण असतात. तसेच हि अशी एक सतत चालणारी प्रक्रिया आहे की, जी अनेक क्षेत्रे आणि विभागाकडून सामुहिक प्रयत्नाद्वारे संचलित केली जाते.

४. ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू निर्धनता निवारण, कृषीविकास, श्रमिक, शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी यांच्या समस्यांवर केंद्रीत झाला आहे.

५. हि संकल्पना समाजाच्या पारंपारिक प्रवृत्तीच्या ठिकाणी एका सुनियोजित, वैज्ञानिक, समयानुकूल तसेच बहुआयामी प्रवृत्तीची स्थापना करते.

६. सामाजिक, आर्थिक, राजकीय व भौतिक विकासाच्या उद्देशाने नियोजित पध्दतीने परिवर्तन घडवून आणने हि ग्रामीण विकास प्रशासनाची रणनीती आहे.

७. ग्राम व ग्रामवासियांची सभ्यता आणि संस्कृती सुरक्षित ठेवून त्यांना आधुनिक समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि स्वाभिमानपुर्वक जीवन जगण्याचा स्तर प्राप्त करून देणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख लक्ष्य आहे.

- **ग्रामीण विकास संकल्पनेचा विकासः**

भारतात 'ग्रामीण विकास' या संकल्पनेच्या सुत्रीकरणाला महात्मा गांधींच्या या विधानापासून सुरूवात झाली की, ''भारत खेडयांचा देश आहे. भारताचा आत्मा खेडयात निवास करतो, जोपर्यंत खेडयांचा विकास होणार नाही तसेच ते पुर्वीसारखे स्वयंपुर्ण होणार नाहीत तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही.''[१४] ग्रामीण विकासासंबंधीच्या या धोरणाला

अनुसरूनच प्रथम पंचवार्षिक योजनेत कृषी विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते. परंतु पं. नेहरूंनी त्यानंतर औद्योगिक विकासावर भर दिला होता. पं. नेहरू नंतर पंतप्रधान पदावर आलेल्या लालबहादुर शास्त्री यांनी ‘जय जवान जय किसान’ हा नारा देऊन कृषी विकास म्हणजेच ग्रामीण विकासाला प्रतिष्ठा मिळवून दिली. श्रीमती इंदिरा गांधी यांनीही ग्रामीण विकासाचा मार्ग प्रशस्त केला. महान सर्वोदायी नेते श्री. जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीच्या आव्हानाने ग्रामीण विकास संकल्पनेला अप्रत्यक्षरूपाने बळ प्रदान केले. ग्रामीण अर्थतज्ञ व माजी पंतप्रधान श्री. चरण सिंह यांच्या ग्रामीण विकाससंबंधीच्या दृढविचारांनी १९७० च्या दशकात प्रशासकांना आणि राजनीतीतज्ञांना ग्रामीण विकाससंबंधी विचार करण्यास आणि योजना बनविण्यास भाग पाडले होते. माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी आपल्या कार्यकाळात ग्रामीण विकास आणि पंचायतराज व्यवस्थेच्या सुधारणेवर विशेष भर दिला होता. पंचायतराज संबंधी झालेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीला त्यांच्याच कार्यकाळात सुरूवात झाली होती. श्री.पी.व्ही नरसिंहराव यांनी ग्रामीण विकासासाठी ७३ व्या घटनादुरूस्तीला मंजूरी मिळविली. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात पंतप्रधान ग्रामसडक योजना, राष्ट्रीय पेयजल योजना इ. योजना ग्रामीण विकासासाठी राबविल्या गेल्या. डॉ. मनमोहन सिंह यांच्या कार्यकाळात माहिती अधिकार अधिनियम २००५, रोजगार हमी कायदा २००५ व इतर अनेक जुन्या आणि नवीन ग्रामीण विकासाच्या योजना व कार्यक्रम राबविले आहेत. अकरा पंचवार्षिक योजनापैकी बहुतांश योजनांमध्ये ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. सन २००० नंतर सामुदायिक विकास कार्यक्रमांतर्गत गावांच्या पायाभूत विकासाला प्राधान्यक्रम देऊन ग्रामीण समुदायामध्ये विकासासाठी जनजागृती केली जात असल्याचे दिसून येते.

- **ग्रामीण विकासाची व्याप्ती:**

''ग्रामीण विकास एक विस्तृत आणि व्यापक विषय आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी त्याच्या व्याप्तीचे किंवा अभ्यास क्षेत्राचे चार भागात वर्गीकरण करता येईल.[१५]

१. **कृषी आणि साहायक क्रिया:**

या अंतर्गत कृषी, पशुपालन, डेअरी उद्योग, कृषीव्यापार, मत्स्यपालन, कुकुटपालन, खाण व उत्खणन, पर्यावरण इत्यादींचा समावेश होतो.

**२.ग्रामीण उद्योग:**

या अंतर्गत खादी व हातमाग, हस्तकला, लोह, तांबे, पितळ, माती यांची भांडी तयार करणे, गुळ, खांडसरी उद्योग, तेलघणा, शेतीचे औजार निर्मिती यांचा समावेश होतो.

**३.सामाजिक सेवा:**

या अंतर्गत शिक्षण, आरोग्य तपासणी व उपचार, कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, जलनिस्सारण, साफसफाई, पर्यावरण संरक्षण इत्यादींचा समावेश होतो.

**४.पायाभुत सुविधा:**

यामध्ये रस्ते, पर्यावरण, संचार, बॅकिंग, विमा, सहकारीसंस्था, इत्यादीचा समावेश होतो.

वरील प्रमाणे ग्रामीण विकासाची प्रमुख चार क्षेत्रे आहेत. या चार क्षेत्रांचा विकास केला तर भारत देश एक सुजलाम् सुफलाम् आणि वैभवशाली देश बनू शकतो. त्यामुळे गरीबी आणि दारिद्रय कमी होईल आणि ग्रामीण विकासाची उदिष्टेहि साध्य होतील.

- **ग्रामीण विकासासंबंधी दृष्टिकोन:**

ग्रामीण विकासासाठी आजपर्यंत भारत सरकारद्वारे अनेक प्रयत्न केले आहेत. त्याचे ज्येष्ठ विचारवंत होशियार सिंग यांनी खालील दृष्टिकोनांमध्ये वर्गीकरण केले आहे.[१६]

१. **बहुउद्देशीय दृष्टिकोन:**

भारतात ग्रामीण विकासाची संकल्पना बहुउद्देशीय दृष्टिकोनापासून सुरू झालेली आहे. उदा. १९५२ साली सुरू झालेला सामुदायिक विकास कार्यक्रम. या दृष्टीकोनात विशिष्ट क्षेत्राचा विकास जनतेच्या सहकार्याने करण्यात येतो. ग्रामीण विकासाचे अनेक धागे एकमेकात गुंतलेले असतात हे या दृष्टिकोनाचे गृहीतक होते. म्हणून प्रथमत: शेतीचा विकास झाला पाहिजे. पुढे काही दिवसातच असे लक्षात आले कि बहुउद्देशीय दृष्टिकोन खुपच व्यापक आहे. समस्त ग्रामीण क्षेत्राचा एकदाच विकास घडवून आणने शक्य नाही. ग्रामीण रस्ते बांधणी, सिंचन, वीज, दळणवळण आणि ग्रामीण उद्योग ही सुध्दा ग्रामीण विकासाची क्षेत्रे आहेत. यासाठी न्युनतम दृष्टिकोन स्वीकारला गेला.

२. **किमान (न्युनतम) पॅकेज दृष्टिकोन:**

या दृष्टिकोनाचा उद्देश विशिष्ट क्षेत्राचा मर्यादित वेळेत सखोल विकास करणे हा होता. या दृष्टिकोनाचा उपयोग शेती उत्पादन वाढविण्यासाठी केला गेला. १९६०—६१ मध्ये सखोल जिल्हा कृषी कार्यक्रमाअंतर्गत शेती विकासासाठी काही क्षेत्रे निवडण्यात आली. याचा लाभ ग्रामीण क्षेत्रातील फक्त सधन शेतकऱ्यांना मिळाला याची उपयुक्तता मर्यादीत असल्यामुळे हा दृष्टिकोन मागे पडलेला दिसून येतो.

३. **लक्ष्य समुह दृष्टिकोन:**

लक्ष्य समुह दृष्टिकोनात एका विशिष्ट समुहाचा सखोल अभ्यास केला जातो. त्यानुसार योजनेच्या प्राधान्यक्रमात बदल केले जातात. जसे लहान शेतकरी, अल्पभूधारक, भूमीहीन, शेतमजूर यांच्या समस्या सधन

शेतकऱ्यांपेक्षा भिन्न असतात. गरीबातल्या गरीब लोकांच्या विकासासाठी ज्या योजना बनवल्या जातात. त्यालाच समुहलक्ष्य दृष्टिकोन असे म्हणतात. हा दृष्टीकोन सेवार्थी बहुमुल्य नमुना प्रस्तूत करतो. ज्यांचे अंतिम ध्येय लाभार्थ्यांना योजना आणि विकासाचे संपूर्ण उत्तरदायित्व हस्तांतरित करणे हे आहे.

**४. क्षेत्र विकास दृष्टिकोनः**

या दृष्टिकोनाअंतर्गत अविकसित क्षेत्रांच्या विकासावर भर दिला जातो. या मध्ये सुक्ष्म (लहान) क्षेत्राला विकासासाठी निवडले जाते. अशा कार्यासाठी देशाच्या मागास भागाना विकासासाठी निवडले जाते.

**५. देशीक विकास दृष्टिकोनः**

ग्रामीण विकासासाठी योजना निर्माण आणि अंमलबजावणीची प्रक्रिया अधिकाधिक गावप्रधान असली पाहिजे. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयात असे म्हटले जाते की, आमच्या जवळ भौगोलिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय संघटनेची आवश्यक, निश्चित आणि विस्तृत उपलब्धता आहे. याचा उपयोग करून शासनाने विकासाच्या स्थानिक क्षेत्रासाठी योजना बनवल्या पाहिजेत. ग्रामीण विकासाचा संबंध राष्ट्रीय विकासाशी निगडीत असला पाहिजे. भारतात नद्याजोड प्रकल्प आणि महामार्ग हि देशीक विकास दृष्टिकोनाची उदाहरणे आहेत.

**६. एकात्मिक ग्रामीण विकास दृष्टिकोनः**

बहुद्देशीय दृष्टिकोनाच्या विरूध्द या दृष्टिकोनाचे क्षेत्र एकिकृत आहे. हि कार्यात्मक योजना आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पुढील चार प्रकारचे विकास कार्यक्रम राबवले जातात.

१. कृषी व कृषीसंबंधित क्षेत्रे. उदा. पशुपालन, मत्स्य, फळबागायत.

२. ग्रामीण विकासासाठी कुशल कारागीर आणि कलाकार यांना एकत्रित आणणे.

३. मजूरांना रोजगार उपलब्ध करून देणे व संघटीत करणे.

४. उपलब्ध साधनसामग्रीचा सदुपयोग करून प्रत्येक व्यक्तीला असे तयार करा की, तो स्वत:ला उत्पादन कार्यात गुंतवून घेईल. सामाजिक दृष्टीने लाभदायक ठरेल आणि त्या मोबदल्यात मिळणाऱ्या उत्पन्नात आपल्या अत्यावश्यक गरजा पुर्ण करील.

भारताच्या संदर्भात एकीकृत ग्रामीण विकास दृष्टिकोनाचा अर्थ असा की, कोणत्याही भागाचा अथवा तेथील लोकांचा एकीकृत विकास तेथील स्थानिक साधने उदा. भौतिक, जैविक, मानवी इत्यादींचा जास्तीत जास्त विकास आणि उपभोग यांच्या माध्यमातून करणे हा आहे. आवश्यक त्या संस्था, संघटना आणि प्रवृत्तींच्याद्वारे आत्मिक परिवर्तन आणले जाऊ शकते. काही संघटीत सेवा जसे आर्थिक क्षेत्र, कृषी आणि ग्रामीण उद्योग यांच्या माध्यमातून सामाजिक रचना आणि आरोग्य सुधारू शकेल. स्वच्छता, पौष्टीक आहार, आरोग्यदायी निवासस्थाने, पिण्याचे स्वच्छ पाणी, साक्षरता इत्यादी सेवा देऊन एकात्मिक ग्रामीण विकासाची स्थिती आणली जावू शकते. शेवटी याचा उद्देशच ग्रामीण गरीब, निर्धन वर्गाचे जीवनमान उंचावणे हा आहे. या दृष्टिकोनात स्व—सेवा आणि समुदायाच्या योगदानाला विशेष महत्व आहे.

## ३.४ ग्रामविकासाचे प्रारूपे:

### १. महात्मा गांधीचे ग्रामीण विकासाचे प्रारूप:

गांधीजींनी ग्रामीण विकासाची जी परिकल्पना केली होती ती एक आदर्श आणि समग्र विकासाची परिकल्पना होती. गावाच्या विकासासाठी ते ग्रामस्वराज्य आवश्यक मानत होते. त्यांची अशी दृढधारणा होती की, ‘‘ग्रामस्वराज्य आज आमच्या देशाची सर्वात मोठी आवश्यकता आहे. जोपर्यंत गाव स्वतंत्र विकसित होणार नाही, तोपर्यंत देशाच्या स्वातंत्र्याला काहिही अर्थ नाही”. आज भारतीय गावांची स्थिती अत्यंत दयनीय, गंभीर व विस्कळीत आहे. ग्रामीण उद्योग संपुष्टात येत आहेत. गावातील

जनता सरकारची मदत आणि सहकार्यावर परावलंबी झाली आहे. सर्व बाजुंनी गाव झिजत आहे. कमजोर दुर्बल गावांचा देश कमजोरच राहणार. सैन्य व शस्त्रास्त्रांच्या बळावर कोणताही देश मजबूत किंवा बलशाली बनू शकत नाही. गावाची सक्षमता हिच देशाची सक्षमता आहे. आणि गावाला सक्षम, मजबूत बनविण्याचा एकमेव उपाय आहे ग्रामस्वराज्याची स्थापना करणे. यापुढे गांधीजी म्हणतात, ''जर भारताला विनाशापासून वाचवायचे असेल.[१७] तर सिडीच्या सर्वात खालच्या पायरीपासून (पायापासून) सुधारणेला सुरूवात करावी लागेल. जर इमारतीचा पाया कमकुवत असेल तर वरच्या (केंद्र) आणि मधल्या (राज्य) मजल्यावर केलेले काम शेवटी पडून जाईल". त्यांच्या मते शहर आणि गाव यांच्या विकासातील परस्पर भिन्नता ही गावाच्या विकासातील मुख्य अडथळा आहे. गावाचे शोषण म्हणजे एक प्रकारची हिंसाच आहे. गांधीजींना भारताची आर्थिकनीती अशाप्रकारे अपेक्षित होती की, त्यामध्ये विकासाचा क्रम गावापासून सुरू व्हावा, प्रत्येक गाव आत्मनिर्भर गणराज्य निर्माण व्हावे हि त्यांची इच्छा होती. हरिजनमध्ये एका लेखात ते लिहितात की, ''स्वराज्याची माझी कल्पना अशी आहे की प्रत्येक गाव स्वतंत्र व स्वयंपुर्ण असे गणराज्य बनावे, केवळ अशा बाबतीत ते दुसऱ्या गावावर अवलंबून असेल, ज्या गोष्टी तेथे उपलब्ध होत नाहीत परंतु त्या आवश्यक आहेत. त्यांच्या मतानुसार आर्थिक आणि राजकीय सत्ता इतकी विकेंद्रीत व्हावी की, त्यामुळे गाव गणराज्य जरी झाले नाही तर कमीत कमी स्वशासनाचा प्रथम, महत्वपुर्ण आणि प्रभावी घटक बनावे. शेती आणि खादी ग्रामोद्योगासंबंधी गांधी म्हणतात. गावाने आपली ताकत लावून शेती उत्पादन केले पाहिजे. शेतीसाठी आवश्यक तो निधी ग्रामकोषाद्वारे उभा करावा. तसेच बाहेरूनही काही मदत घ्यावी. गांधीजींनी अर्थतज्ञांना असे आवाहन केले की, पश्चिमेच्या अर्थशास्त्राला विसरून जा आपले पूर्वग्रह सोडा आणि खेडयात जाऊन तेथील परिस्थितीचे

अवलोकन करा, लोकांमध्ये लोकजीवनाच्या गुणदोषांची चौकशी करा. या ठोस आणि मूलभूत माहितीवर आधारित स्वतंत्र आणि लाभदायक अर्थशास्त्राची रचना करा. जे भारताच्या परिस्थितीला अनुकूल असेल आणि देशातील सामान्य लोकांचा उध्दार करील.[१८]

शेतीबरोबरच खादीचा सिध्दांत मांडतांना गांधीजी लिहितात, ''जर खादीचा प्रचार व प्रसार झाला तर त्याबरोबर ग्राम उद्योगाचे अनेक दरवाजे उघडतील कारण खादी आणि ग्राम उद्योग एकमेकांवर अवलंबून असतात. खादीचे मुख्य साधन चरख्याला गांधीजी जीवनातील सुर्य मानतात तसेच ते ''चरख्याला देशाच्या समृध्दीचे आणि स्वातंत्र्यलढयाचे चिन्ह मानत असत. त्यांच्या मते चरखाच गरीबी आणि बेकारी दुर करू शकतो. भारतात सर्वात मोठी समस्या बेकारीची आहे आणि लोकांना रोजगार देण्याची सर्वात अधिक क्षमता ग्रामउद्योगातच आहे. गांधीजी म्हणतात की, ''पैशाचे अर्थशास्त्र आमच्या दृष्टिकोनाला अंधुक करत आहे.'' जेव्हा अर्थशास्त्र आणि सार्वजनिक जीवनामध्ये ग्रामीण दृष्टिकोनाचा प्रवेश होईल तेव्हा गावात बनलेली प्रत्येक वस्तू अधिकाधिक उपयोगात आणण्यासाठी लोकांचा कल वाढेल. आज संपत्ती खेडयातून शहरात आणि शहरातून विदेशात जात आहे. हा प्रवाह बदलण्याची नितांत गरज आहे. ज्यामुळे संपत्ती खेडयातच राहिल आणि ग्रामवासी स्वावलंबी बनतील. गांधीजी ग्राम स्वराज्य अंतर्गत अशा समाजाची निर्मीती करू इच्छित होते की, ज्यामध्ये एक शोषणविहीत सामाजिक, आर्थिक समानता असेल. विश्वस्त मंडळ सिध्दांताच्या माध्यमातून गांधीजी आर्थिक समानता स्थापित करू इच्छित होते. यावरून गांधीजींना गावाच्या समग्र विकासासाठी राजकीय आणि आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकासही आवश्यक वाटत असे.

गांधीजींना आदर्श अशी समाजव्यवस्था अपेक्षित होती की, ''ज्यामध्ये एक सर्वासाठी आणि सर्व एकासाठी तन मन धनाने सहकार्य

करतील अशा समाज व्यवस्थेला ते सर्वोदय समाज व्यवस्था म्हणत असत. गांधीजींनी नेहरुंना १९४५ साली लिहिलेल्या पत्रात असे लिहिले आहे की, माझ्या आदर्श गावात बुध्दिमान व्यक्ती असतील ते पशुप्रमाणे घाणीच्या साम्राज्यात, अंधकारमय वातावरणात राहणार नाहित. पुरूष आणि महिला स्वतंत्र असतील, प्लेग, अतिसार देवी हे आजार नसतील. कोणी बेकार नसेल, न कोणी ऐश आरामात राहिल, रेल्वे, डाक, तार इ. सुविधा सर्वांना असतील. गावाचे शोषण शहरे करणार नाहित तर शेती व उद्योगधंदे आणि गाव व शहर यांच्यात संपूर्ण समन्वय राहिल. ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींना कॉग्रेस महासमीतीच्या विचारार्थ एक प्रस्ताव ठेवला होता. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, ''भारताला राजकीय स्वातंत्र्य तर मिळाले आहे परंतु आणखी सामाजिक, आर्थिक आणि नैतिक स्वातंत्र्य मिळवणे बाकी आहे. आणि तेही शहराशिवाय म्हणजे भारतातील ७ लाख गावांच्या संदर्भात. यावरून स्पष्ट होते की, गांधीजींचे लक्ष केवळ भौतिक विकास नव्हे तर त्यांच्यासमोर प्रश्न संपूर्ण भारतीय जनतेच्या सर्वांगिण विकासाला होता. ज्याची सुरूवात गावापासून आणि गावातील शेवटच्या गरीब माणसाच्या उत्कर्षापासून व्हावी असे त्यांना वाटत असे. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी खेडयाकडे चला असा मंत्र म. गांधीनी दिला. खेडी स्वयंपूर्ण बनली पाहिजेत असाच त्यांचा आग्रह होता. सध्या गावकऱ्यांचे रोजगारासाठी शहरांकडे वाहू लागलेले लोंढे आणि शहरात निर्माण झोलेले विविध प्रश्न लक्षात घेता हा आग्रह किती महत्वाचा होता हे निदर्शनास येते. आता ही बाब शासनाच्याही लक्षात आली आहे. त्यामुळे विविध विकास योजनांच्या माध्यमातून शासन गावागावात पोहचत आहे. ग्रामसभेला दिलेले अनेक अधिकार, विविध योजनांत गांव हाच मानलेला केंद्र बिंदू, सर्व शिक्षा अभियान, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गांव अभियान आणि आता म. गांधी तंटामुक्त गांव अभियान हे त्याचेच श्रेय

मानावे लागेल.[१९] वरील स्पष्टीकरणावरून गांधीजींची ग्रामीण विकासाची संकल्पना वास्तववादी होती. त्यांचे धोरण सर्वांगिण आणि समतोल विकासासाठी होते. पुढे नियोजन, त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था आणि १९९३ साली झालेली ७३ वी घटना दुरूस्ती या सर्व ग्रामीण विकासाच्या पाऊल खुणांचे मुळ गांधीजींच्या ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत सापडते.

**२. पं. नेहरूंचे ग्रामीण विकासासंबंधी विचारः**

भारताच्या विकासामध्ये पं. नेहरूंचे फार मोठे योगदान आहे. त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले जाते. महात्मा गांधीजींचे पंचायतराजचे स्वप्न साकार करून ग्रामीण विकासासाठी नेहरूंनी प्रयत्न केलेले दिसून येतात. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचे परावलंबीत्व, शेजारील पाकिस्तान व चीन या राष्ट्राबरोबर झालेली युध्दे यामुळे नेहरूना ग्रामीण विकासापेक्षा औद्योगिक विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करावे लागले होते. नेहरूंना असे वाटत असे की, ''अगोदर भारतीय अर्थव्यवस्था मजबूत केली पाहिजे. ज्यामुळे विदेशी मदतीचे परावलंबीत्व संपुष्टात येईल. देशाच्या संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टीनेही ते महत्वाचे आहे. या शिवाय देशाचा आर्थिक विकास होऊ शकणार नाही.[२०] नेहरूंच्या या विकासनीतीमुळे भारताने जगातील औद्योगिक राष्ट्रांमध्ये १०वे स्थान प्राप्त केले आहे. या बरोबरच नेहरूंनी ग्रामीण विकासासाठी खालील प्रयत्न केल्याचे दिसून येतें.

१. संकरीत बी—बियाणे व रासायनिक खतांच्या तंत्रज्ञानाने कृषी उत्पन्नात प्रचंड वाढ झाली यामुळे भारत अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला आहे.
२. सिंचन सुविधा, वीज उत्पादन, परिवहन आणि दळणवळणाच्या क्षेत्रातील सुधारणा अर्थव्यवस्थेला पोषक ठरल्या आहेत.
३. विज्ञान तंत्रज्ञान विकास व व्यवस्थापकीय घटकांची स्थापना व विकास झाला आहे.

ग्रामीण विकासासाठी स्थानिक स्वशासन संस्थांना महत्व देतांना नेहरू लिहतात की, ''स्थानिक स्वशासन लोकशाहीचा मुख्य आधार आहे आणि असायलाच पाहिजेत. आम्हाला अशी काही सवय लागली आहे की, आम्ही उच्च स्तरावर लोकशाहीचा विचार करतो. खालील म्हणजे ग्रामपातळीवर नाही. परंतु जर गांवपातळीवर लोकशाहीचा पाया मजबूत झाला नाही तर लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही. पं. नेहरू लिहतात की, सत्ता किंवा सरकारचे केंद्रीकरण तर आवश्यक आहे पण त्याहीपेक्षा विकेंद्रीकरण अत्यावश्यक आहे. जेव्हा आम्ही सत्तेचे विकेंद्रीकरण करतो तेव्हा ग्रामपंचायतीपर्यंत पोहचू शकतो. जी एक लोकशाहीचे छोटे रूप आहे.[२१] ''लक्षात ठेवा की हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. जसजसे पाऊले पडत गेली तसतसे इंग्रजी राजवट संपुष्टात येऊन स्वराज्य आले, राजेराजवाडेही प्रजातंत्रात सहभागी झाले. जहागिरदारांचा अस्त झाला. हळुहळू या देशाची कार्ये आणि अधिकार वाढत गेले. आता राज्याची सारी सत्ता जनतेच्या हातात आहे. पुर्वी राजा आणि प्रजा हे दोनच घटक होते. आता हे दोनच घटक राहिले नाहीत तर राजा प्रजा झाला आहे आणि प्रजा राजा झाली आहे.''

''२ ऑक्टोबर १९५९ रोजी म. गांधींच्या जयंतीदिनी पं.नेहरू यांनी राजस्थानमधील नागौर येथे 'लोकशाही विकेंद्रीकरणासाठी त्रिस्तरीय पंचायतराजची' स्थापना केली. या प्रसंगी उद्घाटन पर भाषणात ते म्हणाले की, ''माझा हा निश्चय झाला आहे की सत्तेचे आधिकाधिक विकेंद्रीकरण झाले पाहिजे आणि सत्ता गावांना सोपविली पाहिजे. या त्रिस्तरीय व्यवस्थेत ग्रामप्रशासनाचा आधारभूत घटक ग्रामपंचायत असेल परंतु विकास कार्यासंबधीचा मुख्य घटक पंचायत समिती असेल आणि जिल्हा परिषद समन्वय साधने व सल्ला देण्याचे कार्य करेल.[२२] पुढे ते म्हणतात की, ''आपल्या ग्रामसंस्थात हजारो चुका होत असल्या तरी त्यांना सत्तेचे खरे शस्त्र देवूया. नेहरूंनी पंचायतराज संस्थांना, म्हणजे

ग्रामवासियांना चुकत चुकत शिकण्याची संधी दिली. नेहरूंवर गांधीजींचा आणि रशियातील समाजवादाचा प्रभाव होता. परंतु ''याउलट चीनने कृषीविकास आणि औद्योगिकरण यांचा बरोबरीने विकास केला आहे. चीनी लोक याला 'दोन पायावर चालण्याचा सिध्दांत' असे म्हणतात. त्यामुळे आज चीन जगातील शक्तीशाली आणि बलाढय राष्ट्र बनले आहे. त्यांच्या सफलतेचे गमक रशियाचा साम्यवाद आणि गांधीवादी विचार यांचा संमिश्र स्विकार यात दडले आहे. नेहरूंच्या ध्येयधोरणात अवजड उद्योगांच्या उभारणीला चालना दिली गेली परंतु कृषी आणि कुटीर उद्योगासंबंधी बनविलेल्या योजना सफलतापूर्वक अंमलात आणल्या गेल्या नाहीत.

यावरून नेहरूंची इच्छा असूनही त्यांच्या काळात अपेक्षेप्रमाणे भारताचा ग्रामीण विकास होऊ शकला नाही असे दिसून येते.

**३. श्री. अण्णा हजारे यांचे ग्रामीण विकासासंबधी विचार (राळेगणसिध्दी प्रारूप):**

मानवी सभ्यतेच्या प्रत्येक युगात काही व्यक्ती विनाशात्मक किंवा नकारात्मक प्रवृत्तीच्या असतात तर काही व्यक्ती व्यापक सार्वजनिक हित किंवा समाजकल्याणकारी विचाराने प्रेरीत होऊन सकारात्मक कार्य करत असतात. त्यापैकी म. गांधीजींची प्रेरणा घेऊन ग्रामीण विकासासाठी कार्य करणारे एक व्यक्तीमत्व म्हणजे श्री. अण्णा हजारे होय.

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयातील राळेगणसिध्दी हे गांव अण्णा हजारे यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यांची प्रेरणा, पुढाकार आणि मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी अत्यंत दुरावस्थेतून समृध्दीपर्यंत वाटचाल केली आहे. त्यांनी प्रामुख्याने सामाजिक सुधारणा, जलसंधारण, भूसंधारण, वृक्षारोपण, चारा संरक्षण, प्रगत शेती, प्रगत पशुपालन, अन्न बॅक, ग्रामोद्योगांचा विकास, बालविकास, शैक्षणिक विकास, आरोग्य, व्यसनाधिनता व कुटुंबकल्याण विषयक जनजागृती

करून अभूतपूर्व विकास केला आहे. या संपूर्ण यशाच्या पाठीमागे तेथील नागरिकांचे सामुदायिक कार्य, राज्यसरकारचे सहकार्य आणि श्री. अण्णा हजारे यांनी स्वयंसेवी भावनेने केलेले कार्य, त्यांचे सरळ, सुहृदय आणि समर्पित व्यक्तीमत्व व प्रेरणादायी नेतृत्व याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व घटकांचा सहभाग आहे. त्यामुळे राळेगणसिध्दी देश विदेशातील सामाजिक, राजकीय नेते, राज्यकर्ते, प्रशासक, आणि स्वयंसेवी संस्था यांच्या श्रध्दामिश्रित आकर्षणाचा केंद्रबिंदू बनले आहे.

**अण्णा हजारे यांची ग्रामीण विकासासंबंधी पंचसूत्री:**

श्री. अण्णा हजारे यांनी ग्रामीण विकासासाठी खालील पाच सूत्रांची अंमलबजावणी करून राळेगणसिध्दी परिक्षेत्राचा विकास घडवून आणला आहे.

१. **नसबंदी** : राळेगणसिध्दी मध्ये सर्वांना कुटुंब नियोजन सक्तीचे असून सर्व गावकऱ्यांनी त्याचा स्विकार केला आहे. तेथील प्रत्येक दांम्पत्य दोन अपत्यांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेते. तसेच गावात सर्वांना आरोग्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गावात मातृत्व शिक्षण केंद्र सुरू करण्यात आले असून तेथे दोन प्रशिक्षित दायी काम करतात. त्यामुळे सर्वांना कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे महत्व पटले आहे.

२. **नशाबंदी** : १९७५ साली श्री. अण्णा हजारे सैन्यातून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन आले त्यावेळी ग्रामस्थ अत्यंत बिकट परिस्थितीत जीवन जगत होते. गावातील २००० लोकसंख्येपैकी १५ ते २० टक्के लोकांनाच दोन वेळेचे अन्न मिळत होते. ५० ते ६० टक्के लोक खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन उदरनिर्वाह चालवत असत. शिक्षण आणि आरोग्याची दयनीय अवस्था होती. गरीबीने त्रस्त लोक त्या परिसरात ४० दारूच्या हातभट्टया चालवत असत. अशा स्थितीत अविवाहीत अण्णांनी आपला नोकरीचा आलेला सारा पैसा यादवबाबा मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी वापरला आणि तेथेच आपला मुक्काम

ठोकला. या मंदिरात बसून त्यांनी लोकांचे प्रबोधन करायला सुरूवात केली. लोकांना आपापसातील मतभेद विसरून, सदभावपूर्ण चर्चा करून सर्वसंमत निर्णय घेण्यासाठी सामूहिक भावना निर्माण केली. अण्णांनी संकल्प, समर्पण आणि समाजकार्याने प्रभावित होऊन ध्येयवादी आणि निर्व्यसनी युवकांचा एक गट तयार केला आहे. त्यांच्या मदतीने अण्णांनी संपूर्ण गांव निर्व्यसनी केले आहे.

३. **चराईबंदी** : राळेगणसिध्दीच्या चहुबाजूने ५०० एकर डोंगरदऱ्यांचा प्रदेश आहे. अण्णांनी ग्रामस्थांच्या मदतीने त्यामध्ये जवळपास ४ लाख झाडे लावली आहेत. त्या झाडांचे संवर्धनासाठी त्यावर गुरे चारण्यास पूर्णत: बंदी घातली आहे. परंतु चारा कापून नेण्यास सर्वांना परवानगी देण्यात आली आहे. वनीकरणामुळे हा परिसर निसर्गरम्य आणि मनोहर बनला आहे.

४. **कुऱ्हाडबंदी :** राळेगणसिध्दीच्या संपूर्ण शिवारात पुर्णत: कुऱ्हाडबंदी लागू केली आहे. त्यामुळे जुने वाटलेले आणि धोकादायक असेच वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात येते. कुऱ्हाड बंदीमुळे वृक्षतोडीला लगाम बसला आहे.

५. **श्रमदान :** राळेगणसिध्दी मध्ये गावातील प्रत्येक व्यक्तीला महिन्यातून दोन दिवस स्वेच्छा श्रमदान अनिवार्य आहे. या श्रमदानात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, नालाबांध, पर्वतरागांवर समतल चर खोदने, पाझरतलाव बांधणे त्यांची दुरूस्ती करणे इत्यादी कामे केली जातात. गावकऱ्यांच्या श्रमदानातून १९७५ ते १९८२ या कालावधीत दोन पाझर तलाव, ३०नालाबांध, ८५ विहिरी आणि ८ बोअरवेल घेतले आहेत. त्यामुळे ११०० एकर जमीन बारमाही बागायती झाली आहे. तसेच जलसंधारणाच्या कामामुळे जमीनीतील पाण्याची पातळी वाढली आहे. आणि भूसंधारणामुळे जमिनीची सुपीकता वाढली आहे.

या शिवाय गावात एक अन्न बॅंक, एक दुध डेअरी सुरू करण्यात आली आहे. १० वी पर्यंत शाळा, वस्तीगृह, खेळाचे मैदान, शौचालये, बायोगॅस, निर्धुर चुली, दलीत सवर्ण एकता इत्यादी सुधारणा करण्यात आल्या आहेत. गावात सामुहिक विवाह आयोजित केले जातात. महिलांचे बचतगट आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे गावचा कारभार संपूर्णत: लोकशाही पध्दतीने ग्रामसभेच्या माध्यमातून चालतो.[२३]

**राळेगणसिध्दीची सर्वसाधारण माहिती:**

राळेगणसिध्दीचे एकूण भौगोलिक क्षेत्र ९८२.३१ हेक्टर इतके आहे. त्यापैकी लागवडीलायक क्षेत्र ७१०.९४ हेक्टर आहे. पोट खराबा आणि नदयानाले क्षेत्र अनुक्रमे ३६.६६ हेक्टर आणि १०.१८ हेक्टर आहे. शिव आणि गायरान क्षेत्र अनुक्रमे १.१७ हेक्टर आणि ११.४४ हेक्टर इतके आहे. फॉरेस्ट आणि रस्ते व मार्ग यांचे क्षेत्र अनुक्रमे १९४. २८ हेक्टर इतके आहे. तलाव आणि गावठाण यांचे क्षेत्र अनुक्रमे २.३१ हेक्टर आणि ४.०० हेक्टर आहे. गावात एकूण ८६ विहिरी आहेत. त्यापैकी खाजगी ८१, सामुदायिक ४ आणि सार्वजनिक १ आहेत. त्या गावाची सरासरी भुगर्भातील पाण्याची पातळी १८ मीटर इतकी खोल आहे. तर एक पाझर तलाव आहे. संपूर्ण गावाच्या क्षेत्रामध्ये १२ बंधारे घातलेली आहे. गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा योग्य प्रकारे केलेली आहे. त्यासाठी ७ हातपंप आणि नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

जनगणना २०११ नुसार गावातील एकूण लोकसंख्या २३१७ त्यापैकी पुरूष १२८० आणि स्त्रीया १०३७ आहेत. एकूण कुटूंबसंख्या ३९४ असून त्यापैकी अनुसूचित जाती ४४ आणि अनुसूचित जमातीचे ९ कुटूंबे आहेत. एकूण मतदार १२९० आहेत. दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची संख्या ७२ आहे. गावातील एकण घरे ४५३ आहेत. त्यापैकी ४२७ पक्की, २६ कच्चे आणि ६ कुटुंबे पत्र्याच्या घरात राहतात. तसेच गावाच्या बाजूला गावांतर वाडया व वस्त्या आहेत.

राळेगणसिध्दी या गावातील व्यवसायाचे वर्गीकरण करतांना असे दिसुन येते की, गावात शेतीव्यवसायाचे प्राधान्य आहे, हॉटेल व्यवसाय किराणा व्यवसाय दिसुन आले. गावात प्रामुख्याने मुग, बाजरी, ज्वारी, कांदा ही पिके घेतली जातात. गावात १ पशुवैद्यकीय दवाखाना, १ प्राथमिक शाळा, ४ आंगणवाडया, १ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, आणि उर्जेसाठी अपारंपारिक स्त्रोताचाही वापर करतात. त्यामध्ये ५ सोलर हिटर, आणि ११ बायोग्यास आहेत. जवळपास सर्व कुटूंबाना शौचालये आहेत. सन २००८ मध्ये निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेला आहे.

राळेगणसिध्दी या गावाची प्रमुख वैशिष्टये म्हणजे दरवर्षी २ ऑक्टोबरला ग्रामपरिवर्तन दिन आणि चैत्र महिन्यात पद्मावती उत्सव साजरा केला जातो.[२४]

## ३.५ अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्दी ग्रामीण विकासातील योगदान:

### अ) भौगोलिक परिस्थितीचा सदउपयोग:

श्री. संत यादवबाबांच्या मंदिरात बाबांच्या कृपाशिर्वादाने विकासकामांची मुहूर्तमेढ रोवली गेली. बाबांचे मंदिर समाजश्रध्देचे अढळ स्थान बनले. ग्रामसभा याच मंदिरात अण्णांच्या कल्पनेतून अस्तित्वात आली. व्यसनमुक्तीचा निर्णय याच ग्रामसभेने एकमुखाने घेतला. त्याला प्रचंड यश लाभले. गावाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी जलसंधारणा विकास कार्यक्रम श्रमदानाच्या माध्यमातून राबवायला सुरूवात झाली. पाणलोटक्षेत्र विकास हा ग्रामविकासाचा आत्मा आहे. पाणलोट विकासासाठी राळेगणसिध्दीची परिस्थिती अनुकूल आहे. गावाच्या तीनही बाजूंनी डोंगर टेकडयांचा सुपीक परिसर, त्याचा सदउपयोग, पाणी अडविण्यासाठी होऊ शकतो या विचाराने ग्रामस्थांनी डोंगराच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना जलशोषक चर खोदून पूर्ण केली.

पाणी हे जीवन आहे, त्याचा वापर योग्य पध्दतीने व्हायला हवा. त्यासाठी उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन, नियोजन केले तर पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी जलव्यवस्थापन कार्यक्रम हाती घेण्यात आला. राळेगण सिध्दी परिसरात वर्षाला सरासरी ४५० ते ५०० मिलीमीटर इतका अल्प पाऊस पडतो. या अल्प पावसाच्या पाण्याचे नियोजन सुसंबध्द पध्दतीने केले. गावातील जमिनीचे क्षेत्रफळ ६६८.९४ हेक्टर आहे. १३० हेक्टर जमीन वनभूमीखाली येते. तर इतर क्षेत्र गावठाण डोंगरभाग कुरण यात विभागली आहे. दोन हजारावर असणाऱ्या लोकसंख्येला या क्षेत्रामधून अल्प पावसामुळे पुरेसे अन्नधान्य मिळू शकत नाही. असणाऱ्या क्षेत्रामध्ये पुरेसे उत्पादन मिळावे यासाठी जलसंधारणाचे नियोजन केले.

डोंगरगावर माथा ते पायथा हा प्रकल्प राबवून जलशोषक चर खोदण्यात आले. लघुपाटबंधारे विभागाच्या वतीने पठारदऱ्यात सन १९७२ साली ८ लाख ८३ हजार रूपये खर्चून एक पाझर तलाव बांधण्यात आला होता. पण हे काम सरकारीच. नावाप्रमाणेच तलाव पाझरणारा निघाला. पाऊस थांबला त्याबरोबरच तलावातील पाणी पाझरून तलाव कोरडा झाला. तलावाच्या पायाबरोबरच बंधाऱ्याचे कामही निकृष्ट असल्याने पाणी थांबत नव्हते. ग्रामस्थांच्या सहकार्याने अण्णांनी श्रमदानाच्या माध्यमातून त्याची दुरूस्ती केली. त्यामुळे अल्प प्रमाणात पाण्याचा पाझर होऊन त्याखालील विहिरींना पाणी राहू लागले. तलावाच्या दुरूस्तीबरोबरच गावातील पूर्व—पश्चिम वहाणाऱ्या दोन ओढयांवर ग्रामस्थांच्या सहकार्याने श्रमदानाच्या माध्यमातून ३० लाख ५८ हजार रूपये खर्च करून १८ नालाबंध, ५ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, ४ गॅबीयन स्ट्रक्चर तर ५ लाख ४४ हजार रूपये खर्चून ५ सामुदायिक विहीरी बांधण्यात आल्या. पडलेल्या पावसाचं पाणी नालाबांधात अडवले जाऊ लागले. पाणलोटाचं पाणी ज्या ओढयातून वहाते त्या ओढयांचे

खोलीकरण, रूंदीकरण जे.सी.बी. यंत्राच्या सहाय्याने करण्यात आले. त्यामुळे ओढा—नाल्यात अधिक प्रमाणात पाणी साठून राहू लागले. पर्यायाने पाणी जमीनीत जिरून भूजल पातळी वाढण्यास मदत झाली.

विहीरी पाण्याचे भरून राहू लागल्या. खरीपाच्या पिकांबरोबर रब्बी हंगामाची पिकेही शेतात डोलू लागली. त्यामुळे ग्रामस्थांचा उत्साह वाढला. ७० ते ८० हेक्टर बागायत असणारं क्षेत्र एक हजार एकरापर्यंत पोहचलं. शेतकऱ्यांनी नगदी पिकांच्या लागवडीवर भर द्यायला सुरूवात केली. कांदा, भाजीपाला यासारख्या नगदी पिकांमुळे शेतकऱ्यांच्या हाती थोडा फार पैसा येऊ लागला.

पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्याचं महत्व लोकांना पटले. त्यामुळे पाण्याचे नियोजन काळजीपूर्वक होऊ लागलं. पाणी जमिनीला देण्याऐवजी पिकांना दिलं तर जमिनीचा कस टिकून राहून पिकं जोमदार येतात. त्यासाठी अलिकडच्या काळात अनेक शेतकऱ्यांनी ठिबक, तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब करत आपली शेती फुलविली.

राळेगण सिध्दीची भौगोलिक परिस्थिती अनुकूल असल्याने पडलेल्या पावसाचे पाणी मोठया प्रमाणावर उपलब्ध होते. येणारे पाणी सरळ वाहून जाऊ नये म्हणून भूमिगत बंधारे, नालाबंध बांधले गेले. त्यामुळे ओढयात पाणी साठू राहू लागले. पण डोंगरावर पडणारे पाणी पाणी कुठलाही अडथळा नसल्यामुळे वेगात पायथ्याकडे वहात येते. त्याबरोबरच येणारी माती खाली असणाऱ्या तलाव, नालाबांधात साठू लागल्याने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेण्यात आली. अल्पावधीतच उजाड असणारी माळरानं, डोंगरभाग, सखलभाग याचबरोबर दुतर्फा रस्ते हिरवाईनं मनमोहक दिसू लागले. भर उन्हाळयातही डोळयांना शीतल, शांत करणारी हिरवाई पर्यटकांचे खास आकर्षण बनली.

**ब) 'वृक्ष' मानवी जीवनाचा आधार:**

डोंगराच्या कुशीतलं माझं हे गाव।

हिरवाईचा शालू पांघरून कसं हे नटलं।।

डोंगर दऱ्यातलं अवखळ हे पाणी।

लपंडाव खेळतं झाडाझुडुपांशी।।

ओढ लागते त्याला समिंदराची।

जशी आस बाळाला मातेची।।

वृक्ष मानवी जीवनाचा श्वास आहे. ढगांना आकर्षित करणारे चुंबक आहेत. डोळयांना शीतलता देणारे शीतवाहक आहेत. वातावरण स्वच्छ व शुध्द राखणारे दूत आहेत. पण माणसाने वृक्षराजीचं महत्व कधी लक्षातच घेतलं नाही. पूर्वी माणसांनी स्वार्थासाठी वृक्षतोड केली होती. त्यामुळे डोंगर उघडे—बोडके झाले होते. निसर्गाचा हिरवागार अलंकार लोकांनी अक्षरशः ओरबाडून घेतला होता. पण त्या निसर्गाला परत काही दिलं नव्हतं. माणसाची ही प्रवृत्तीच असते. स्वार्थासाठी दुसऱ्याकडून घेत रहायचं पण देणं मात्र मुळीच नाही. जीवन जगताना उसनवारीचा व्यवहार करावा लागतो याचं माणसांना भान नव्हतं. त्यामुळे वृक्षराजीचा अंत झाला होता. तेच सौंदर्य पुन्हा मिळवून देण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प राबवल्यानंतर गावात वृक्षारोपणाचा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला. सामाजिक वनीकरण, वनविभाग यांच्या सहकार्याने आणि अण्णांच्या मार्गदर्शनाने ग्रामस्थांनी वृक्षारोपणाचा धडाका लावला. यामध्ये बालचमूही मागे राहिला नाही. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळेतील मुलांनी रोपांची—बियाणांची लागवड करून खतपाणी घालून त्यांचे योग्य त्या प्रकारे संवर्धन केले. हिरवी मनं, हिरवे हात एकत्र आले आणि उजाड, ओसाड राळेगण सिध्दीच्या शिवारा—शिवारात वृक्षराजींनी आपल्या हिरवाईचं अस्तित्व निर्माण केलं. जलशोषक चरांच्या कडेला घायपातासारखी वनस्पती लावल्याने जमिनीची धूप थांबली.

मोठमोठया वृक्षांच्या मुळाद्वारे जमिनीत पाणी मुरू लागले. माणसाला लागणारा प्राणवायू झाडांपासून मिळू लागला. मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारा पर्यावरणाचा संमतोल राखून ठेवण्यास वृक्ष मोठी मदत करतात. हे सर्व लक्षात घेऊन सातत्याने दरवर्षी पावसाळयात थोडयाफार प्रमाणात का होईना वृक्षारोपण केले जाते. आजपर्यंत सुमारे ४ लाखांच्या आसपास असणारी ही वनराई राळेगण सिध्दीला भेट येणाऱ्या लोकांच्या आकर्षणाचा विषय ठरली आहे. घनदाट वृक्षराजी, रस्त्याच्या दुतर्फा गगनाला भिडलेले वृक्ष दिसले की समजायचं हे राळेगण सिध्दी आहे, अशी चर्चा पर्यटकांमध्ये होत असते. त्यामुळे वनराई ही राळेगणसिध्दीची आणखी एक ओळख झाली आहे.

शेतकऱ्यांना औतकाठीसाठी लाकडाशिवाय पर्याय नसतो. पण एक झाड तोडण्याअगोदरच दोन झाडे लावावीत. त्यांचं संगोपन, संवर्धन करावं हा अण्णांचा सल्ला प्रत्येक गावकऱ्यानं मनापासून स्वीकारला. आता तर राळेगण सिध्दीच्या वनराईला वनौषधींचे कोंदणही लाभले आहे. मानवी जीवनाला वरदान ठरणाऱ्या वनौषधींची लागवड हा महत्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. लक्ष्मीतरूसारखी वनौषधी राळेगण सिध्दीच्या वनराईची शोभा वाढवणार आहे तर अल्पायुषी असणाऱ्या वृक्षांच्या जवळच दिर्घायुषी असणाऱ्या वड, पिंपळ, पळस यासारख्या वृक्षांची लागवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी करून त्यांचं संवर्धनही ते करत आहेत. तसं पाहिलं तर निसर्गातील प्रत्येक वनस्पती ही औषधी आहे पण त्याचं आपल्याला ज्ञान नसल्याने माणूस त्यापासून वंचित राहिला. अण्णांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी वृक्षारोपण करून वनराई निर्माण केली. त्यामुळेच डोंगराच्या कुशीत वसलेलं हे छोटसं गाव जणू हिरवाईचा शालू पांघरून बसल्यासारखे वाटते.

राळेगण सिध्दी अवर्षणग्रस्त क्षेत्रातील गाव. मानवी जीवनातलं पर्यावरणाचं महत्व लक्षात घेऊन पाणलोटक्षेत्र विकासाचं काळजीपूर्वक

केलेले नियोजन, जमीनीची धूप थांबवण्यासाठी केलेले वृक्षारोपण, त्यामुळे पूर्वी अवर्षणग्रस्त असलेल्या या गावात, परिसरात अल्प प्रमाणात पाऊस पडला तरी खरीप आणि रब्बीची पिके जोमात निघतात. त्याच जोडीला भाजीपाला, फळबागा या नगदी पिकांचे उत्पादनही आता शेतकरी घेऊ लागले आहेत. कुरणविकास साधून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामस्थांना यश लाभले. वृक्षारोपणामुळे कुरणविकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. डोंगरावरील गवतचाऱ्याची पूर्ण वाढ झाली की त्याचा लिलाव केला जातो. पाणलोट क्षेत्रविकास, वृक्षारोपण, कुरणविकास या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. एकेक प्रकल्प यशस्वी होत गेला की त्यातूनच दुसऱ्या प्रकल्पाची संकल्पना पुढे येत गेली. अण्णांचे मार्गदर्शन, ग्रामस्थांचे सळसळते चैतन्य यामुळे हाती घेतलेला कोणताही प्रकल्प अल्पावधीत यशस्वी होत गेला. श्रमदानाच्या माध्यमातून विकासकामांना वेग आला. वृक्षाचं महत्व समजल्यानेच पुन्हा वृक्षतोड होणार नाही याची काळजी घेण्यासाठी ग्रामस्थांना कुऱ्हाडबंदीची सक्ती करण्यात आली. कुरणविकासासाठी चराईबंदी लागू करण्यात आली. विविध विकास प्रकल्पातूनच हळूहळू राळेगणसिध्दीच्या विकासाची पंचसूत्री तयार झाली. श्रमदान, नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी याच पंचसूत्रीच्या जोरावर राळेगण सिध्दीने आपला विकास कार्यक्रम अविरत चालू ठेवला.[२५]

**क) राळेगणसिध्दीचा ग्रामपरिवर्तन दिनः**

पंडित आणि ज्ञानी यात खूप फरक आहे. ग्रंथवाचनातून पांडित्य येते तर अनुभवातून ज्ञान प्रगट होते. एखाद्या कार्यकर्त्याने आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून त्या दिशेने प्रत्यक्ष कृतिकार्य सुरू केले, काम सुरू केले तर तेच काम त्याचा गुरू बनते. त्यातून त्याचा अनुभव संचित होऊन त्याला सत्यज्ञान प्राप्त होते. श्रीसंत गाडगेबाबा, श्रीसंत तुकडोजी महाराज कुठल्याही शाळा कॉलेजात गेले नव्हते; परंतु त्यांच्यापाशी

अनुभवसिध्द ज्ञानाचे भांडार होते. त्याद्वारे त्यांनी समाजाचे अज्ञान दूर करून आदर्श समाज निर्माण करण्याचा जीवनभर प्रयत्न केला. दिनदलितांची सेवा हीच त्यांनी ईश्वरसेवा मानली. त्याच ध्येयाने राळेगणसिध्दीकरांची वाटचाल सुरू झाली. मानवसेवेतून ईश्वरसेवाकार्य करीत असताना 'कामच, कामाचा' गुरू बनला. त्यातून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व दिशा मिळाली. त्याप्रमाणे काम उभे राहून दुष्काळग्रस्त राळेगणसिध्दीचा उध्दार झाला. तो उध्दार पाहण्यासाठी महाराष्ट्रासह देशातल्या विविध राज्यातून व परदेशातून लोक राळेगणसिध्दीला येतात. राळेगणसिध्दीचा झालेला कायाकल्प पाहून तो नियोजन पध्दतीने झालेला असावा असे त्यांना वाटते; परंतु नियोजन करून राळेगणसिध्दीचा विकास झालेला नाही तर आम्ही अनुभवातून कार्यकर्त्यांना एक नावीन्यपूर्ण कल्पना सुचली, ती 'म्हणजे ग्रामपरिवर्तन दिन' होय. गावात अनुभवातून जे परिवर्तन झाले त्याचा स्मरणदिन अथवा वर्धापनदिन साजरा करण्याचे आम्ही ठरविले. त्याला गावकरी ग्रामपरिवर्तनाचा वाढदिवस म्हणतात. ज्यांनी आदर्श—स्वावलंबी गावाचे स्वप्न बाळगून त्या दिशेने ग्रामोध्दाराचे काम केले त्या महात्मा गांधींचे २ ऑक्टोबर या जयंतीदिनी गावकरी हा परिवर्तन दिन साजरा करतात.

१. वर्षभरात ज्या युवकांचे विवाह झाले, त्यांच्या पत्नीच्या रूपाने गृहलक्ष्मीच गावात आली. त्या सर्व नववधू राळेगणसिध्दी परिवाराच्या सुना आहेत असे मानून आम्ही त्यांना साडीचोळी देतो. खणानारळाने त्यांची ओटी भरून त्यांचे स्वागत करतो. त्यांचा अवघाचि संसार सुखाचा होण्यासाठी त्यांना शुभाशीर्वाद देतो.

२. आजची बालके ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहेत. गावचे तारणहार आहेत. या भावनेतून वर्षात ज्या बालक—बालिका गावात जन्मल्या मग त्या कोणत्याही जातीजमातीच्या अथवा धर्म—वंशाच्या असोत, त्या सर्व बालक—बालिकांना नवीन कपडे देऊन आम्ही त्यांच्या जन्माचे स्वागत

करतो. हि सर्व बालक—बालिका राळेगणसिध्दी परिवारातील आहेत या भावनेने त्यांना शुभ आशीर्वाद देतो. त्यांचे मंगल चिंतितो.

३. अनेक उन्हाळे आणि पावसाळे पाहिलेले अनेक वयोवृध्द पुरूष आणि महिला हे गावचे वैभव आहेत. त्यांचा आदरसन्मान आम्ही राखतो. ग्रामपरिवर्तनदिनी आम्ही त्यांचा गौरव करतो. वयोवृध्दांपैकी ज्यांचे सर्वाधिक वय आहे अशा एक महिला—एक पुरूषाला ग्राममाता—ग्रामपिता मानून त्यांचे सर्व गावकरी पूजन करुन त्यांना वस्त्रदान करतात.

४. जपानमध्ये परिवार नियोजन हे देशभक्तीचे प्रतीक मानतात. वाढत्या लोकसंख्येने आज अधिक लोकसंख्या वाढलेल्या अनेक देशात विविध समस्या निर्माण होत आहेत. वाढत्या लोकसंख्येला अन्न, पाणी, निवास पुरवायला धरती असमर्थ ठरणार आहे. बेरोजगार युवकांची संख्या वाढत आहे. त्यांच्या मूलभूत गरजा भागत नाहीत. लोक वाममार्गाकडे वळत आहेत. त्यामुळे ज्यांच्याकडे आहे व ज्यांच्याकडे नाही अशा सर्वांना जगणे असहाय्य होणार आहे. लोकसंख्येचा स्फोट सर्वांचे भस्म करील. यासाठी परिवार नियोजन ही काळाची गरज आहे. जपानमध्ये अनेक युवक—युवती विवाह करतात; परंतु एका अपत्यानंतर परिवार नियोजन करतात. काही युवक तर अपत्य होऊच देत नाहीत. त्यामुळे चाळीस वर्षांपुर्वी जपानची जेवढी लोकसंख्या होती तेवढीच आज आहे. म्हणून जपान जगात सर्वच क्षेत्रात समर्थ राष्ट्र म्हणून जगात आज आघाडीवर आहे. आपल्या गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी गावची लोकसंख्या मर्यादित राखण्याची गरज आहे. म्हणून राळेगणसिध्दीत ज्या नवविवाहीत वधुवरांनी शस्त्रक्रिया करून एकाच अपत्यावर परिवार नियोजन केले आहे. अशा राष्ट्रभक्त जोडप्यांना सत्कारही ग्रामपरिवर्तन दिनाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात केला जातो.

५. प्राथमिक व शाळेतील जे विद्यार्थी विविध परीक्षेत सर्वाधिक गुण संपादन करून पास होतात, जे विद्यार्थी क्रीडा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती इत्यादी विशेष

क्षेत्रात नैपुण्य संपादन करतात, अशा नैपुण्यसंपन्न विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रात पराक्रम गाजविणाऱ्या युवकांचा गौरव ग्रामपरिवर्तनदिनी उत्सवात गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येतो.

६. राळेगणसिध्दीच्या विकासकामात ज्या बाहेरच्या लोकांचे बहुमोल सहकार्य लाभले. जे राळेगणसिध्दीच्या विकासयात्रेत तन—मन—धनाने सहभागी झाले. अशा समाजसवेक, कार्यकर्ते, नि:स्पृह शासकीय कर्मचारी यांचाही सन्मान ग्रामपरिवर्तनदिनी केला जातो.

अशा प्रकारचा हा ग्रामपरिवर्तन दिन आता राळेगणसिध्दीचा लोकप्रिय ग्रामउत्सव बनला आहे. या दिवशी गौरव समारंभ आटोपल्यावर गरीब—श्रीमंत, स्पृश्य—अस्पृश्य मांडीला लावून एकत्रितरीत्या भोजन करतात. कोणत्याही समारंभात पुरूषांना प्रथम भोजनाचा मान असतो; परंतु आम्ही ग्रामपरिवर्तन दिनी महिलांना प्रथम भोजनाचा मान दिला आहे. गेली सतरा—अठरा वर्षे खंड न पडता राळेगणसिध्दी ग्रामपरिवर्तन दिन उत्साहात साजरा केला जातो. त्यासाठी आबालवृध्द जमतात. होणाऱ्या खर्चासाठी ग्रामस्थ आपल्या इच्छेनुसार वर्गणी देतात. कुणावरही वर्गणीची सक्ती केली जात नाही. अशा कार्यक्रमामुळे आपलेपणाची व एकतेची भावना वाढीस लागते. 'एक गाव एक परिवार' चा विचार गावात रूजायला मदत होते. नवीन पिढीवर अशा कार्यक्रमामुळे चांगले संस्कार होतात. राळेगणसिध्दीपासून प्रेरणा घेऊन अनेक गावात ग्रामपरिवर्तन दिन साजरे होऊ लागले आहेत. [२६]

**ड) ग्रामसभेला अधिकार:**

विविध जाती, धर्म, पंथांनी समृध्द असा लोकशाहीप्रधान देश जगाच्या पाठीवर केवळ भारतच आहे. लोकशाही असणाऱ्या देशामध्ये ग्रामसभेचे स्थान सर्वोच्च आहे. गावात जन्माला आलेल्या १८ वर्षावरील ज्याला मतदानाचा अधिकार प्राप्त होतो तो प्रत्येक नागरिक ग्रामसभेचा निसर्गदत्त सदस्य बनतो. विधानसभेतील वा लोकसभेतील सदस्यांना

राज्य आणि देशपातळीवर सार्वत्रिक निवडणुकीतून निवडून यावे लागते. विधानसभा, लोकसभेचा कार्यकाळ ५ वर्षाचा असतो. पाच वर्षानंतर त्यात बदल होतो. सदस्य होण्यासाठी निवडणुका लढवाव्या लागतात. पण ग्रामसभा सातत्याने वर्षानुवर्षे अस्तित्वात राहते. म्हणूनच लोकशाहीत ग्रामसभेला सर्वोच्च स्थान प्राप्त झालेले आहे. असे असले तरी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयावर सरकार अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करते. राज्याची सत्ता विधानसभेत तर देशाची सत्ता लोकसभेत केंद्रित झालेली असल्याने देशात लोकशाही असूनही सर्व निर्णय मूठभर लोकच घेत असतात. शासन, प्रशासन गतिमान होऊन लोकविकासाच्या कामांना गती देण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे महत्वाचे आहे. देशाच्या विकासाची स्वप्नं ज्यांना पडतात अशी चारित्र्यसंपन्न माणसं राजकारणात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच असतात. देशाचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधींनी असच स्वच्छ, सुंदर, विकसित, विज्ञानयुगात भरारी घेणाऱ्या देशाच स्वप्न पाहिल होत. त्या दृष्टीने त्यांनी पाऊले उचलली होती. राज्याच्या, देशाच्या राजधानीत एकवटलेली सत्ता देशाच्या खेडयापाडयात अस्तित्वात आली तर विकासाला वेग येईल याचा विचार करून त्यांनी लोकसभेत ७३ व्या घटनादुरूस्तीचे बिल पास करवून ग्रामसभांना अधिकार देण्याबाबत कळवले. पण राज्यसरकारांनी ग्रामसभांना हे अधिकार दिलेच नाहीत. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले तर आमदार, खासदार, मंत्री म्हणुन असणारी प्रतिष्ठा कमी होईल, महत्व कमी होईल याचा विचार करून या कायद्याकडे पाठ फिरवली. गावा—गावातील मतदारांवर आपली निरंकुश सत्ता, नियंत्रण राहावे हाच एकमेव राजकारण्यांचा डाव असल्याचे राज्यसरकारने ग्रामसभांना अधिकार दिलेच नाहीत.

२ ऑक्टोबर १९७५ ला अण्णांनी राळेगणसिध्दीत पाऊल ठेवले. सर्वंकष विकास करून गावाचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला.

स्वच्छ, चारित्र्यसंपन्न निर्व्यसनी तरूणांना सोबत घेऊन ग्रामस्थांना आवाहन करत यादवबाबांच्या मंदिरात चर्चेसाठी बोलावले. हिच राळेगणसिध्दीची पहिली ग्रामसभा ठरली. गावातील कोणत्याही विकासकामांना सुरूवात करावयाची असली तरी ग्रामसभा बोलावली जात असे. पुढील काळात झालेल्या विकास कामांचे निर्णयही ग्रामसभेतच झाले. विविध सरकारी योजना गावात राबवल्या जातात. त्याच नेमकं स्वरूप काय असते? त्यासाठी किती निधी सरकारकडून उपलब्ध झालेला असतो याची कुठल्याही प्रकारची माहिती गावपातळीवरील कुठल्याही व्यक्तीला माहित होत नसते. सरकारी अधिकारी सांगेल तेच अंतिम सत्य असायचे. सरकार करत असलेल्या कामात जनतेचा सहभाग हे तत्व प्रमाण मानल गेल. वास्तविक पहाता जनतेच्या कामात सरकारचा सहभाग हे तत्व स्विकारून त्या दृष्टीने अंमलबजावणी व्हायला हवी होती. पण ग्रामविकासाच्या कामात शासन आणि प्रशासन यांची भूमिका हुकुमशहांची होती. यात बदल झाला पाहिजे. गावातील विकासकामे ग्रामस्थांच्या सल्ल्याने व्हायला हवीत यासाठी अण्णांनी आग्रह धरला. सरकार दरबारी पत्रव्यवहार केला. आंदोलनाचे इशारे दिले, आंदोलन केली. सातत्याने १९९४ पासून ग्रामसभांना अधिकार मिळावेत. सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी सर्व मार्गानी प्रयत्न केले. अखेर अण्णांच्या नैतिकतेपुढे राजकारणी डावपेच कमी पडले. २६ एप्रिल २००२ ला सरकारने ग्रामसभेचा कायदा पास केला. पण सत्तेचे विकेंद्रीकरण करेल, जनतेच्या हाती सत्ता देईल ते राजकारणी कुठले. त्यात त्यांनी कायद्याच्या पळवाटा ठेवल्याच. पण जनशक्तीच्या दबावामुळे २१ डिसेंबर २००६ महाराष्ट्र अधिनियम ३८ नुसार ग्रामसभांना जादा अधिकार देण्यात आले.

राळेगणसिध्दीच्या कामासाठी बोलावण्यात आलेल्या गावकऱ्यांच्या बैठकांना अण्णांनी ग्रामसभा म्हणून संबोधले. गावच्या विकासाचे नियोजन

ग्रामसभेत एकमताने मंजूर व्हावेत या उद्देशाने सुरू केलेल्या ग्रामसभांना अण्णांनी कायद्याचे स्वरूप मिळवून दिले. ग्रामसभांना कायद्याने जादा अधिकार मिळवून देण्यासाठी विशेष सुधारणा करण्यात आल्या.

- गावाच्या विकास कामाचा आर्थिक अहवाल प्रत्येक सहा महिन्यात ग्रामसभेत ठेवणे.
- शासकीय जमीन किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करणारी व्यक्ती निवडणुकीस अपात्र ठरवणे.
- एकुण मतदारांपैकी किमान २० टक्के मतदारांनी आर्थिक हिशेब ग्रामसभेसमोर न ठेवण्याची तक्रार केल्यास पंचायतीच्या सदस्याला, उपसरपंचाला, सरपंचाला काढून टाकण्याचा अधिकार दिला.
- आर्थिक व्यवहारांना ग्रामसेवक आणि सरपंच हे संयुक्तपणे जबाबदार असतील.
- खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवण्यास ग्रामसेवकाने कसूर केल्यास त्यावर शिस्तभंगाची कारवाई आदि सुधारणाही या कायद्यात करण्यात आल्या.

ग्रामसभांना जादा अधिकार देऊन नियोजन आणि अमंलबजावणीचे पुर्ण अधिकार मिळत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने प्रजातंत्र, लोकशाही, स्वातंत्र्याचा अनुभव घेता येणार नव्हता, कामकाजात पारदर्शकता येणार नव्हती म्हणूनच अण्णांनी १९९४ पासून सातत्याने २००६ पर्यंत पाठपुरावा करत ग्रामसभांना जादा अधिकार मिळवून दिले. हातात नव्हते कुठले अधिकार, नव्हती सत्ता वा कुठले मंत्रीपद, होती फक्त जनकल्याणाची आस, जबरदस्त इच्छाशक्ती, मानसिकता, नैतिकता आणि यादवबाबांचा कृपाशिर्वाद. २आक्टोबर२०१२ कलम २४३अ शासन निर्णयानूसार वर्षातून केवळ ४ वेळा ग्रामसभा भरविणे बंधनकारक आहे.[२७]

**इ) अण्णांचे राळेगणसिध्दी विषयी महत्वकांक्षा, एक दृष्टीक्षेप व अण्णांचे जीवन:**

भारताच्या विकासामध्ये खेडयांना आदर्श व स्वावलंबी बनविणे हा अण्णा हजारे यांचा विचार क्रांतीकारक व महत्त्वाचा विचार ठरतो. माझे गाव हेच विकासाचे तीर्थ आहे, अशी अण्णांची विकास दृष्टी होय. ग्राम परिवर्तन ही संकल्पना स्पष्ट करताना अण्णा हजारे म्हणतात,'कार्यकर्त्यांनी ध्येयवाद ठरवून ध्येयवेडा होऊन जेव्हा जे कार्य करीत असतात तेव्हा मीच कामाचा गुरू होऊन पुढील कामांचे ज्ञान होत असते. कारण ज्ञानाचा उगम हा फक्त पुस्तकातूनच होत नाही तर तो अनुभवातून होत असतो'. संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज कोणत्याही कॉलेजमध्ये गेले नव्हते पण अगाध अशा ज्ञानाचे भांडार त्यांच्या ठिकाणी होते.

अण्णा हजारे यांनी आपल्या गावचे चित्र बदलून टाकले. पाणीप्रश्न हा गावच्या विकासाचा आत्मा आहे, हे त्यांनी ओळखले. त्यांनी म्हटले आहे.

२००० लोकसंख्या असणाऱ्या लहानशा राळेगणसिध्दीसारख्या गावात जिथे वर्षाला ४०० ते ५०० मि.मि. पाऊस पडतो आणि पडलेल्या पावसाचे पाणी वाहून जात असल्यामुळे गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत होती. वर्षाला पुरेसे अन्नधान्य पिकत नसल्याने ७० टक्के लोक बाहेरचे धान्य आणून खात असत. हाताला काम नाही, पोटाला पुरेसे अन्न नाही म्हणून ३० ते ३५ दारूच्या हातभट्टया चालवून काही माणस आपला चरितार्थ चालवीत असत आणि मोठया प्रमाणावर लोक व्यसनाधीन झाल्याने एक दारूडे गाव म्हणून ख्याती असल्याने आपल्या गावचा विकास होऊन गावाला भेट देण्यासाठी देश परदेशातून लोक येतील असे त्यावेळी राळेगणसिध्दीमधील कोणाला स्वप्नातही वाटले नसेल.

अण्णा हजारे यांनी आपल्या गावचे चित्र का व कसे पालटले ही या अभ्यासाची मूलभूत दृष्टी होय. स्वामी विवेकानंद यांच्या विचारविश्व अण्णांना प्रेरणा देणारे ठरले. तुम्हाला खरोखरच लोकांचे भले करावयाचे का? तुमच्या ठिकाणी शुध्द आचार शुध्द विचार निष्कलंक जीवन आणि त्याग हे गुण असतील आणि तुम्ही पणतीप्रमाणे जळत राहुन इतरांना प्रकाश देण्याचा प्रयत्न केला तर दोन चारचे नव्हे तर सारे विश्व तुमचा आदर्श करेल. आपल्या विरोधकांशी कार्यकर्त्याने कसे वागावे ते सांगातना अण्णा म्हणतात, आपल्या बद्दल कुणी निंदा केली, वाईट शब्द बोलल्याचे कानावर आले तर कार्यकर्त्याला वाईट वाटायला नको. समाजासाठी काही चांगले काम करायचं असेल तर अपमान पचविता यायला हवा याची उदाहरणे अनेक महान माणसांच्या जीवनात सापडतात.

हाच दृष्टिकोन ठेवुन अण्णांनी देशभर ग्रामविकासाचे कार्य केले आहे. सामान्यातील सामान्य कार्यकर्ता ध्येयवादी बनून जिद्द आणि चिकाटीने कार्याला लागला, मग त्याच्याकडे धन—दौलत असो अथवा नसो, संपत्ती असो अथवा नसो, फक्त मनाचा विश्वास असायला हवा म्हणजे तो सुध्दा समाज आणि देशासाठी चांगले कार्य करू शकतो.

मध्य प्रदेश, आंध्र, ओरिसा, जम्मू—काश्मीर व राजस्थान या सर्व राज्यातून अण्णांचा प्रयत्न चालू आहे व ते या राज्यांनाही दिशादर्शन करत आहेत. कार्यकर्त्यांनी ध्येयवाद कसा जोपासावा, कार्यकर्त्यांनी ध्येय कसे ठरवावे हे सांगताना अण्णा म्हणतात, ज्याप्रमाणे दैनंदिन व्यवहारात आपण ध्येय ठरवीत असतो त्याप्रमाणे कार्यकर्त्याने आपल्या संपुर्ण आयुष्यात काय करायचे हे ध्येय ठरविणे आवश्यक आहे. जीवनाचे ध्येय निश्चित झाले म्हणजे कितीही संकटे आली तरी तो डगमगत नाही, त्याच्या ठिकाणी नैराश्य राहत नाही. एखाद्या कामात अडचण आली तरी

माघार घेत नाही. कारण त्याने समाज मन जिंकलेले असते. यावरून अण्णांचा दृढतर आत्मविश्वास प्रकट होतो.

अण्णांची विकासदृष्टी त्यांच्या कामातून प्रकट होते. म. गांधी आणि विवेकानंदाच्या विचारांचा प्रभाव आपल्या जीवनावर पडला. अच्युतराव पटवर्धन यांच्या प्रभावाबाबत अण्णा म्हणतात, माणसाच्या जीवनातील मी पण जेव्हा संपलेले असते, तीच माणसे आपल्या जीवनात अशा अनामिक वृत्तीने वागत असतात. कारण त्यांच्या ठिकाणी असलेला मी संपला की मी, 'माझे' संपुन जाते आणि माझे काही राहिले नाही, या अवस्थेला गेल्यानंतर देहाचीच आसक्ती राहत नाही. जिथे देहाची आसक्ती संपते, तिथे सर्वसंग परित्याग झालेला असतो. आजही असेच जीवन जगत आहेत.

नवलभाऊ फिरोदीयांचे जीवन त्यांना महत्वाचे वाटते. अण्णा म्हणतात सामान्य माणसांशी धनिक लोक अधिक बोलणेही पसंत करीत नाहीत. आजची अशी सामाजिक अवस्था आहे. अशा अवस्थेत हा माझ्यासमोर एक आदर्शच उभा आहे, असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. एवढेच नाही तर घरी गेल्यानंतरही परिवारात जो आदर्श निर्माण झाला आहे, तोही नवलभाऊच्याच संस्कारातून निर्माण झालेला पाहण्यास मिळतो.

बाळासाहेब भारदे यांचे व्यक्तीमत्वाची अण्णांना प्रेरक वाटते ते म्हणतात, बाळासाहेबांच्या शब्दाला वजन आहे. त्यांचे प्रमुख कारण हे आहे, 'बोले तैसा चाले' त्यांची वंदावी पाऊले तसेच काम , क्रोध, लोभ, मोह, दंभ, अहंकार या गोष्टींवर विजय मिळविल्याने माझ्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांना बाळासाहेबांच्या जीवनापासून बरेच काही शिकायला मिळाले आहे.

अण्णांनी सैन्यात प्रवेश केला त्यानंतर तेथे प्रदीर्घ सेवा केली. मातृभूमीचे रक्षण करता करता ते धारातीर्थी पतन झाले असे पण ते

नियतीच्या कृपेने वाचले आणि उर्वरित आयुष्य त्यांनी सेवेसाठी पदार्पण केले. १२ वर्षांचे एक तप त्यांनी पुर्ण केले. अण्णा म्हणतात, पुष्कळ कामे उभी राहतात. भौतिक विकासाबरोबर सामाजिक बदल अपरिहार्य आहे, अण्णा सेवेचे तत्वज्ञान सांगताना म्हणतात, 'शेजारधर्म रूजविण्यासाठी कुणाला तरी त्याग करावा लागेल त्याशिवाय होणार नाही. आज लोकांना दिसावा म्हणुन इमारतीचा चिरा व्हावा असे सर्वांनाच वाटत असते पण त्या चिऱ्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी अनेकांनी पायातील दगड होऊन स्वत:ला गाडुन घेतले आहे ही जाणीव असणे आवश्यक आहे. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्याला पायामधील दगड बनावा लागेल, आज स्वातंत्र्याची इमारत उभी झालेली आहे ती त्यासाठी गाडून घेतलेल्या दगडांमुळेच ना? समाजसेवा म्हणजे संघर्षाची वाटचाल होय.[२८]

## अण्णांचे जीवनः

किसन बाबुराव हजारे उर्फ अण्णा हजारे त्यांचे मूळगाव राळेगणसिध्दी,परंतू अण्णांचे अजोबा अहमदनगर जिल्हयातील भिंगार येथे सेनादलात नोकरी करीत होते त्यामुळे संपुर्ण हजारे कुटुंब भिंगारलाच राहत असे,तेथेच बाबुरावचं लग्न झाल, १५जुन १९३८साली भिंगारलाच अण्णांचा जन्म झाला.चार भिंतीच्या आत भरणारी शाळा अण्णांना तुरुंगाासारखी वाटायची शाळा सुटली की तुरुंगाातून सुटलेल्या कैदयाप्रमााणे त्यांना आनंद व्हायचा गाावात तालिम नव्हती तरी शेताच्या काळया मातीत पोरं जमवून जोरबैठका मारायचे, कुस्त्या खेळायचे. त्यांच्या पाठची बहिण त्यांना अण्णा म्हनू लागल्याने घरातले, मित्र मंडळीही अण्णा या नावाने बोलु लागले.घरातील गरीबिच्या वातावरणामुळे हुशार असुनही शिक्षण अर्धवट राहिले मुंबईला अत्याकडे जाऊन फुलांचा व्यवसाय सुरु केला त्यातच त्यांना कुसंगत जोडल्याने व्यसनाच्या आहारी गेले परंतु त्यातुन तात्काळ बाहेरही पडले. त्यानंतर ते

सेना दलात दाखल झाले.अन्याया विरुध्द लढा दिलेल्या अनेक घटना अण्णांच्या लष्करी जिवनात घडल्या. ११डिसेंबर १९६५या दिवसी पाकिस्ताणने लाहोर सेक्टर मधील सिमेवर हल्ला केला त्यात त्यांचे सर्व सहकारी मारले गेले आणि फक्त अण्णांच जिवंत राहिल्याने त्यांनी असे ठरवले कि,या पुढचे आयुष्य समाज सेवेकरीता अर्पण करायचे.

अण्णांच्या जिवनात त्यांची आई, अजोबा तसेच अच्युतराव पटवर्धन, नवलभाऊ फिरोदिया, बाळासाहेब भारदे, संत ज्ञानेश्वर महाराज, तुकोडोजी महाराज, स्वामी विवेकानंद, म.गांधी यांचा प्रभाव पडलेला दिसुन येतो.

**ई) अण्णांच्या दृष्टीकोनातून ग्रामीण विकासातील समस्याः**

**१. खेडे केंद्र बिंदू धरले नाहीः**

अण्णा हजारे म्हणतात, स्वातंत्र्यानंतर खेडयाकडे चला हा महात्मा गांधीजींचा मंत्र आम्ही जपला नाही. या उलट शहर केंद्रबिंदू मानून विकासाचं स्वप्नं पाहत राहिलो. खेडयातील माणसांच्या हाताला काम, भाकरीचा प्रश्न न सुटल्यामुळे लोक शहराकडे धाव घेत गेले आणि आज दोन्ही बाजूला समस्याच समस्या निर्माण झाल्या आहेत.

**२. योजना वरून लादल्या गेल्याः**

काही प्रमाणात ग्राम विकासाच्या योजना राबविण्याचा प्रयत्न झाला पण नऊ पंचवार्षिक योजनांचे नियोजन करताना लोकांना विश्वासात न घेता मुंबई, दिल्लीमध्ये विकासांच्या योजनांचे नियोजन झाले. राज्यातील आणि देशातील विविध भागातील भौगोलिक परिस्थिती वेगवेळी आहे. सामाजिक परिस्थिती वेगवेगळी आहे. लोकांच्या गरजा वेगळया आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करून लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सल्ल्याने योजना तयार करायला हव्या होत्या पण तसे घडले नाही.

**३. प्रशिक्षण, देखरेख, मुल्यमापन नाही:**

ज्या योजना तयार करण्यात आल्या त्या राबविताना प्रशिक्षण, देखरेख, मूल्यमापन (ट्रेनिंग, मॉनिटरिंग, इव्हॅल्युएशन) या गोष्टींवर भर द्यायला हवा होता. पण आठ पंचवार्षिक योजनांद्वारा कोटयवधी रूपये खर्च करण्यात आले तरी या गोष्टींचा विचार झाला नाही.

आतापर्यंत योजनांचे मुल्यमापन ३१ मार्चला झालेल्या खर्चावर आधारले गेले. त्यामुळे ३१ मार्च आला कि शेवटच्या आठ—पंधरा दिवसात सर्व धावपळी होतात. अनेक वेळेला संपुर्ण रेकॉर्ड बदलले जाते आणि झालेल्या खर्चावर योजनांचे मूल्यमापन होते. ही अत्यंत सदोष पध्दती आजपर्यंत अवलंबिली गेली.

**४. सरकारच्या कामात लोकांचा सहभाग नव्हे लोकांच्या कामात सरकारचा सहभाग:**

गावच्या विकासासाठी श्रमदान संस्कृती ही हजारो वर्षांपासुन चालत आलेली संस्कृती असल्याने पंचायत राजमध्ये त्या संस्कृतीची जोपासना करून ग्रामशक्ती आणि शासन शक्ती यांनी एक दुसऱ्याच्या हातात हात घाालून कार्य करणे आवश्यक होते. सरकारच्या कामात लोकांचा सहभाग असे न म्हणता लोकांच्या कामात सरकारचा सहभाग अशी कार्यपध्दती अवलंबण्याची गरज होती. पंचायत राज व्यवस्थेमध्ये हळुहळू आम्हीच लोकांना सांगत गेलो की तुम्ही आता काही करू नका. तुमच्या गावाचा विकास आम्हीच करणार आहोत, आणि हळुहळू आमची श्रमदान पध्दती बंद होत गेली आणि परावलंबनाची भावना वाढीला लागत गेली. कुणीतरी येईल आणि आपल्या गावाचा विकास करील अशा आशेने लोक वाट पहात बसले, त्यामुळे आळशीपणा वाढत गेला, स्वाभिमान कमी होत जाऊन लाचारीची सवय निर्माण झाली. गावातील काही इमारतींवर आमदार निधीमधून खासदार निधीमूधन असे बोर्ड लागत गेले. हा आपलाच पैसा आहे ही भावना दुरावत जाऊन असे आमदार

खासदारांनी आपल्या घरातून पैसे खर्च करून  इमारती बांधल्या असा आविभार्व निर्माण झाला. दिवसेंदिवस खेडी विकासाची बेटे निर्माण होण्याऐवजी राजकीय अड्डे तयार झाले. प्रत्येक गावात विविध पक्ष आणि पाटर्यांच्या लोकांनी राजकीय गट निर्माण करून ठेवले आणि आता प्रत्येक गटाला असे वाटते की, सूर्योदय माझ्याच कोंबडयाने झाला पाहिजे.

वास्तविक पाहता समाज हितासाठी सूर्योदय होणे महत्वाचे आहे. त्यासाठी कोणाचा कोंबडा आरवतो हे महत्वाचे नाही. त्यामुळे आज खेडयांच्या विकासाला फार मोठा अडसर निर्माण झाला आहे. राजकारणामधून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न जरूर करावा. कारण लोकशाही स्वीकारली आहे तर निवडणुका करणे दोष नाही. पण निवडणुकानंतर जनतेने आपणाला सेवा करण्याचा मोका दिला आहे. आता आपण सेवा हेच उद्दिष्ट ठेवून कार्य करावे अशी धारणा असावी. निवडणुकीमध्ये जे पडलेले उमेदवार असतात त्यांनी जनमताचा कौल मान्य करून निवडणून आलेल्या उमेदवारांबरोबर हातात हात घालून काम करावे.[२९]

# संदर्भ:


१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर, सन २००८.

२. http:/en.wikipedia.org/wiki/parnertaluka#prominent personalities.

३. श्री.बगाराम तुळपूळे, २००५, विकास, वाटचाल आणि समस्या, प्रकाशक—समता दर्शन प्रतिष्ठान, सोलापूर

४. प्रा.प्रभाकर रावते, मार्च १९९०, ग्रामीण विकास: समस्या व उपाय, प्रकाशक—सौ. प्रेमा कुमार, लातूर.

५. प्रा.महाजन अतुले, प्रा. झाडोकर अजय, प्रा.झोपे किशोर, २००४, समता, सामाजिक न्याय आणि लिंगभेद, प्रकाशन—यशदा, पुणे.

६. कुप्पास्वामी सोशल चेंज इन इंडिया विकास नवी दिल्ली १९८२ पृ.क्र. ५१

७. डॉ.धारुर वि.ल. दुरदर्शन आणि लोक संस्कृती पृ.क्र. १०९.

८. थिओ अलेक्स, सोशिऑलॉजी हार्पररो अन्ड इन्ट्रोडक्शन, न्युयॉर्क १९८९ पृ.क्र ३१५.

९. अस्पी एच.डायरेक्टर मास कम्युनिकेशन ए बेसिस स्टडी.

१०. डॉ. पवार आर. एस. एवं डॉ. श्रीकांत शर्मा, समन्वित ग्रामीणविकास एवं प्रादेशिक नियोजन, डिस्कव्हरी हॉऊस, नवी दिल्ली २००७, पृ.क्र. १२८.

११. डॉ. अवस्थी ए पी विकास प्रकाशन, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा २००७ पृ.क्रृ १२८.

१२. Ancor desmond, rural development problem & strategics, international lembar, review 1973 p.n.108.

१३. भावे विनोबा गाव सुखी हम सुखी सर्व सेवा संघ, वाराणसी, १९६६ पृ. क्र.९.

१४. डॉ. शर्मा सिमा डॉ.रमा कवर डॉ.राठोड नि., भारतीय ग्रामीण स्थानीय प्रशासन, पंचशील प्रकाशन, जयपुर, २००८ पृ.क्र. १६९.

१५. उपरोक्त पृ.क्र. १७०

१६. Hoshiyar singh: administration of rural development in india ,sterling publication p.ltd. new Delhi,1975,p.n.6.

१७. गांधी एम. के. हरिजन, ग्रामस्वराज्य का त्रिवीध स्वरुप राधा पब्लीकेशन, दिल्ली, २००६, पृ.क्र. ११

१८. यादव रामजी, भारता मे ग्रामीण विकास,अर्जुन प. हाउस.२००८, नवी दिल्ली, पृ.क्र. १९०.

१९. पाटील सतीश, स

सप्तरंग, दै. सकाळ,२६.१०.०८.

२०. त्रिपाठी रेणु: ग्रामीण विकास और निर्धनता उन्मुलन ओमेगा पब्लिकेशन, दिल्ली २००८ पृ.क्र. ६१—६९.

२१. डॉ. शर्मा सिमा डॉ. रमा कवर डॉ. नि. राठोड,भारतीय ग्रामीण स्थानिय प्रशासन, पंचशील प्रकाशन, जयपुर,२००८ पृ.क्र.६.

२२. यादव रामजी, भारता मे ग्रामीण विकास,अर्जुन प. हाउस.२००८, नवी दिल्ली, पृ.क्र. १९०.

२३. डॉ. कटारीया सुरेंद्र, वैद्य गुज्जन: भारत में ग्रामीण विकास: रणनितीया वं चुनौतियॉ, मलिक ॲन्ड कंपनी, जयपूर, दिल्ली, २००८, पृ.क्र.१७१ ते १७९.

२४. ग्रामपंचायत राळेगणसिध्दी.

२५. बाळासाहेब वाघ ग्रामिणविकासाची पाऊलवाट, राळेगणसिध्दी, प्रकाशक: मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी. पृ.क्र.१७—२२.

२६. अण्णा हजारे, माझे गाव माझे तीर्थ पृ.क्र.९०—९३.

२७. बाळासाहेब वाघ ग्रामिणविकासाची पाऊलवाट, राळेगणसिध्दी, प्रकाशक: मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी.

२८. अण्णा हजारे, माझे गाव माझे तीर्थ.

२९. अण्णा हजारे, माझे गाव माझे तीर्थ पृ.क्र.१५४—१५६.

# प्रकरण चौथे

## माहिती व राळेगणसिध्दीच्या वस्तुस्थितीचे विश्लेषण:


४.१ प्रस्तावना

४.२ माहितीचे विश्लेषण

४.२.१ वयोगट

४.२.२ शैक्षणिक माहिती

४.२.३ कौटुंबिक वर्गीकरण

४.२.४ व्यावसायिक वर्गीकरण

४.२.५ जातनिहाय वर्गीकरण

४.३ ग्रामविकासाशी संबंधित माहितीचे वर्गीकरण.

४.३.१ राळेगणसिध्दीच्या ग्रामविकासासंबंधी ग्रामस्थांची मते

४.३.२ ग्रामसभेची वारंवरिता

४.३.३ ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थीती

४.३.४ ग्रामसभेतील विषय

४.३.५ ग्रामपरिवर्तन दिन

४.३.६ राळेगणसिध्दीतील सण व उत्सव यांचे विश्लेषण

४.३.७ राळेगणसिध्दीचे वेगळेपण

४.३.८ राळेगणसिध्दीच्या विकासात तरूणांचा सहभाग

४.३.९ जलसिंचनाची साधने

४.४ पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण

४.४.१ चऱ्हाईबंदी

४.४.२ कुऱ्हाडबंदी

४.४.३ नसबंदी

४.४.४ नशाबंदी

४.४.५ श्रमदान

४.५ राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती

४.५.१ आजारांची माहिती

४.५.२ औषधांची माहिती

४.६ शासकिय अधिकाऱ्यांची विकासाबाबत मते

४.७ राळेगणसिध्दीतील नविन प्रकल्प

४.८ राळेगणसिध्दीतील समस्या

४.९ सारांश

# प्रकरण चौथे

# माहिती व राळेगणसिध्दीच्या वस्तुस्थितीचे विश्लेषणः

## ४.१ प्रस्तावनाः

संशोधकाला आपल्या अभ्यासासाठी विषयानुसार, उद्दिष्टांनुसार, गृहीतकानुसार माहिती संकलित करावी लागते. या संकलित माहितीच्या आधारे योग्य मांडणी व वर्गीकरणातुन वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना येते. ग्रामविकासातील अण्णांचे कार्य व प्रत्यक्ष परिस्थीती लक्षात घेतली आहे. यासाठी संशोधकाने सर्वेक्षण, निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत या माध्यमांद्वारे माहिती संकलित केली आहे.

उपलब्ध माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करून शेकडेवारी व निरीक्षणातुन आढळून आलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. संशोधकाने संशोधन विषयासाठी अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी या गावातील ग्रामस्थ, प्रशासकीय अधिकारी, माजी, आजी सरपंच, जेष्ठ नागरिक, महिला, माजी मुख्याध्यापक, विविध संस्थेतील कर्मचारी, व्यावसायीक, शेतकरी, मजुर यांची मुलाखत, प्रश्नावली व निरीक्षणाद्वारे प्रतिसाद मिळवलेला आहे. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

## ४.२ माहितीचे विश्लेषणः

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने राळेगणसिध्दी मधील ११० ग्रामस्थांच्या प्रश्नावल्या भरून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील प्रमाणे विश्लेषण केलेले आहे.

### ४.२.१ वयोगटः


संशोधनासाठी माहिती मिळविण्यासाठी वेगवेगळया वयोगटातील ग्रामस्थांच्या प्रश्नावली भरून घेतल्या. त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

### तक्ता क्र.४.१
### वयोगटाचे वर्गीकरण

| अ.क्र. | वयोगट | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | १८ ते ३५ | ३० | २७.२७ |
| २ | ३६ ते ४५ | ३५ | ३१.८२ |
| ३ | ४६ ते ६० | ४० | ३६.३६ |
| ४ | ६० च्या पुढे | १५ | ०४.५५ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

### आलेख क्र.४.१
### वयोगटाचे वर्गीकरण




वरील तक्ता क्र.४.१ वरून असे दिसुन आले की, एकूण ११० ग्रामस्थांपैकी २७.२७ टक्के प्रमाण हे १८ ते ३५ वयोगटातील ग्रामस्थ आहेत. ३६ ते ४५ वयोगटातील ग्रामस्थांचे प्रमाण ३१.८२ टक्के इतके आहेत. ४६ ते ६० या वयोगटातील ग्रामस्थांचे प्रमाण ३६.३६ टक्के इतके आहे तर ६० च्या पुढील वयोगटातील ग्रामस्थ ०४.५५ टक्के इतके आहेत.

संशोधनासाठी संशोधकाने १८ वर्षे ते ६० वर्षावरील ग्रामस्थ या वयोगटातील ग्रामस्थांकडुन प्रश्नावली भरून घेऊन प्रत्येक वयोगटातील ग्रामस्थाची माहिती मिळविलेली आहे. ६० वयोगटाच्या पुढील व्यक्तींनी अधिक अनुभव असल्याने चांगल्या प्रकारे माहिती दिली आहे.

### ४.२.२ शैक्षणिक माहिती:


संशोधनासाठी माहिती मिळवितांना निवड केलेल्या ११० ग्रामस्थांची शैक्षणिक माहिती जाणून घेतलेली आहे. त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्र.४.२**
**शैक्षणिक वर्गीकरण**

| अ.क्र. | शिक्षण | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक ते १० वी पर्यंत | ४० | ३६.३६ |
| २ | उच्च माध्यमिक (१२ वी) | ३५ | ३१.८२ |
| ३ | महाविद्यालयीन (ग्रॅज्युएट) | २० | १८.१९ |
| ४ | पोस्ट ग्रॅज्युएट/पदवीत्तर | ०५ | ०४.५५ |
| ५ | निरक्षर | १० | ९.१० |
| | **एकूण** | **११०** | १०० |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.२**
**शैक्षणिक वर्गीकरणाचा**




तक्ता क्र.४.२ वरून असे दिसुन आले की, एकूण ११० ग्रामस्थांपैकी प्राथमिक ते दहावी पर्यंत शिक्षण घेतलेले ३६.३६ टक्के, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले ३१.८२ टक्के, महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले १८.१९ टक्के, पदवीत्तर शिक्षण घेतलेले ०४.५५ टक्के आणि निरीक्षर असलेल्यांचे प्रमाण ०९.१० टक्के इतके आहेत.

अशा प्रकारे आपणास असे दिसुन येते की, एकूण साक्षरतेचे प्रमाण ९१.९० टक्के अधिक आहे तर निरक्षरतेचे प्रमाण ९.१० टक्के इतके कमी दिसुन आले.

### ४.२.३ कौटुंबिक वर्गीकरण:


संशोधनासाठी माहिती मिळवितांना निवड केलेल्या ११० ग्रामस्थांची कौटुंबिक माहिती जाणून घेतांना त्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या किती आहे हे खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्र.४.३**
**कौटुंबिक वर्गीकरण**

| अ. क्र. | कुटुंबातील व्यक्तींची संख्या | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ४ | ६५ | ५९.०९ |
| २ | ५ ते ८ | ३५ | ३१.८१ |
| ३ | ८ च्या वरील | १० | ९.०९ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भः— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.३**
**कौटुंबिक वर्गीकरण**




वरील तक्ता क्र.४.३ वरून असे दिसुन आले की, १ ते ४ व्यक्ती असलेली कुटुंबे ५९.०९ टक्के आहेत, ५ ते ८ व्यक्ती

असलेली कुटुंबे ३१.८१ टक्के आहेत तर ८ च्या वरील व्यक्ती असलेले कुटुंबे ९.०९ टक्के आहेत.

अशा प्रकारे असे दिसुन येते की १ ते ४ व्यक्ती असलेली कुटुबांची संख्या सर्वाधिक दिसुन येते. कारण राळेगणसिध्दीमध्ये कुटुंब नियोजन या माध्यमातुन तरूणांवर प्रभाव पडल्याने त्यांनी अधिक अपत्य नको यास मान्यता दर्शविलेली दिसुन येते. तसेच ५ ते ८ व्यक्ती असलेल्या कुटुंबांच्या संख्येचे प्रमाण कमी झालेले आहे तर ८ व्यक्ती पेक्षा अधिक कुटुंबाचे प्रमाण नगण्य दिसुन येते. त्यात फक्त संयुक्त कुटुंबाचा समावेश होतो.

### ४.२.४ व्यावसायिक वर्गीकरण:

संशोधनासाठी निवडलेल्या एकूण ११० ग्रामस्थांची व्यावसायिक माहिती जाणून घेऊन त्याचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.


**तक्ता क्र.४.४**

**व्यावसायिक वर्गीकरण**

| अ. क्र. | व्यवसाय | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ६५ | ५९.१० |
| २ | व्यवसाय | २५ | २२.७८ |
| ३ | नेकरी | १० | ०९.१० |
| ४ | घरकाम/रोजगार | १० | ०९.१० |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.४**
**व्यावसायिक वर्गीकरण**




र

वरील तक्ता क्रमांक ४.४ वरून असे दिसुन येते की, शेती व्यवसाय करणारे ५९.१० टक्के, व्यवसाय करणारे ३२.७३ टक्के, नोकरी करणारे ९.१० टक्के, आणि रोजगार व घरकाम करणारे ९.१० टक्के लोक आढळून आले. शेती व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक (५९.१० टक्के) दिसुन आले. व्यवसाय करणारे म्हणजेच दुग्ध व्यवसाय, हॉटेल व्यवसाय करणारे (२२.७८ टक्के) म्हणजेच तेथे जोडव्यवसायाच्या संधी निर्माण झाल्यानेही लोकांचा विकास झालेला आहे. नोकरी करणारे (९.१० टक्के) म्हणजेच सैन्यात भरती होणारे, इंजिनिअर, डॉक्टर, प्राध्यापक इत्यादी लोकांचे प्रमाणात वाढ होतांना दिसुन येत आहे तर फक्त ९.१० टक्के लोक हे रोजगार किंवा घरकाम करणारे दिसुन आलेले आहे.

### ४.२.५ जातनिहाय वर्गीकरण:


संशोधनासाठी माहिती मिळवितांना निवडलेल्या ११० ग्रामस्थांची जातनिहाय माहिती जाणून घेऊन वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

## तक्ता क्र.४.५
## जातनिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | जातीचे वर्गीकरण | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठा (सर्वसाधारण) | ३५ | ३१.८२ |
| २ | महार | २५ | २२.७३ |
| ३ | चांभार | १० | ०९.१० |
| ४ | कोळी | ०३ | ०२.७३ |
| ५ | पारधी | ०६ | ५.४५ |
| ६ | गोंधळी | ०३ | २.७३ |
| ७ | इतर मागासवर्गीय | २८ | २५.४५ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

## आलेख क्र.४.५
## जातनिहाय वर्गीकरण




वरील तक्ता क्र.४.५ वरून असे दिसुन आले कि, एकूण ११० ग्रामस्थांपैकी ३१.८२ टक्के (सर्वसाधारण), २२.७३ टक्के महार, ९.१० टक्के चांभार, २.७३ टक्के कोळी, ५.४५ टक्के पारधी, २.७३ टक्के गोंधळी, २५.४५ टक्के इतर मागासवर्गीय जातीचे प्रमाण घेतलेले आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना असे आढळून आले कि, सर्वसाधारण (३१.८२ टक्के), इतर मागासवर्गीय (२५.४५ टक्के) यांचे प्रमाण अधिक दिसुन येते. तसेच अनुसूचित जातीमध्ये महार व चांभार यामध्ये महार जातीच्या लोकांचे प्रमाण (२२.७३ टक्के), चांभार जातीच्या प्रमाणात (०९.१० टक्के) जास्त दिसुन येते. तसेच पारधी ५.४५ टक्के, कोळी २.७३ टक्के, गोंधळी २.७३ टक्के या जातीच्या लोकांचे प्रमाण तुलनेत खुप कमी आढळले आहे.

## ४.३. ग्रामविकासाशी संबंधित माहितीचे वर्गीकरण:

राळेगणसिध्दीच्या विकासाची माहिती मिळवितांना संशोधकाने प्रश्नावलीच्या आधारे निवड केलेल्या ग्रामस्थांना वेगवेगळया प्रकारचे प्रश्न विचारून अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रामविकास, ग्रामसभा, ग्रामपरिवर्तन, राळेगणसिध्दीचा वेगळेपणा, श्रमदान, पाण्याची साधने, पंचसुत्री कार्यक्रम, आरोग्याशी संबंधित प्रश्न, कर, कर्ज, जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, गावातील सार्वजनिक कार्यक्रम, ग्रामविकासात महिलांचा सहभाग, ग्रामविकासांतर्गत नविन प्रकल्प, गावातील समस्या अशा अनेक मुद्दयांचा विचार करून माहिती मिळविलेली आहे.

### ४.३.१ राळेगणसिध्दीच्या ग्रामविकासासंबंधी ग्रामस्थांचे मते:

राळेगणसिध्दीच्या विकासाबाबत निवड केलेल्या ११० ग्रामस्थांना तेथील विकासाबाबत माहिती विचारली असता किंवा त्यांचे मत विचारले असता त्यांनी दिलेल्या प्रतिसादाबदद्लची माहिती खालील तक्त्यात दर्शवली आहे.

**तक्ता क्र.४.६**


**राळेगणसिध्दतील झालेल्या ग्रामविकासाशी ग्रामस्थांची सहमती**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | पुर्वीच्या पेक्षा आताच्या बदलाशी सहमती असलेले | १०० | ९०.९१ |
| २ | पुर्वीच्या पेक्षा आताच्या बदलाशी सहमती नसलेले | १० | ०९.०९ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.६**

**राळेगणसिध्दतील झालेल्या ग्रामविकासाशी ग्रामस्थांची सहमती**




वरील तक्ता क्र.४.६ वरून असे दिसुन आले की, राळेगणसिध्दी मधील एकूण ११० ग्रामस्थांची मते विचारात घेतली असता विधान १ नुसार पुर्वीच्या राळेगणशिंदीच्या पेक्षा आताच्या राळेगणसिध्दीमध्ये ग्रामविकासाशी सहमत असलेले ग्रामस्थ १०० म्हणजे ९०.९१ टक्के आहेत तर ग्रामविकासाशी असहमत असलेल्या ग्रामस्थांची संख्या १० म्हणजे ९.०९ टक्के आहेत असे आढळून आले आहे.

अशा प्रकारे अभ्यासातून असे दिसून आले की, ज्या ग्रामस्थांचा शेती, दुग्धव्यवसाय, हॉटेल व्यवसाय, कापड व्यवसाय, किराणा

व्यवसाय इ. मधील ग्रामस्थ राळेगणसिध्दीच्या विकासात झालेल्या बदलाशी सहमत आहे, त्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच असहमत असलेल्यांचे प्रमाण कमी आहे, त्याचे कारण ग्रामविकासातील झालेला बदल हा 'नैसर्गिकचं आहे' तो मा. अण्णांकडून झालेला नाही असे समजुन आले आणि कांही विशिष्ट कुटुंबाचा गावात निवाराच नाही. ते मागच्या दोन पिढयांपासून राहुनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे त्यांची असहमती दिसून आली आहे.

## ४.३.२ ग्रामसभेची वारंवारता:


संशोधनासाठी निवडलेल्या ११० ग्रामस्थांना ग्रामसभा संबधी माहिती विचारली असता ग्रामसभेच्या वारंवारतेची माहिती पुढील तक्त्यात दर्शवण्यात आली आहे.

**तक्ता क्र.४.७**
**ग्रामसभेची वारंवारता**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक महिन्याला | ६० | ५४.५४ |
| २ | दोन महिन्यातून एकदा | ३५ | ३१.८२ |
| ३ | ३ ते ६ महिन्यातून एकदा | १५ | १३.६४ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.७**
**ग्रामसभेची वारंवारता**



क्ता क्र.४.७ वरून असे दिसुन आले कि, राळेगणसिध्दी मधील एकूण ११० ग्रामस्थापैकी ग्रामसभा प्रत्येक महिन्याला होत असते असे म्हणणारे ६० म्हणजेच ५४.५४ टक्के आणि दर दोन महिन्याला ग्रामसभा होते असे म्हणणारे ३५ म्हणजेच ३१.८२ टक्के व तीन ते सहा महिन्यातून एकदा होते असे म्हणणारे १५ म्हणजेच १३.३४ टक्के ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळालेला आहे.

अशा प्रकारे ग्रामसभेच्या संदर्भात अभ्यासातून असे आढळून आले की, गावात ग्रामस्थांचे विविध मत दिसून आले त्यामध्ये प्रत्येक महिन्यास ग्रामसभा भरते म्हणणारे जास्त प्रमाणात आहेत. तसेच दर दोन महिन्याने होते म्हणणारे थोडे कमी आणि तीन ते सहा महिन्याने होणारे कमी अशा प्रकारचे विचार भिन्नता दिसुन आली. त्याचे कारण असे की जेव्हा अण्णा हजारे गावात उपस्थित असतील तेंव्हा प्रत्येक महिन्यात होते आणि ते जर बाहेरगावी आंदोलनासाठी असतील तर ग्रामसभा पुढे ढकलली जाते असे दिसून आले. अण्णा जेव्हा अनुपस्थित असतात तेव्हा ग्रामसभा झालीच तर गावाचा प्रथम नागरिक म्हणून सरपंच व उपसरपंच यांच्या अध्यक्षेतखाली भरवली जाते पण जर अण्णा हजर असतील तर कोणतेही निर्णय पटकन मार्गी लावला जातो असे मला अभ्यासातून दिसून आले.

### ४.३.३ ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती:


संशोधनासाठी निवडलेल्या ११० ग्रामस्थांना ग्रामसभेतील उपस्थिती संबधी माहिती विचारली असता ग्रामसभेची वारंवारतेची माहिती पुढील तक्त्यात दर्शवण्यात आली आहे.

**तक्ता क्र.४.८**
**ग्रामसभेत ग्रामस्थाची उपस्थिती**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | १०० टक्के | ३५ | ३१.८१ |
| २ | ७५ टक्के | ४० | ३६.३६ |
| ३ | ५० टक्के | २५ | २२.७३ |
| ४ | २५ टक्के | १० | ०९.१० |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.८**
**ग्रामसभेत ग्रामस्थाची उपस्थिती**




वरिल तक्ता क्र.४.८ वरून असे दिसुन आले की, राळेगणसिध्दी मधील एकूण ११० ग्रामस्थांपैकी ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थिती १०० टक्के असते असे म्हणणारे ग्रामस्थांची संख्या केवळ ३५ म्हणजेच ३१.८१ टक्के एवढी आहे आणि ७५ टक्के ग्रामस्थांची उपस्थिती म्हणणारे ग्रामस्थांची संख्या ही ४० म्हणजेच ३६.३६ टक्के आहे व ५० टक्के उपस्थिती आहे म्हणणारे ग्रामस्थांची संख्याही केवळ २५ म्हणजेच २२.७३ टक्के आहे आणि २५ टक्के उपस्थित म्हणणारे ग्रामस्थांची संख्या ही १० म्हणजेच ९.१० टक्के आहे असे अभ्यासातून दिसून आले.

अशा प्रकारे संशोधकास असे दिसुन आले की अण्णा हजारे जेव्हा गावात उपस्थित असतात तेव्हा सर्वच ग्रामस्थ ग्रामसभेमध्ये उपस्थिती लावतात. त्यांच्या म्हणन्यानूसार अण्णा राहीले तेव्हा कोणतेही निर्णय पटकन घेतले जातात. ते नसतील तर निर्णयास विलंब होतो. काही ग्रामस्थ म्हणतात की, ग्रामसभा भरवली जाते तेव्हा अण्णा नसतील तर ग्रामसभेत गावातील सरपंच किंवा  उपसंरपच किंवा जेष्ठ नागरिकांच्या समक्ष सभा घेतली जाते तेव्हा विषयानुसार किंवा सभेपुढच्या समस्यानुसारच लोक उपस्थिती लावतात. त्यामध्ये वरिल तक्त्यात पाहिल्या प्रमाणेच ग्रामस्थांची संख्या कमी होत गेल्याचे दिसून येते म्हणजेच गावातील ग्रामसभा ही अण्णांच्या व्यक्ती वलयाचा प्रभावावरच चालणारी दिसुन येते. अण्णा नसतील तर सभा होत नाही, पुढे ढकलली जाते किंवा निर्णय घेण्यासाठी अपुर्ण ठेवले जातात असे दिसून आले.

### ४.३.४ ग्रामसभेतील विषयः


संशोधनासाठी गावातील ११०ग्रामस्थांना निवडले असता त्यांच्या मते, ग्रामसभेत चर्चीले जाणारे विषय पुढील तक्त्यानुसार दिलेली आहेत.

**तक्ता क्र.४.९**
**ग्रामसभेतील विषय**

| अ.क्र. | चर्चा होणारे घटक | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसुधारणा | ५५ | ५० |
| २ | शासकीय योजना | १५ | १३.६४ |
| ३ | लोकशिक्षण | १० | ९.०९ |
| ४ | कुटुंबनियोजन | १० | ९.०९ |
| ५ | कौटुंबिक हिंसाचार, भांडणे | २० | १८.१८ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भः— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.९**
**ग्रामसभेतील विषय चर्चा होणारे घटक**




वरिल तक्ता क्र.४.९ वरून असे दिसुन आले की, ग्रामसभेमध्ये साधारणत: ११० ग्रामस्थांच्या प्रतिसादावरून असे समजले की, ग्रामसभेत ग्रामसुधारणा या विषयावर चर्चा होते असे म्हणणारे ग्रामस्थ संख्या ५५ म्हणजे ५० टक्के आहे व विविध शासकिय योजनावर १५ म्हणजेच १३.६४ टक्के ग्रामस्थ तर लोकशिक्षण विषय म्हणणारे १० म्हणजे ९.०९ टक्के व कौटुंबिक हिंसाचार व भांडणे यावर चर्चा म्हणणारे २० म्हणजेच १८.१८ टक्के ग्रामस्थ दिसुन आले आहेत.

अशा प्रकारे ग्रामसभेत वरिल सर्वच विषयावर चर्चा होते असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामध्ये राळेगणसिध्दीच्या ग्रामसभेत ग्रामसुधारणा या विषयावर सर्वात जास्त चर्चा होते असे दिसुन आले तर कुटुंब नियोजन, लोकशिक्षण, शासकीय योजना, कौटुंबिक हिंसाचार, भांडणे या विषयावर वेळ व गरजेनूसार चर्चा होते असे अभ्यासातून दिसुन आले आणि ग्रामस्थांनी पुरूष किंवा महिलेने मांडलेला मुद्दा सर्वांनुमते चर्चा करून हिताचे असेल तर त्या विचारास ग्रामसभेत मताला प्राधान्य दिले जाऊन ते अंमलबजावणीसाठी समिती पुढे ठेवून अण्णांच्या मतानुसारच ते मजुंर केले जाते. महिलांचे पण मत विचारात घेतले जाते जर तो मुद्दा योग्य असेल तर तसेच सध्या गावातील सरपंच ही एक महिलाच आहे, असे दिसून आले.

### ४.३.५ ग्रामपरिवर्तन दिन:

राळेगणसिध्दी गावामध्ये ग्राम परिवर्तनाची सुरूवात ही राळेगणच्या विकासातून आलेली आहे. तेथील ग्रामस्थांच्या मते नियोजन करून राळेगणसिध्दीचा विकास झालेला नाही तर अनुभवाने आम्ही शिकलो. अनुभवातूनच राळेगणसिध्दी विकसित झाले. अशा अनुभवातून कार्यकर्त्यांना एक नाविन्यपूर्ण कल्पना सुचली ती म्हणजे ‘ग्रामपरिवर्तन दिन’ होय. गावात अनुभवातून जे परिवर्तन झाले त्याचा स्मरणदिन अथवा वर्धापनदिन साजरा केला जातो, त्याला गावकरी ग्रामपरिवर्तनाचा वाढदिवस म्हणतात. पुर्वी अण्णांच्या वाढदिवसी ग्रामपरितर्वन दिन साजरा केला जात असे परंतु आता २ ऑक्टोबर महात्मा गांधीच्या जयंती दिनी गावकरी ग्रामपरिवर्तन दिन साजरा करतात. ग्राम परिवर्तनाचे औचित्य साधुन गावात अनेक कार्यक्रम होतात ते पुढीलप्रमाणे.

१. **ग्रामस्वच्छता:** ग्रामपरिवर्तन दिनाच्या निमित्ताने संपूर्ण गावातील स्वच्छता केली जाते. गावातील सर्व लोक या कार्यक्रमात आनंदाने सहभागी होतात.

२. **रक्तदान शिबीर:** या दिवशी गावामध्ये रक्तदान शिबिराचा कार्यक्रम घेतला जातो.

३. **नवविवाहीत सुनांचा सन्मान:** वर्षभरात लग्न झालेल्या नवविवाहीत वधूंचे राळेगणसिध्दी परिवारात खणानारळाने आणि साडीचोळी देऊन त्यांची ओटी भरून त्यांना शुभ अशीर्वाद देऊन सन्मान केला जातो.

४. **नवजात बालक:** बालीकांच्या जन्माचे स्वागत: आजची बालके ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ समजुन प्रत्येक जातीतील बालक बालिकेला नवीन कपडे देऊन त्यांच्या जन्माचे स्वागत करतात आणि ही सर्व बालके राळेगणसिध्दी परिवारातील आहे या भावनेने शुभ आशिर्वाद दिला जातो.

५. **ग्राममाता ग्रामपिता म्हणून पुजन:** ग्रामपरिवर्तन दिनी गावातील सर्वाधिक वय आहे अशा एक महिला व एक पुरूषांचा

ग्राममाता—ग्रामपिता मानून त्यांचे सर्व गावकरी पुजन करतात व त्यांना वस्त्रदान करतात.

६. गावच्या उज्ज्वल भविष्यासाठी गावची लोकसंख्या मर्यादित ठेवणे गरजेचे आहे असे मानून ज्या नवविवाहीत वधूवरांनी शस्त्रक्रिया करून एकाच आपत्यावर परिवार नियोजन केले अशा जोडप्यांचा सत्कार ग्रामपरिवर्तन दिनी केला जातो.

७. **विद्यार्थ्यांचा गौरव:** प्राथमिक व माध्यमिक शाळेतील जे विद्यार्थी विविध परिक्षेत सर्वाधिक गुण संपादन करून पास होतात, जे विद्यार्थी क्रिडा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती इ. विशेष क्षेत्रात नैपुण्य संपादन करतात त्यांचा ग्रामपरिवर्तन दिनी सत्कार केला जातो.

मागील २०—२१ वर्षापासून राळेगणसिध्दीत ग्रामपरिवर्तन दिन उत्साहात साजरा केला जातो. या दिनी महिलांना जेवणाचा पहिला मान दिला जातो. राळेगणसिध्दी पासून प्रेरणा घेऊन अनेक गावात ग्रामपरिवर्तन दिन साजरे केले जात आहेत.

### ४.३.६ राळेगणसिध्दीतील सण व उत्सव, संस्कृती यांचे विश्लेषण:

राळेगणसिध्दी या गावात सण, उत्सव हे सार्वजनिक स्वरूपात साजरे केले जातात. प्रत्येक सणात गावातील प्रत्येक नागरिक सहभागी असतो. वर्षभरातील प्रत्येक सणाला सर्व जाती—धर्माचे लोक एकत्र येऊन ते साजरे केले जातात. गावात होणारे सार्वजनिक सण उत्सव पुढीलप्रमाणे:

१. **एक गाव एक गणपती:** संपूर्ण गावात एकच गणपती असतो. सर्व गावातील लोक सामुदायिकरित्या एकाच गणपतीची स्थापना करतात.

२. **नवरात्र उत्सव:** नवरात्र उत्सवात संपूर्ण गावकरी एकाच देवीची स्थापना करतात. नऊ दिवस संपूर्ण गावातील प्रत्येक समाजाची व्यक्ती त्या उत्सवात सहभागी होतात. तसेच पद्‍मावती देवी उत्सव पण गावात साजरा केला जातो.

३. **यादवबाबा सप्ताह:** गावामध्ये यादवबाबा सप्ताहामध्ये गावातील सर्व लहान थोर व्यक्ती सहभागी होतात. या उत्सवात गरीबांना कपडयाचे वाटप केले जाते. तसेच या सप्ताहात बाजूच्या गावातील भजनी मंडळी येवून भजन, किर्तनाचे कार्यक्रम होतात.

४. नागपंचमी सणाच्या दिवशी गावातील सर्व महिला एकाच वारूळाला जाऊन पुजतात म्हणजेच गावातील चारही दिशांच्या स्त्रिया एकत्र येऊन एकाच ठिकाणी नागोबाला पुजतात.

५. **वटपौर्णिमा:** या सणाच्या दिवशी गावातील सर्व महिला एकत्र येऊन एकाच वडाच्या झाडाला पूजतात. त्यातून त्या गावातील महिलांची एकजूट दिसुन येते.

६. **बैलपोळा:** या गावात बैल पोळयास वेशीतून बैल फिरवण्याचा मान हा एका दलित कुटुंबातील व्यक्तीस दिलेला आहे. सध्याही ही प्रथा चालुच आहे. पोळयाचा सण हा मोठया थाटात साजरा केला जातो.

### ४.३.७ राळेगणसिध्दीचे वेगळेपण:

राळेगणसिध्दी हे गाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकीक झालेले गाव आहे. राळेगणसिध्दीच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी देश—विदेशातून अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी येथे येतात. या मागील कारण राळेगणसिध्दी या गावाचा विकास होय. अण्णा हजारे गावात १९७५ साली आले तेव्हा संपूर्ण गाव एका विद्रुप अवस्थेत होत. गावात पिण्याचे पाणी सुध्दा वेळेवर मिळत नसे. पण अण्णांच्या नियोजनामुळे व गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे आजचे राळेगणसिध्दी उभे असलेले दिसुन आले. इतर गावात हा प्रकार दिसुन येत नाही त्याचे कारण अण्णांचा प्रभाव संपुर्ण गावकऱ्यांवर मोठया प्रमाणात दिसून येतो. तसेच गावातील रस्ते, वीज, शाळा, कुऱ्हाडबंदी, नसबंदी, नशाबंदी, चऱ्हाईबंदी, श्रमदान यांचे महत्व गावात जास्त दिसुन आले पण तेच जिल्हयातील प्रत्येक गावात असेलच असे नाही. ग्रामपातळीवर असून सुध्दा गावातील प्रत्येक

कुटुंबास पाण्यासाठी नळ योजना पुरविली आहे. तसेच राळेगणसिध्दीमध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत गावातील भजनीमंडळ एकत्र येवून भजनकिर्तन करतात. आनंद उत्सव साजरा करतात. अण्णांच्या गावामध्ये इतर गावांप्रमाणे व्यसनाचे प्रमाण दिसून येत नाही. अण्णाचे गाव हे पूर्णत: व्यसनमुक्त आहे. गावामध्ये दारू दुकान आढळत नाही. गावामध्ये व्यायाम शाळा, योगासने या सारख्या गोष्टी जास्त आढळतात. यामध्ये मुले व मुली यांना समान संधी उपलब्ध आहेत. या गावामध्ये एकुण निरीक्षणामधून थोडया फार प्रमाणात विशिष्ट जातीमध्ये अंतर्गत राजकारण जाणवले. काही जातीकडे दुर्लक्ष केले जाते आणि त्या जातीचा विकास ही झालेला दिसून येत नाही. त्यांना गावाच्या एका बाजूला स्थान प्रस्थापित करून दिले आहे असे आढळले. दलित वर्ग हा पुर्णत: मध्यमवर्गीय असल्याचा दिसून येतो. त्यांचा विकास हा बऱ्यापैकी झालेला आढळून आला. दलित वर्गामध्ये कोणीही गरीब नाही. दलित वर्गाचा विकास हा चांगला झालेला आहे असे आढळले. त्या वस्तीतील रस्ते, घरे, संडास यांची बांधणी सिमेंटची असल्याचे दिसून आले. त्यातील काही संडास, बाथरूम हे श्रमदानाच्या माध्यमातून गावकऱ्यांनी बांधल्याचे आढळले. हे गाव हगणदारी मुक्त आहे. प्रत्येक घराच्या, वस्तीच्या बाहेर एकतरी स्वच्छता गृहे आहेत.

गावामध्ये माती अडवा पाणी जिरवा, पाणी अडवा पाणी जिरवा या पध्दती आहेत. गावात हरिजनाला पोळयाच्या दिवशी जास्त मान असतो कारण पोळयाला प्रथम हरिजनाचा बैल हा गावाच्या वेशीतून प्रथम फिरवला जातो आणि नंतर बाकीच्या बैलाला त्या मागून फिरवले जाते. हरिजनाच्या बैलांची प्रथम पूजा ही अण्णाच्या हस्ते केली जाते. त्यानंतर इतर बैलांची पूजा होते. आंबेडकर जयंती व शिवजयंती ही गावामध्ये एकाच दिवशी साजरी करतात. यामध्ये जातियतेचा प्रश्न उद्‌भवत नाही. दोन्ही समाजातील लोक एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. गावाच्या निरीक्षणामध्ये महिला या व्यवसायामध्ये जास्त पारंगत

आहेत असे आढळून आले. महिलांचा पुढाकार हा जास्त आढळून आला. मुलीच्या जन्माचे स्वागत हे मुलांच्या जन्माच्या तूलनेत खुप कमी आढळले. मुलीच्या जन्माच्या वेळी मूलगी ५ दिवसांची झाली की तिला व तिच्या आई—वडीलांना कपडे देवून सत्कार करतात. अण्णाच्या गावात नापासांची शाळा आहे हे नावीण्यपुर्ण वेगळेपण आहे. जे शहरामध्ये अनूभवास येत नाही ते अण्णाच्या गावात पहावयास मिळाले की मुलांच्या मनातील नकारात्मक बाजू जाणून सकारात्मक बाजूने विचार करून त्यांना एक जीवन जगण्याचा नवीन मार्ग अण्णांच्या नापासांच्या शाळेतून पहावयास मिळाला.

अण्णाच्या गावाच्या निवडणूकीचा विचार केला तर एक नाविन्यपूर्ण कल्पना अनूभवास मिळाली. ज्या पक्षातील लोक निवडणूक जिंकून येतील. त्या पक्षातील लोकांच्याकडून हरलेल्या लोकांचा प्रथम सत्कार केला जातो आणि हरलेल्या पक्षातील लोकांनी जिंकलेल्या लोकांचा सत्कार नंतर करून आमच्या अपयशामुळे तुम्हाला निवडणूक यश प्राप्त झाले असा मुख्य हेतू आहे हे अनूभवास येते.

अशा प्रकारे एकूण पाहणी व निरीक्षणातून अण्णांच्या गावचे वेगळेपण अनुभवास मिळाले.

### ४.३.८ राळेगणसिध्दीच्या विकासात तरूणांचा सहभागः

राळेगणसिध्दीचा विकास करत असतांना अण्णांनी तरूणांना सहभागी करून घेतलेले आहे. प्रत्येक कामाची सुरूवात अण्णांनी स्वत:पासुन केल्यामुळेही तरूण वर्गाने पुढाकार घेतला. त्यांना ग्रामविकासाचे महत्व पटवुन देऊन त्यांची मानसिकता बदलवली. प्रत्येक व्यक्तीवर अण्णाच्या पंचसुत्री कार्यक्रमाचा आणि इतरही अनेक गोष्टींचा प्रभाव पडलेला आहे. गावातील प्रत्येक समाज हा एकोप्याच्या भावनेतुन वावरतांना आढळतो. प्रत्येक समाजातील तरूणांना त्यांच्या वैयक्तीक समस्या कशा सोडवायच्या याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जाते.

सकारात्मक दृष्टी ठेवुन धर्माचे कोणतेही बंधन न ठेवता. विकासकार्यात प्रत्येक तरूण सहभागी झालेला आढळून आला.


**तक्ता क्र. ४.१०**

**राळेगणसिध्दीच्या ग्रामविकासात तरुणांचा सहभाग**

| अ.क्र. | प्रतिसाद | वांरवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | तरुणांचा सहभाग असतो | १०० | ९९.९१ |
| २ | तरुणांचा सहभाग नसतो | १० | ०९.०९ |
| | **एकुण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.१०**
**ग्रामविकासात तरुणांचा सहभाग**




वरील तक्ता क्र.४.१०वरुन असे दिसुन येते की, राळेगणसिध्दीमध्ये होणाऱ्या ग्रामविकासात आणि सांस्कृतिक, धार्मिक, कार्यात तरुणांचा सहभाग ९०.९१ टक्के राहिलेला दिसुन आला तर फक्त ०९.०९टक्के तरूण या कार्याला आपला वेळ देऊन सहभागी होऊ शकत नाही.

ग्रामविकास आणि इतर सार्वजनिक कामांमध्ये ग्रामस्वच्छता, श्रमदान, विविध शिबिरे, ग्रामसभा, उत्सव, सण यामध्ये गावातील सर्वच जाती, धर्माचे आणि स्त्री—पुरूष यांचा सहभाग हा अधिक प्रमाणात

दिसुन येतो. फक्त काही मोजकेच लोक आपल्या वैयक्तिक कामामुळे या कार्यात सहभागी होऊ शकत नाही. नौकरी ,व्यवसाय, शिक्षण अशा कारणांमुळे ते सहभागी नाही होत परंतु गावातील वयस्कर आणि अनुभवी लोक तरुणांना मार्गदर्शन करुन स्वत:ही कार्यात सहभागी होतात.

### ४.३.९ जलसिंचनाची साधने:


राळेगणसिध्दी या गावात पाणी आडवा आणि पाणी जिरवा, ‘माती अडवा पाणी जिरवा’ अशा पध्दतीचे उपक्रम राबवले जातात त्यामुळे आज गावाच्या चारही दिशेला हिरवळ दिसते. पुर्वी केवळ ४५० मि.मी पाऊस होता पण आज प्रमाण वाढले आहे. अण्णांच्या मार्गदशर्नामुळे व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावाचा संपूर्ण परिसर हिरवळीच्या स्वरूपात बदललेला दिसून आला. सध्या गावात शेतीसाठी, पाण्याची साधने विहीर, बंधारे, बोअरवेल, तलाव, कालवा, हातपंप आणि पिण्याच्या पाण्यासाठी घरोघर ग्रामपंचायतकडून केलेली नळ योजना असल्याचे दिसून आले. गावालगत एक मोठा कालवा आहे त्यावर संस्थेकडून कामकाज पाहिले जाते. ग्रामस्थांना त्या संस्थेचे सभासद करून घेऊन त्यांना शेतीसाठी नियमानुसार पाणी दिले जाते. कालव्यामध्ये पाणी हे डिंबा, कुकडी धरणातून सोडले जाते. शेतीसाठी ठिबक योजनेचा अवलंब केला जातो आणि गावातील शेततळी, बंधारे याचाही वापर केला जातो तरीपण या गावात बागायती पिकांचे प्रमाण तुलनेत कमीच आहे. जिरायतीचे जास्त प्रमाण आहे, तसेच उन्हाळयात पाणी टंचाई जाणवते. त्यामुळे तुलनेत कमी पाण्यावर येणारी पिके घेतली जातात. मात्र पिण्यासाठी टँकरचा वापर करून पाणी ग्रामस्थांना पुरवले जाते.

### तक्ता क्रमांक ४.११
### जलसिंचन साधनांचे वर्गीकरण

| अ. क्र. | श्रमदानातील सहभाग | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | विहीरी + कॅनॉल | ३५ | ३१.८२ |
| २ | कॅनॉल + बंधारे | ३० | २७.२७ |
| ३ | बंधारे + बोअरवेल | २० | १८.१८ |
| ४ | पावसाचे पाणी | २५ | २२.७३ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

### आलेख क्र. ४.११
### जलसिंचन साधनांचे वर्गीकरण




वरील तक्ता क्र.४.११ वरून असे दिसुन येते की, एकूण ११० ग्रामस्थांपैकी ३१.८१ टक्के लोकांकडे विहीरी आणि कॅनॉलद्वारे, २७.२७ टक्के लोकांकडे कॅनॉल आणि बंधाऱ्याद्वारे, १८.१८ टक्के लोकांकडे बंधारे आणि बोअरवेल द्वारे तर २२.७२ टक्के लोक हे पावसाच्या पाण्याद्वारे आपली शेतजमीन कसत असतात.

अशा प्रकारे अभ्यासातून दिसुन आले की, विहीरी, कॅनॉल, बंधारे आणि बोअरवेलच्या आधारे येथे शेतीसाठी पाण्याचा पुरवठा केला जातो. म्हणजेच ७२.२७ टक्के लोक हे वरील साधनांद्वारे पाणीपुरवठा करतात तर फक्त २२.७३ टक्के शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहेत. राळेगणसिध्दीत प्रामुख्याने कांदा, ज्वारी, मुग, डाळींब, मका हे पिके घेतली जातात.

## ४.४ पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण:

राळेगणसिध्दीच्या विकासामध्ये पंचसुत्री कार्यक्रमाचे सर्वात जास्त योगदान आहे. अण्णांनी पंचसुत्रीच्या माध्यमातून गावाचा कायापालट घडवून आणलेला आहे. पंचसुत्री कार्यक्रमाचे महत्व गावकऱ्यांना पटवुन देऊन तरूणांना कार्यात प्रत्यक्ष सहभागी करून घेऊन आणि स्वत: त्या कामाची सुरूवात केली. प्रत्येक तरूणास ग्रामसभेचे महत्व पटवुन दिले. राळेगणसिध्दी मधील पंचसुत्री कार्यक्रमाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

### ४.४.१ चऱ्हाईबंदी:


संशोधनासाठी गावातील ११०ग्रामस्थ निवडलेले असता त्यांनी चऱ्हाईबंदी विषयक माहिती पुढील तक्त्यानुसार दिलेली आहे.

**तक्ता क्र.४.१२**
**चऱ्हाईबंदी**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | चऱ्हाईबंदी होते | १०५ | ९५.४६ |
| २ | चऱ्हाईबंदी होत नाही | ५ | ४.५४ |
| | एकूण | ११० | १०० |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१२**
**चऱ्हाईबंदी**



वरील तक्ता क्र.४.१२ वरून असे दिसुन येते की, एकुण ११० ग्रामस्थांपैकी ९५.९६ टक्के लोकांनी चऱ्हाईबंदी होते असे सांगितले तर ४.५४ टक्के लोकांनी चऱ्हाईबंदी होत नाही असे सांगितले आहे.

अशा प्रकारे अभ्यासातुन असे आढळून आले की, राळेगणसिध्दीमध्ये जनावरांना डोंगर, पठाराची जमिन, कुराणात चरण्याची बंदी घातलेली त्यातुन जनावरांना चाऱ्याची उपलब्धता होते. तेथे उगवलेला चारा लिलाव पध्दतीने विक्री केला जातो. ज्याला चाऱ्याची गरज आहे ती व्यक्ती तो चारा विकत घेतो. जवळपास ९५.९६ टक्के लोक म्हणतात की चारा बंदी केलेली आहे तर फक्त ४.५४ टक्के लोकांना वाटते की जनावरांना चराईसाठी बंदी नाही. चराईबंदीमुळे ग्रामपंचायतीस चाऱ्याच्या लिलावातुन उत्पन्न मिळते आणि ग्रामस्थांना उन्हाळयातही जनावरांना चारा उपलब्ध होतो. वर्षभर चाऱ्यासाठी शेतकरी बाजरी, नेपियर ग्रास इत्यादींची लागवड करतात.

### ४.४.२ **कुऱ्हाडबंदी:**


कुऱ्हाडबंदी म्हणजे राळेगणसिध्दीच्या अंतर्गत येणारी झाडे, वनराई यांना तोडण्यास बंदी होय. जी व्यक्ती झाड तोडेल किंवा तोडतांना दिसेल त्या व्यक्तीस १०० ते ५०० रूपयांपर्यंत दंड केला जातो. कुऱ्हाडबंदीच्या माध्यमातून झाडांची संख्या वाढवून पर्जन्यमान, पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोक कुऱ्हाडबंदी पुर्वी जाळण्यासाठी लाकडाचा वापर करत आता प्रत्येकाच्या घरी सिलेंडर गॅसची सुविधा आहे. कुऱ्हाडबंदीमुळे ग्रामस्थांचे आरोग्य व जीवनमान सुधारले आहे असे दिसून आले.

**तक्ता क्र.४.१३**
**कुऱ्हाडबंदी**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | कुऱ्हाडबंदी होते | १०५ | ९५.४६ |
| २ | कुऱ्हाडबंदी होत नाही | ५ | ४.५४ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१३**
**कुऱ्हाडबंदी**




वरील तक्त्यावरून असे दिसुन आले की, गावातील एकूण ११० ग्रामस्थांची चाचणी मधुन असे दिसुन आले कुऱ्हाडबंदी आहे म्हणणारे १०५ म्हणजेच ९५.४६ टक्के आहेत आणि कुऱ्हाडबंदी नाही म्हणणारे ०५ म्हणजेच ४.५४ टक्के ग्रामस्थांनी नाही असे सांगीतलेले आहे.

अशा प्रकारे गावात पुर्वी स्वयंपाकासाठी, घर चालवण्यासाठी दारूच्या व्यवसायासाठी खुप मोठया प्रमाणात झाडांची तोड होत असे आणि गावाची दशा भयानक झाली होती. पण गावातील कुऱ्हाडबंदी केल्यामुळे झाडांची तोड कमी झाली आणि झाडांचे महत्व जाणून लागवड मोठया प्रमाणात करण्यात आली. ग्रामपंचायतने पुढाकार घेऊन लोकांच्या सहकार्याने आजचे राळेगणसिध्दी उदयास आलेले अभ्यासातून जाणवले. तसेच आरोग्य आणि लोकांचे जीवनमानही सुधारले आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो. हे राळेगणसिध्दीच्या कुऱ्हाडबंदीवरून अभ्यासातून जाणून आले. गावातील जवळपास सगळयाच कुटुंबाकडे

गॅस कनेक्शन झालेले आहेत. गोबर गॅस आहेत त्यामुळे झाडांचा जाळण्यासाठी वापर कमी झाला आहे. परंतू तेथील काही ग्रामस्थांना अजुनही आधुनिक सुविधा न मिळाल्याने त्यांना लाकडा शिवाय पर्याय नाही त्यामुळे त्यांचे असे म्हणणे आहे की गावात कुऱ्हाडबंदी पूर्णपणे नाही असे अभ्यासावरून दिसून आले.

## **४.४.३ नसबंदी:**


संशोधनासाठी गावातील ११० ग्रामस्थ निवडलेली असता त्यांच्या कडून मिळालेली माहिती पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र.४.१४**
**नसबंदी**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | नसबंदी मधील स्त्रीयांचे प्रमाण | ८७ | ७९.०९ |
| २ | नसबंदी मधील पुरूषांचे प्रमाण | २३ | २०.९० |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१४**
**नसबंदी**




रील तक्ता क्र.४.१४ वरून असे दिसुन येते की, एकूण ११० ग्रामस्थांपैकी पुर्वी पेक्षा आता नसबंदीवर भर दिला जातो त्यामध्ये नसबंदी करण्यात स्त्रीयांचे प्रमाण ८७ म्हणजे ७९.०९ टक्के आहे आणि

नसबंदी करण्यात पुरूषांचे तुलनेने प्रमाण केवळ २३ म्हणजे २०.९० टक्के आहे असे अभ्यासातून समजले. त्यामुळे गावातील लोकसंख्या वाढीवर एक प्रकारचे नियंत्रण दिसुन आले.

अशा प्रकारे नसबंदीमुळे कुटुंबामध्ये एक प्रकारचे स्थैर्य दिसुन आले आणि लहान कुटुंब सुखी कुटुंब या उक्ती प्रमाणेच गावात लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आलेले दिसुन आले. तसेच कुटुंबही सुखी जीवन जगताना दिसुन आली यामुळे ग्रामस्थांच्या जीवनशैली मध्ये सुधारणा झालेली दिसुन आली.

### ४.४.४ नशाबंदी:


संशोधनासाठी गावातील ११० ग्रामस्थ निवडलेली असता त्यांच्याकडून मिळालेली माहिती पुढील तक्त्यामध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र.४.१५**
**नशाबंदी**

| अ.क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | व्यसन करणारे | १६ | १४.५५ |
| २ | व्यसन न करणारे | ९४ | ८५.४५ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१५**
**नशाबंदी**



वरिल तक्ता क्र.४.१५ वरून असे दिसुन येते की, गावात ११० एकूण ग्रामस्थांच्या प्रतिसादावरुन  असे समजले की, व्यसन न करणारे ग्रामस्थांची संख्या ही ९४ म्हणजे ८५.४५ टक्के इतकी आहे आणि तुलनेत व्यसन करणारे लोक हे १६ म्हणजे १४.५५ टक्के एवढे प्रमाण आढळुन आले.

अशा प्रकारे राळेगणशिंदी मधून अण्णांच्या मागदर्शनानुसार आजचे राळेगणसिध्दीमध्ये झालेले रूपांतर आणि तेथे असलेली व्यसनमुक्ती ही पुर्णपणे बंद नसुन काही प्रमाणात आढळून आली आणि त्या व्यसनाची साधने गावात नसुन इतर गावातून आणून केले जातात किंवा गावाबाहेरून करून गावात येतात पण त्याची जाण अण्णांना होऊ देत नाहीत पण त्याचे प्रमाण कमी आहे. जर अण्णांना ही गोष्ट लक्षात आलीच तर अण्णा आता त्या व्यक्तीला पोलीसांच्या स्वाधीन करतात, गावात पान, तंबाखु, सिगारेट, विडी, गुटखा, दारू इ. व्यसन होत आहे हे अभ्यासातून दिसून आले आहे आणि त्याचे कारण असे समजले की, गावातील काही तरूणवर्ग हा सैन्यामध्ये असल्यामुळे त्यांना बंधन नाही त्यामुळेच गावातील इतर तरूणांनाही त्यांच्या सोबत छुप्या पध्दतीने व्यसन करण्यास संधी सहजच मिळते असे निरीक्षणातून निष्पन्न झाले.

### ४.४.५ श्रमदान:

राळेगणसिध्दीमध्ये श्रमदानाव्दारे अनेक सार्वजनिक कामे पार पाडलेली आहेत आणि अजूनही वर्षभर ती कामे केली जातात उदा. ग्रामस्वच्छता ,सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक सण, उत्सव या कामात प्रत्येक घरातील एक व्यक्ती श्रमदानासाठी जातात.जर एखादया कुटुंबातील व्यक्ती जाऊ शकली नाही तर आपल्या ऐवजी एखादया व्यक्तीला मजूरी देउन त्या व्यक्तीस तेथे पाठवले जाते म्हणजेच आपण जरी प्रत्यक्ष काम नाही करु शकलो तरी आपले श्रमदान तेथे अप्रत्यक्ष कार्यरत असते, श्रमदानातून गावाचा विकास होण्यास खूप मोठया


प्रमाणावर मदत झालेली आहे. श्रमदानात सहभागी झालेल्या व्यक्तीची माहिती पुढील तक्यात दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ४.१६**
**श्रमदान कार्यक्रमाचे वर्गीकरण**

| अ. क्र. | श्रमदानातील सहभाग | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | श्रमदानामध्ये सहभागी होतो | १०० | ९०.९१ |
| २ | श्रमदानामध्ये सहभागी होत नाही | १० | ०९.०९ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र.४.१६**
**श्रमदान कार्यक्रमाचे वर्गीकरण**




वरील तक्ता क्रमांक ४.१६ वरून असे दिसुन येते की, एकूण ११० ग्रामस्थांपैकी ९०.९१ टक्के ग्रामस्थ हे श्रमदानात सहभागी होतात तर ०९.०९ टक्के ग्रामस्थांना कामाच्या निमित्ताने श्रमदानात सहभागी होता येत नाही.

श्रमदानात सहभागी होऊन सार्वजनिक कार्य पार पाडली जातात. जवळपास सर्वाधिक लोक (९०.९१ टक्के) हे श्रमदानात सहभागी होतात तर फक्त (९.०९ टक्के) लोक फक्त श्रमदानात सहभागी होत नाही. जे लोक प्रत्यक्ष सहभागी नसतात ते आपल्या ऐवजी एखादया व्यक्तीस वेतन देऊन त्या ठिकाणी कामास पाठवतात.

## ४.५ राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती:

राळेगणसिध्दीतील संशोधन करीता निवडलेल्या ११० ग्रामस्थांना आरोग्याविषयीची माहिती घेतांना तेथील नागरीकांना कोणत्या आजारांना सामोरे जावे लागते आणि उपचाराबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया जाणुन घेतल्या आहेत.

### ४.५.१ आजारांची माहिती:


राळेगणसिध्दीतील आजारासंबंधी माहिती निवडलेल्या ११० ग्रामस्थांकडुन मिळविलेली आहे. त्याची माहिती पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.४.१७**
**आजारांची माहिती**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | सर्दी, ताप, खोकला इ. | ८८ | ८० |
| २ | जुलाब, उलटया | १८ | १६.३६ |
| ३ | कावीळ | ०४ | ३.६३ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१७**
**आजारांची माहिती**




वरिल तक्ता क्र.४.१७ वरून असे दिसून येते की, गावात सर्दी, ताप, खोकला इ. आजार होण्याच्या ग्रामस्थांची संख्या ८८ म्हणजे ८० टक्के आहे आणि जुलाब, उलटया होणाऱ्या आजारांची संख्या १८

म्हणजेच १६.३६ टक्के आहे तसेच कावीळ आजार होणाऱ्यांची संख्या ०४ म्हणजे ३.६३ टक्के आहे हे एकूण ११० ग्रामस्थांच्या प्रतिसादातुन असे दिसुन आले.

अशा प्रकारे गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे पण संपूर्ण गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात ते अपुरे आहे. आणि गावातील एकूण हवामान चांगले असल्यामुळे तेथे मोठया आजाराचे प्रमाण किरकोळ आहे. साधारणतः सर्दी, ताप, खोकला इ. आजार येणारे ग्रामस्थांची संख्या इतर आजाराच्या तुलनेत जास्त आहे. तसेच जुलाब व उलटया कावीळ आजारांची संख्या कमीच आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठया आजारासाठी तालुक्यास पाठविले जाते.

## ४.५.२ औषधांची माहिती:


राळेगणसिध्दीतील आजारांवर उपचार तेथील प्राथमिक आरोग्याकेंद्रातुन घेतला जातो. तेथील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र.४.१८**
**औषधांची माहिती**

| अ. क्र. | प्रतिसाद | वारंवारिता | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य केंद्रातून मोफत औषधे काही आजारावर मिळतात | १०५ | ९५.४५ |
| २ | आरोग्य केंद्रातून मोफत औषधे काही आजारावर मिळत नाहीत | ०५ | ५.५५ |
| | **एकूण** | **११०** | **१००** |

(संदर्भ:— क्षेत्रीय पाहणी)

**आलेख क्र. ४.१८**
**औषधांची माहिती**




वरील तक्ता क्र.४.१८ वरून असे दिसुन येते की, राळेगणसिध्दी या गावात प्राथमिक आरोग्य केंद्रावर मिळणाऱ्या सुविधांबाबत ९५.४५ टक्के ग्रामस्थांनी समाधानी आहेत असे सांगितले तर फक्त ५.५५ टक्के ग्रामस्थांनी असमाधानी आहेत असे सांगितले.

अशा प्रकारे दिसुन आलेल्या माहितीवरून असे म्हणता येईल की, राळेगणसिध्दी या गावातील लोकांना छोटया छोटया आजारावर औषध मिळते परंतु डेंग्यू, मलेरीया यासारख्या आजारांवर तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते.

गावामध्ये वेळेवर स्वच्छता असल्यानेही गावात इतर आजारांचे प्रमाण कमी दिसुन येते. झाकलेले गटारे, वेळेवर औषध फवारणी यामुळेही आजार कमी दिसतात.

## ४.६ शासकिय अधिकाऱ्यांची विकासाबाबत मते:

### तलाठी व ग्रामसेवक:

राळेगणसिध्दी या गावातील विकासाचे कामे करताना तलाठी हे संपुर्ण गावाचा कारभार महसूल खात्याचे गावपातळीवरील प्रमुख या नात्याने पाहतात. शासनाच्या विविध योजना राबविताना ग्रामसेवक, सरपंच, ग्रमस्थ यांच्या मदतीने योजना प्रत्यक्षात पुर्ण करण्यास मदत

होते आणि या योजनांचे नियोजन तलाठयांच्या नियोजनानुसार असते. राळेगणसिध्दी मध्ये योजना राबविताना पहिल्यांदा ग्रामसभेत माहिती दिली जाते आणि जरी लोकांना समजले नसल्यास त्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थ भेटुन समजून घेतात. आणि काही योजना राबविताना तलाठयांच्या सांगण्यानुसार ग्रामस्थांकडून अडवणूक सुध्दा होते पण अण्णांच्या सहकार्यामुळे ती सोपी केली जाते.

अशा प्रकारे तलाठी हा विविध प्रकारचे कर शासकिय नियमानुसार लावतो व गोळा करून ग्रामविकासात भर टाकतो. तलाठी हा शासनाचा गावपातळीवरील अधिकारी असल्याने प्रत्येक कामाचा लेखाजोखा शासनाला सादर करावा लागतो. त्यासाठी तो जबाबदार असतो. राळेगणसिध्दी मध्ये इतर गावापेक्षा लोक जागरूक आहेत असे त्यांच्या बोलण्यातून जाणवते. कुठलीही योजना ग्रामस्थ स्वत: होऊन जाणून घेण्यास तयार असतात. काही योजना सोडल्या तर जवळपास सर्वाचे काम करताना सहकार्य मिळते असे त्यांच्या सांगण्यातून जाणवते.

ग्रामसेवक हा सुध्दा शासनाचाच एक घटक असून गाव पातळीवरील काम पाहण्यासाठी नियुक्ती केलेली असते. त्यांच्या कडून नळपट्‌टी, घरपट्‌टी, शैक्षणिक कर, व्यावसायीक कर, जमिन कर इ. बाबीवर कर लादणे व गोळा करणे, ग्रामस्थांना पावती देणे, विविध योजनेची माहिती देणे व सहकार्य करणे इ. कार्य केली जातात. त्यासाठी महसूल खात्याचे दोन अधिकारी राळेगणसिध्दीमध्ये कार्यरत आहेत हे दिसुन आले. सदरील गावाचा अभ्यास करताना अधिकाऱ्यांची मदत झाली.

## ४.७ राळेगणसिध्दीतील नवीन प्रकल्पः

१. पाणी शुध्दीकरण मशिन बसविणे व त्यामधून संपूर्ण गावाला स्वस्त दरात शुध्द पाणी देणे.

२. जनसुविधा योजनेअंतर्गत स्मशानभूमी देखभाल दुरूस्ती प्रस्ताव सादर झालेला आहे.

३. गावाला भेट देणाऱ्या लोकांना एकाच वेळी २०० ते ३०० पाहुण्यांना मार्गदर्शन करता यावे यासाठी मल्टीपर्पज हॉल प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

४. राळेगणसिध्दी ते जांभुळटिका रस्त्याचे डांबरीकरण करणे.

५. दलित वस्तीमध्ये सार्वजनिक शौचालयाचे काम पुर्ण तसेच घनकचरा विल्हेवाटीसाठी कचरा कुंडया तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

६. गावासाठी शिवरस्ते बांधणे.

७. शाळेतील मुलांना जातीचे दाखले देणे.

८. अल्पभुधारकांसाठी आमआदमी योजना.

९. गावामध्ये सोलर पंप वापरण्यासाठीचा मोठा प्रकल्प भविष्यामध्ये येणार आहे. त्यामध्ये ग्रामपंचायत व खाजगी कंपनीचा सहभाग आहे. प्रकल्प ग्रामपंचायत मार्फत राबविला जाईल, यात गावात वीज तयार करून वापरण्यात येईल.

## ४.८ राळेगणसिध्दीतील समस्याः

राळेगणसिध्दीच्या विकासाचा अभ्यास करताना संशोधकास काही समस्या आढळून आल्या त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. गावात निवडणुकीतून निवडून येणाऱ्या व सत्ता मिळवण्यासाठी अंतर्गत राजकारण जास्त प्रमाणात दिसुन आले आहे, पण ते उघडपणे दिसुन येत नाही. सर्वजण एकच आहेत असा आदर्श मांडण्यात येतो.

२. शासकिय योजना गावात येणाऱ्या प्रत्येक शासकीय योजनांचा लाभ हा सर्व समाजातील लोकांपर्यंत पोहचू दिले जात नाही कारण विशिष्ट

समाजाचा अंतर्गत राजकारणामुळे अडवणूक होते. काही कुटुंबाना डावलेले जाते.

३. अण्णा हजारेनी गावातील सरपंचाच्या निवडणुकीचा भार ग्रामस्थांकडे सोपवून दिलेला आहे त्यामुळे अण्णा त्याकडे दुर्लक्ष करतात कारण त्यांना या गोष्टी नकोशा वाटतात आणि अंतर्गत लोकांच्या नाराजीमुळे राजकारण कुचकामी बनत जात आहे.

४. गावात व्यसनाचे प्रमाण आहे, त्याची साधने शेजारील गावातुन उपलब्ध होतात पण या सर्व गोष्टी अण्णांना न कळताच केल्या जातात.

५. गावातील विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेच्या शिक्षणासाठी बाहेर गावी जावे लागते इथे केवळ कला व विज्ञान शाखेचाच अभ्यास होतो.

६. गावात खाजगी डॉक्टर, मेडीकल, किंवा हार्डवेअर दुकाने, महाविद्यालयीन शिक्षणाचा अभाव आहे.

७. गावात प्रवाशांना थांबण्यासाठी बस थांबा नाही लोक रस्त्यावरच उभे राहतात त्यामुळे वाहतुकीस अडथळे येतात.

अशा प्रकारे अण्णांमुळे गावाचा विकास ग्रामस्थांच्या सहकार्यामूळे झाला पण गावातील बऱ्याच समस्या सोडवण्याची गरज आहे असे अभ्यास करताना दिसुन आले आहे.

## ४.९ सारांश:

प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करताना संशोधकास असे आढळुन आले की, राळेगणशिंदी चे रूपांतर राळेगणसिध्दी मध्ये करताना अण्णा हजारे आणि ग्रामस्थांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून संपुर्ण गावाचा चेहरा बदलुन टाकला आहे. तसेच राळेगणसिध्दी गावाचे नाव आज आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन पोहचवले आहे. आज जगाच्या विविध देशातून या गावातील सुधारणेचा अभ्यास करण्यासाठी लोक भेटी देतांना दिसुन आले. तसेच गावातील एकता पण चांगली आहे पण हे सर्व

अण्णांच्या नंतरही असेच राहील काय? यावर मला थोडी शंकाच वाटत आहे.

गावात पंचसुत्री कार्यक्रमामध्ये व्यसन मुक्ती संपुर्ण ग्रामस्थांची आहेच असे नाही आणि गावात काही समस्या हि दिसुन आल्या त्याचा या प्रकरणात सविस्तर अभ्यास केला आहे.

# प्रकरण पाचवे

# सारांश निष्कर्ष आणि उपाययोजना

५.१ प्रस्तावना

५.२ प्रकरणांचा सारांश

५.३ निष्कर्ष

५.४ उपाययोजना

५.५ नवीन संशोधनाची दिशा

# प्रकरण पाचवे

# सारांश निष्कर्ष आणि उपाययोजना

## ५.१ प्रस्तावना:

पंडित आणि ज्ञानी यात खूप फरक आहे. ग्रंथवाचनातून पांडित्य येते तर अनुभवातून ज्ञान प्रगट होते. एखाद्या कार्यकर्त्याने आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून त्या दिशेने प्रत्यक्ष कृतिकार्य सुरू केले, काम सुरू केले तर तेच काम त्याचा गुरू बनते. त्यातून त्याचा अनुभव संचित होऊन त्याला सत्यज्ञान प्राप्त होते. श्रीसंत गाडगेबाबा, श्रीसंत तुकडोजी महाराज कुठल्याही शाळा कॉलेजात गेले नव्हते; परंतु त्यांच्यापाशी अनुभवसिध्द ज्ञानाचे भांडार होते. त्याद्वारे त्यांनी समाजाचे अज्ञान दूर करून आदर्श समाज निर्माण करण्याचा जीवनभर प्रयत्न केला. दिनदलितांची सेवा हीच त्यांनी ईश्वरसेवा मानली. त्याच ध्येयाने अण्णाची व राळेगणसिध्दीकरांची वाटचाल सुरू झाली. मानवसेवेतून ईश्वरसेवाकार्य करीत असताना 'कामच, कामाचा' गुरू बनला. त्यातून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व दिशा मिळाली. त्याप्रमाणे काम उभे राहून दुष्काळग्रस्त राळेगणसिध्दीचा उध्दार झाला. तो उध्दार पाहण्यासाठी महाराष्ट्रासह देशातल्या विविध राज्यातून व परदेशातून लोक राळेगणसिध्दीला येतात. भारताच्या विकासामध्ये खेडयांना आदर्श व स्वावलंबी बनविणे हा अण्णा हजारे यांचा विचार क्रांतीकारक व महत्त्वाचा विचार ठरतो. माझे गाव हेच विकासाचे तीर्थ आहे, अशी अण्णांची विकास दृष्टी होय. ग्राम परिवर्तन ही संकल्पना स्पष्ट करताना अण्णा हजारे म्हणतात, 'कार्यकर्त्यांनी ध्येयवाद ठरवून ध्येयवेडा होऊन जेव्हा जे कार्य करीत असतात तेव्हा मीच कामाचा गुरू होऊन पुढील कामांचे ज्ञान होत असते. कारण ज्ञानाचा उगम हा फक्त पुस्तकातूनच होत नाही तर तो अनुभवातून होत असतो'.

सामान्य जनतेला स्वत:ची जाणीव तसेच सरकारला जबाबदारीची जाणीव करून देण्यात आणि जनतेचे सेवक असल्याची जाणीव राजकारण्यांना करून देवून राळेगणसिध्दीचे नाव जगाच्या नकाशावर ठसा उमठवण्याचे कार्य व लोकांनी अण्णांना दिलेली प्रती गांधी हि पदवी सर्व भारतीयांसाठी गौरवास्पद आहे. राळेगणशिंध्दी ते राळेगणसिध्दीचा प्रवास तो सूध्दा गांधीवादी विचाराने साकार करताना तेथील लोकांच्या जीवनावर अण्णांचा झालेला प्रभाव जाणून घेणे व अशा प्रकारे समाजातील सर्व समाज सेवकांकडून केलेल्या विकासाचा अढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

प्रस्तूत प्रकरणात सदरील प्रबंधामध्ये संशोधनाअंती काढलेले सारांश, निष्कर्ष आणि उपाययोजना, व पुढील संशोधनाची दिशा यांचा अभ्यास केला आहे.

## ५.२ प्रकरणांचा सारांश:

### प्रकरण पहिले — प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

सुरुवातीला प्रस्तुत विषयाच्या संदर्भाने श्री अण्णा हजारे व राळेगणसिध्दी यांच्या संदर्भाने सविस्तर चर्चा केली असून अण्णांच्या कार्याचा व राळेगणसिध्दीचा आदर्श गाव म्हणून झालेल्या कायापालटाच्या संदर्भाने चर्चा विश्व उभे केले आहे. त्यातून पुढे आलेले संशोधन प्रश्न व त्या प्रश्नांचे परिमार्जन इ. ची सविस्तर चर्चा केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सुरुवातीला प्रस्तूत विषयाच्या संदर्भाने श्री. अण्णा हजारे राळेगणसिध्द्री यांच्या संदर्भाने सविस्तर चर्चा केली असुन अण्णांच्या कार्याचा व राळेगणसिध्द्रीचा आदर्शगाव म्हणून झालेल्या कायापालटाच्या संदर्भाने चर्चेचे विश्व उभे केले आहे. त्यातून पुढे आलेले संशोधन प्रश्न व त्या प्रश्नांचे परिमार्जन इ. ची सविस्तर चर्चा केली आहे. संशोधन विषयाचे महत्व, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टये,

संशोधनाची गृहितके, तथ्य संकलनाची साधने किंवा संशोधन पध्दती, नमुना निवडीचा आकृतीबंध, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा, संभाव्य प्रकरण योजना इत्यादी घटकाची मांडणी केली आहे.

प्रकरण पहिल्यात संशोधकाने ग्रामीण विकासासंबधी कार्ये केलेल्या समाजसुधारकांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. आणि संशोधन पध्दतीची माहिती दिलेली आहे. संशोधन पध्दतीत संशोधनाच्या पायऱ्या, विषयाची निवड, गरज, महत्व, ग्रहितके, उद्‌दिष्टै, तथ्य संकलनाची साधने, नमुना निवडीची पध्दती, सांख्यिकी विश्लेषण, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, प्रकरण रचना इ. माहितीची मांडणी करण्यात आलेली आहे.

ग्रामीण विकासामध्ये वेळोवेळी केलेल्या समाजसुधारकांचे विचार व त्यांच्या कार्याचा अभ्यास मग तो हेमलकसा ते राळेगणसिध्दी विकासाच्या सुत्रांचा अभ्यासाची मांडणी केलेली आहे. तुकडोजी महाराज, ज्ञानेश्वर महाराज,तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, आमटे परिवार, बंग परिवार, ंपंडित नेहरु, महात्मा गांधी यांच्या कार्याचाही आढावा संशोधकाने उपलब्ध माहितीद्‌वारे घेतला आहे.

## प्रकरण २: संदर्भ साहित्याचा आढावा:

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी निगडीत संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यासाठी पीएच.डी. प्रबंध, एम. फील्. लघुशोध प्रबंध, एम. एड लघुशोध प्रबंध, पुस्तके, मासिके, संशोधन पेपर इ. चा आढावा, पुर्नसंशोधनाची आवश्यकता इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. संदर्भ साहित्याचा आढावा ंसंशोधकाने घेतलेला आहे. संशोधकाने निवडलेल्या अभ्यासाचा विषय हा ‘ग्रामीण विकास’ या क्षेत्रात येतो. संबधित विषयासंबधीच्या पुर्वीच्या संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने विविध संस्था, विद्यापीठांच्या ग्रंथालयाना भेटी दिल्या आहेत. व तेथून संबधित विषयाशी निगडित विविध शोध प्रंबधांचा आढावा

घेतलेला आहे. त्याचप्रमाणे विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संशोधन पेपर, कात्रणे, शासकिय कार्यालयातून माहिती गोळा करुन त्याचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

वरील सर्व संदर्भाचा अभ्यास करताना संशोधकास असे आढळून आले की अण्णा हजारेंचा सर्वसामान्य जनतेवर पडलेला प्रभाव व तसेच झालेला ग्रामीण विकासात कसा बदल घडत गेला. तसेच राळेगणसिध्दी परिसरात झालेल्या हवामान व शेती पिकांच्या रचनेत झालेला बदल आणि कार्याचा संशोधकाने आढावा घऊउन मांडणी केलेली आहे.

## प्रकरण ३: अण्णांचे जीवन आणि राळेगणसिध्द्ीच्या विकासातील योगदानः

प्रस्तूत प्रकरणामध्ये विकासाची व्याख्या, ग्रामीण विकास,ग्रामीण विकासाची व्याख्या,ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाची संकल्पनेचा विकास, ग्रामीण विकासासंबंधी दृष्टीकोन, ग्रामीण विकासाची कार्यक्रम, ग्रामविकासाची प्रारूपे (नेहरू प्रारूप, गांधी प्रारूप, आणि अण्णा हजारेंचे प्रारूप), अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्द्ी ग्रामीण विकासातील योगदान, अण्णांच्या दृष्टीकोनातून ग्रामीण विकासातील समस्या इत्यादींचा अभ्यास केलेला आहे.

संशोधकाने अण्णांच्या जीवनातील घडामोडी त्यांच्या बालपणापासून ते सैन्यातील शेवट व राळेगणसिध्दीसाठी केलेला त्याग, राळेगणसिध्दीमधील आगमण आणि विकासाचा घेतलेला ध्यास तेथील सामाजिक, राजकिय, आर्थिक घडामोडींचा झालेल्या बदलांचा आढावा आणि अण्णा एक व्यक्तिमत्व म्हणून कशाप्रकारे उदयास आले आणि त्यांना कोणाच्या प्रेरणेने विकास सुत्राचा विचार डोक्यात आला. हे सर्व अभ्यासात मांडणी केलेली आहे. ग्रामसभेद्वारे गावातील सर्व समस्या सोडविण्याचा आणि सर्व स्त्री—पुरुषांना ग्रामसभेत समान अधिकार गावातील सण,उत्सव, माता पित्यांचा सन्मान , मुलींच्या जन्माचे स्वागत, नववधुंचा सत्कार तसेच गावातील पंचसुत्री, शेतीतील पाण्याचा व

पिण्यासाठी पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यास गावक—याचे सामजस्याने सहकार्य मिळवले. आणि संपूर्ण गावाचा विकास त्या सर्व बदलांचा अभ्यास आणि इतर समाज सुधारक म्हणजे आमटे परिवार, बंग परिवार, महात्मा गांधी, पंडित नेहरु, ज्ञानेश्वर महाराज, तुकडोजी महाराज, तसेच स्वामी विवेकानंदानी दाखविलेला मार्ग अनुसरुन अण्णांनी बदल घडवून आणला आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करण्यात आलेला आहे.

**प्रकरण ४: माहिती व राळेगणसिध्दीच्या वस्तुस्थितीचे विश्लेषण:**

संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात राळेगणसिध्दी गावातील जनतेकडून ११० लोकांचे मुलाखतीद्वारे संगहित केलेली माहिती शास्त्रीय पध्दत वापरुन मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये वेगवेगळया पातळीवरील विविध माहितीचा अभ्यास अण्णांकडून झालेल्या विकासकार्याचा अभ्यास या सर्व गोष्टींचा आढावा घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वयोगट, शैक्षणिक माहिती, कौटुंबिक, व्यावसायिक, जातनिहाय वर्गीकरण, ग्रामविकासाशी संबंधित माहितीचे वर्गीकरण, राळेगणसिध्दीच्या ग्रामविकाससंबंधी ग्रामस्थांची मते, ग्रामसभेची वारंवरिता, ग्रामसभेत ग्रामस्थांची उपस्थिती, ग्रामसभेतील विषय, ग्रामपरिवर्तन दिन, राळेगणसिध्दीतील सण व उत्सव यांचे विश्लेषण, राळेगणसिध्दीचे वेगळेपण, राळेगणसिध्दीच्या विकासात तरूणांचा सहभाग, जलसिंचनाची साधने, पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण, राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती, शासकिय अधिकाऱ्यांची विकासाबाबत मते, राळेगणसिध्दीतील नविन प्रकल्प, राळेगणसिध्दीतील समस्या इत्यादींचा अभ्यास केलेला आहे.

## प्रकरण ५: सारांश, निष्कर्ष, आणि उपाययोजना:

प्रस्तूत प्रकरणामध्ये संबधित विषयाबाबत कथन तसेच वरील चार प्रकरणांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रत्येक प्रकरणात संकलित माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत.

हे सर्व शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करुन मांडणी करण्यात आलेले आहे. आणि निष्कर्ष, उपाययोजना तसेच नविन संशोधनाची दिशा पुढील अभ्यासकासाठी विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे. तसेच 'राळेगणसिध्दी' या गावाच्या सर्वांगिण विकासाठी काही उपाययोजना सुचविल्या आहेत.

### ५.३ निष्कर्ष:

१. एकूण ११० ग्रामस्थांपैकी २७.२७ टक्के प्रमाण हे १८ ते ३५ वयोगटातील ग्रामस्थ आहेत. ३६ ते ४५ वयोगटातील ग्रामस्थांचे प्रमाण ३१.८२ टक्के इतके आहेत. ४६ ते ६० या वयोगटातील ग्रामस्थांचे प्रमाण ३६.३६ टक्के इतके आहे तर ६० च्या पुढील वयोगटातील ग्रामस्थ ०४.५५ टक्के इतके आहेत.

संशोधनासाठी संशोधकाने १८ वर्षे ते ६० वर्षावरील ग्रामस्थ या वयोगटातील ग्रामस्थांकडुन प्रश्नावली भरून घेऊन प्रत्येक वयोगटातील ग्रामस्थाची माहिती मिळविलेली आहे. ६० वयोगटाच्या पुढील व्यक्तींनी अधिक अनुभव असल्याने चांगल्या प्रकारे माहिती दिली आहे.

२. एकूण ११० ग्रामस्थांपैकी प्राथमिक ते दहावी पर्यंत शिक्षण घेतलेले ३६.३६ टक्के, उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेले ३१.८२ टक्के, महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले १८.१९ टक्के, पदवीत्तर शिक्षण घेतलेले ०४.५५ टक्के आणि निरीक्षर असलेल्यांचे प्रमाण ०९.१० टक्के इतके आहेत.

अशा प्रकारे आपणास असे दिसुन येते की, एकूण साक्षरतेचे प्रमाण ९१.९० टक्के अधिक आहे तर निरक्षरतेचे प्रमाण ९.१० टक्के इतके कमी दिसुन आले.

३. १ ते ४ व्यक्ती असलेली कुटुंबे ५९.०९ टक्के आहेत, ५ ते ८ व्यक्ती असलेली कुटुंबे ३१.८१ टक्के आहेत तर ८ च्या वरील व्यक्ती असलेले कुटुंबे ९.०९ टक्के आहेत.

अशा प्रकारे असे दिसुन येते की १ ते ४ व्यक्ती असलेली कुटुबांची संख्या सर्वाधिक दिसुन येते कारण राळेगणसिध्दीमध्ये कुटुंब नियोजन या माध्यमातुन तरूणांवर प्रभाव पडल्याने त्यांनी अधिक अपत्य नको यास मान्यता दर्शविलेली दिसुन येते. तसेच ५ ते ८ व्यक्ती असलेली कुटुंबांची संख्येचे प्रमाण कमी झालेले आहे तर ८ व्यक्ती पेक्षा अधिक कुटुंबाचे प्रमाण नगण्य दिसुन येते. त्यात फक्त संयुक्त कुटुंबाचा समावेश होतो.

४. शेती व्यवसाय करणारे ५९.१० टक्के, व्यवसाय करणारे ३२.७३ टक्के, नोकरी करणारे ९.१० टक्के, आणि रोजगार व घरकाम करणारे ९.१० टक्के लोक आढळून आले. वरील तक्त्यानुसार असे स्पष्ट होते की, शेती व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक (५९.१० टक्के) दिसुन आले. व्यवसाय करणारे म्हणजेच दुग्ध व्यवसाय, हॉटेल व्यवसाय करणारे (२२.७८ टक्के) म्हणजेच तेथे जोडव्यवसायाच्या संधी निर्माण झाल्यानेही लोकांचा विकास झालेला आहे. नोकरी करणारे (९.१० टक्के) म्हणजेच सैन्यात भरती होणारे, इंजिनिअर, डॉक्टर, प्राध्यापक इत्यादी लोकांचे प्रमाणात वाढ होतांना दिसुन येत आहे तर फक्त ९.१० टक्के लोक हे रोजगार किंवा घरकाम करणारे दिसुन आलेले आहे.

५. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना असे आढळून आले कि, सर्वसाधारण (३१.८२ टक्के), इतर मागासवर्गीय (२५.४५ टक्के) यांचे प्रमाण अधिक दिसुन येते. तसेच अनुसूचित जातीमध्ये महार व चांभार यामध्ये महार

जातीच्या लोकांचे प्रमाण (२२.७३ टक्के), चांभार जातीच्या प्रमाणात (०९.१० टक्के) जास्त दिसुन येते. तसेच पारधी ५.४५ टक्के, कोळी २.७३ टक्के, गोंधळी २.७३ टक्के या जातीच्या लोकांचे प्रमाण तुलनेत खूप कमी आढळले आहे.

राळेगणसिध्दी मधील एकूण ११० ग्रामस्थांची मते विचारात घेतली असता विधान १ नुसार पुर्वीच्या राळेगणशिंदीच्या पेक्षा आताच्या राळेगणसिध्दीमध्ये ग्रामविकासाशी सहमत असलेले ग्रामस्थ १०० म्हणजे ९०.९१ टक्के आहेत तर ग्रामविकासाशी असहमत असलेल्या ग्रामस्थांची संख्या १० म्हणजे ९.०९ टक्के आहेत असे आढळून आले आहे.

६. अशा प्रकारे अभ्यासातून असे दिसून आले की, ज्या ग्रामस्थांचा शेती, दुग्धव्यवसाय, हॉटेल व्यवसाय, कापड व्यवसाय, किराणा व्यवसाय इ. मधील ग्रामस्थ राळेगणसिध्दीच्या विकासात झालेल्या बदलाशी सहमत आहे, त्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच असहमत असलेल्यांचे प्रमाण कमी आहे, त्याचे कारण ग्रामविकासातील झालेला बदल हा 'नैसर्गिकचं आहे' तो मा. अण्णांकडून झालेला नाही असे समजुन आले आणि कांही विशिष्ट कुटुंबाचा गावात निवाराच नाही. ते मागच्या दोन पिढयांपासून राहुनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे त्यांची असहमती दिसून आली आहे.

७. राळेगणसिध्दी मधील एकूण ११० ग्रामस्थांपैकी ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थिती १०० टक्के असते असे म्हणणारे ग्रामस्थांची संख्या केवळ ३५ म्हणजेच ३१.८१ टक्के एवढी आहे आणि ७५ टक्के ग्रामस्थांची उपस्थिती म्हणणारे ग्रामस्थांची संख्या ही ४० म्हणजेच ३६.३६ टक्के आहे व ५० टक्के उपस्थिती आहे म्हणणारे ग्रामस्थांची संख्याही केवळ २५ म्हणजेच २२.७३ टक्के आहे आणि २५ टक्के उपस्थित म्हणणारे ग्रामस्थांची संख्या ही १० म्हणजेच ९.१० टक्के आहे असे अभ्यासातून दिसून आले.

अशा प्रकारे संशोधकास असे दिसुन आले की मा. अण्णा हजारे जेव्हा गावात उपस्थित असतात तेव्हा सर्वच ग्रामस्थ ग्रामसभेमध्ये उपस्थिती लावतात. त्यांच्या म्हणण्यानूसार अण्णा राहीले तेव्हा कोणतेही निर्णय पटकन घेतले जातात. ते नसतील तर निर्णयास विलंब होतो. काही ग्रामस्थ म्हणतात की, ग्रामसभा भरवली जाते तेव्हा अण्णा नसतील तर ग्रामसभेत गावातील सरपंच किंवा उपसंरपच किंवा जेष्ठ नागरिकांच्या समक्ष सभा घेतली जाते तेव्हा विषयानुसार किंवा सभेपुढच्या समस्यानुसारच लोक उपस्थिती लावतात. त्यामध्ये वरिल तक्त्यात पाहिल्या प्रमाणेच ग्रामस्थांची संख्या कमी होत गेल्याचे दिसून येते म्हणजेच गावातील ग्रामसभा ही अण्णांच्या व्यक्ती वलयाचा प्रभावावरच चालणारी दिसुन येते. अण्णा नसतील तर सभा होत नाही, पुढे ढकलली जाते किंवा निर्णय घेण्यासाठी अपूर्ण ठेवले जातात असे दिसून आले.

८. ग्रामसभेमध्ये साधारणत: ११० ग्रामस्थांच्या प्रतिसादावरून असे समजले की, ग्रामसभेत ग्रामसुधारणा या विषयावर चर्चा होते असे म्हणणारे ग्रामस्थ संख्या ५५ म्हणजे ५० टक्के आहे व विविध शासकिय योजनावर १५ म्हणजेच १३.६४ टक्के ग्रामस्थ तर लोकशिक्षण विषय म्हणणारे १० म्हणजे ९.०९ टक्के व कौटुंबिक हिंसाचार व भांडणे यावर चर्चा म्हणणारे २० म्हणजेच १८.१८ टक्के ग्रामस्थ दिसुन आले आहेत.

९. **ग्रामपरिवर्तन दिन:**

१. ग्रामस्वच्छता: ग्रामपरिवर्तन दिनाच्या निमित्ताने संपूर्ण गावातील स्वच्छता केली जाते. गावातील सर्व लोक या कार्यक्रमात आनंदाने सहभागी होतात.

२. रक्तदान शिबीर: या दिवशी गावामध्ये रक्तदान शिबिराचा कार्यक्रम घेतला जातो.

३. नवविवाहीत सुनांचा सन्मान: वर्षभरात लग्न झालेल्या नवविवाहीत वधूंचे राळेगणसिध्दी परिवारात खणानारळाने आणि साडीचोळी देऊन त्यांची ओटी भरून त्यांना शुभ अशीर्वाद देऊन सन्मान केला जातो.

४. नवजात बालक: बालीकांच्या जन्माचे स्वागत: आजची बालके ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ समजुन प्रत्येक जातीतील बालक बालीकेला नवीन कपडे देऊन त्यांच्या जन्माचे स्वागत करतात आणि ही सर्व बालके राळेगणसिध्दी परिवारातील आहे या भावनेने शुभ आशिर्वाद दिला जातो.

५. ग्राममाता: ग्रामपिता म्हणून पूजन: ग्रामपरिवर्तन दिनी गावातील सर्वाधिक वय आहे अशा एक महिला व एक पुरूषांचा ग्राममाता—ग्रामपिता मानून त्यांचे सर्व गावकरी पूजन करतात व त्यांना वस्त्रदान करतात.

६. गावच्या उज्ज्वल भविष्यासाठी गावची लोकसंख्या मर्यादित ठेवणे गरजेचे आहे असे मानून ज्या नवविवाहीत वधूवरांनी शस्त्रक्रिया करून एकाच आपत्यावर परिवार नियोजन केले अशा जोडप्यांचा सत्कार ग्रामपरिवर्तन दिनी केला जातो.

७. विद्यार्थ्यांचा गौरव: प्राथमिक व माध्यमिक शाळेतील जे विद्यार्थी विविध परिक्षेत सर्वाधिक गुण संपादन करून पास होतात, जे विद्यार्थी क्रिडा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती इ. विशेष क्षेत्रात नैपुण्य संपादन करतात त्यांचा ग्रामपरिवर्तन दिनी सत्कार केला जातो.

## १०. राळेगणसिध्दीतील सण व उत्सव:

१. एक गाव एक गणपती: संपूर्ण गावात एकच गणपती असतो. सर्व गावातील लोक सामुदायिकरित्या एकाच गणपतीची स्थापना करतात.

२. नवरात्र उत्सव: नवरात्र उत्सवात संपूर्ण गावकरी एकाच देवीची स्थापना करतात. नऊ दिवस संपूर्ण गावातील प्रत्येक समाजाची व्यक्ती त्या उत्सवात सहभागी होतात. तसेच पद्‌वामती देवी उत्सव पण गावात साजरा केला जातो.

३. यादवबाबा सप्ताह: गावामध्ये यादवबाबा सप्ताहामध्ये गावातील सर्व लहान थोर व्यक्ती सहभागी होतात. या उत्सवात गरीबांना कपडयाचे वाटप केले जाते. तसेच या सप्ताहात बाजूच्या गावातील भजनी मंडळी येवून भजन, किर्तनचे कार्यक्रम होतात.

४. नागपंचमी सणाच्या दिवशी गावातील सर्व महिला एकाच वारूळाला जाऊन पुजतात म्हणजेच गावातील चारही दिशांच्या स्त्रिया एकत्र येऊन एकाच ठिकाणी नागोबाला पुजतात.

५. वटपौर्णिमा: या सणाच्या दिवशी गावातील सर्व महिला एकत्र येऊन एकाच वडाच्या झाडाला पूजतात. त्यातून त्या गावातील महिलांची एकजूट दिसुन येते.

६. बैलपोळा: या गावात बैल पोळयास वेशीतून बैल फिरवण्याचा मान हा एका दलित कुटुंबातील व्यक्तीस दिलेला आहे. सध्याही ही प्रथा चालूच आहे. पोळयाचा सण हा मोठया थाटात साजरा केला जातो.

११. राळेगणसिध्दीमध्ये होणाऱ्या ग्रामविकासात आणि सांस्कृतिक, धार्मिक,कार्यात तरुणांचा सहभाग ९०.९१ टक्के राहिलेला दिसुन आला तर फक्त ०९.०९टक्के तरूण या कार्याला आपला वेळ देउन सहभागी होउ शकत नाही.

ग्रामविकास आणि इतर सार्वजनिक कामांमध्ये ग्रामस्वच्छता, श्रमदान, विविध शिबिरे, ग्रामसभा, उत्सव, सण यामध्ये गावातील सर्वच जाती, धर्माचे आणि स्त्री—पुरूष यांचा सहभाग हा अधिक प्रमाणात दिसुन येतो.फक्त काही मोजकेच लोक आपल्या वैयक्तीक कामामुळे या कार्यात सहभागी होऊ शकत नाही. नौकरी ,व्यवसाय,शिक्षण अशा कारणांमुळे ते सहभागी नाही होत परंतु गावातील वयस्कर आणि अनुभवी लोक तरुणांना मार्गदर्शन करुन स्वत:ही कार्यात सहभागी होतात.

१२. एकूण ११० ग्रामस्थांपैकी ३१.८१ टक्के लोकांकडे विहीरी आणि कॅनॉलद्वारे, २७.२७ टक्के लोकांकडे कॅनॉल आणि बंधाऱ्याद्वारे, १८.१८ टक्के लोकांकडे बंधारे आणि बोअरवेल द्वारे तर २२.७२ टक्के लोक हे पावसाच्या पाण्याद्वारे आपली शेतजमीन कसत असतात.

अशा प्रकारे अभ्यासातून दिसुन आले की, विहिरी, कॅनॉल, बंधारे आणि बोअरवेलच्या आधारे येथे शेतीसाठी पाण्याचा पूरवठा केला जातो. म्हणजेच ७२.२७ टक्के लोक हे वरील साधनांद्वारे पाणीपुरवठा करतात तर फक्त २२.७३ टक्के शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहेत. राळेगणसिध्दीत प्रामुख्याने कांदा, ज्वारी, मुग, डाळींब, मका हे पिके घेतली जातात.

## १३. पंचसुत्री कार्यक्रमाचे विश्लेषण:

१. एकूण ११० ग्रामस्थांपैकी ९५.९६ टक्के लोकांनी चऱ्हाईबंदी होते असे सांगितले तर ४.५४ टक्के लोकांनी चऱ्हाईबंदी होत नाही असे सांगितले आहे.

अशा प्रकारे अभ्यासातुन असे आढळून आले की, राळेगणसिध्दीमध्ये जनावरांना डोंगर, पठाराची जमिन, कुराणात चरण्याची बंदी घातलेली त्यातुन जनावरांना चाऱ्याची उपलब्धता होते. तेथे उगवलेला चारा लिलाव पध्दतीने विक्री केला जातो. ज्याला चाऱ्याची गरज आहे ती व्यक्ती तो चारा विकत घेतो. जवळपास ९५.९६ टक्के लोक म्हणतात की चारा बंदी केलेली आहे तर फक्त ४.५४ टक्के लोकांना वाटते की जनावरांना चराईसाठी बंदी नाही. चराईबंदीमुळे ग्रामपंचायतीस चाऱ्याच्या लिलावातुन उत्पन्न मिळते आणि ग्रामस्थांना उन्हाळयातही जनावरांना चारा उपलब्ध होतो. वर्षभर चाऱ्यासाठी शेतकरी हा बाजरी, नेपियर ग्रास इत्यादींची लागवड करतात.

२. गावातील एकूण ११० ग्रामस्थांची चाचणी मधुन असे दिसुन आले कुऱ्हाडबंदी आहे म्हणणारे १०५ म्हणजेच ९५.४६ टक्के आहेत आणि

कुऱ्हाडबंदी नाही म्हणणारे ०५ म्हणजेच ४.५४ टक्के ग्रामस्थांनी नाही असे सांगीतलेले आहे.

अशा प्रकारे गावात पूर्वी स्वयंपाकासाठी, घर चालवण्यासाठी दारूच्या व्यवसायासाठी खुप मोठया प्रमाणात झाडांची तोड होत असे आणि गावाची दशा भयान झाली होती पण गावातील कुऱ्हाडबंदी केल्यामुळे झाडांची तोड कमी झाली आणि झाडांचे महत्व जाणून लागवड मोठया प्रमाणात करण्यात आली त्यात ग्रामपंचायतने पुढाकार घेऊन लोकांच्या सहकार्याने आजचे राळेगणसिध्दी उदयास आलेले अभ्यासातून जाणवले. तसेच आरोग्य आणि लोकांचे जीवनमानही सुधारले आणि पर्यावरणाचा समतोल राखला जातो. हे राळेगणसिध्दीच्या कुऱ्हाडबंदीवरून अभ्यासातून जाणून आले. गावातील जवळपास सगळयाच कुटुंबाकडे गॅस कनेक्शन झालेले आहेत. गोबर गॅस आहेत त्यामुळे झाडांचा जाळण्यासाठी वापर कमी झाला आहे. तसेच तेथील काही ग्रामस्थांना अजुनही आधुनिक सुविधा न मिळाल्याने त्यांना लाकडा शिवाय पर्याय नाही त्यामुळे त्यांचे असे म्हणणे आहे की गावात कुऱ्हाडबंदी पूर्णपणे नाही असे अभ्यासावरून दिसून आले.

३. एकूण ११० ग्रामस्थांपैकी पूर्वी पेक्षा आता नसबंदीवर भर दिला जातो त्यामध्ये नसबंदी करण्यात स्त्रीयांचे प्रमाण ८७ म्हणजे ७९.०९ टक्के आहे आणि नसबंदी करण्यात पुरूषाचे तुलनेने प्रमाण केवळ २३ म्हणजे २०.९० टक्के आहे असे अभ्यासातून समजले. त्यामुळे गावातील लोकसंख्या वाढीवर एक प्रकारचे नियंत्रण दिसुन आले.

अशा प्रकारे नसबंदीमुळे कुटुंबामध्ये एक प्रकारचे स्थैर्य दिसुन आले आणि लहान कुटुंब सुखी कुटुंब या उक्ती प्रमाणेच गावात लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आलेले दिसुन आले. तसेच कुटुंबही सुखी जीवन जगताना दिसुन आली यामुळे ग्रामस्थांची जीवनशैली मध्ये सुधारणा झालेली दिसुन आली.

गावात ११० एकूण ग्रामस्थांच्या प्रतिसादावरुन  असे समजले की, व्यसन न करणारे ग्रामस्थांची संख्या ही ९४ म्हणजे ८५.४५ टक्के इतकी आहे आणि तुलनेत व्यसन करणारे लोक हे १६ म्हणजे १४.५५ टक्के एवढे प्रमाण आढळुन आले.

४. अशा प्रकारे राळेगणशिंदी मधून अण्णांच्या मागदर्शनानुसार आजचे राळेगणसिध्दीमध्ये झालेले रूपांतर आणि तेथे असलेली व्यसनमुक्ती ही पुर्णपणे बंद नसुन कांही प्रमाणात आढळून आली आणि त्या व्यसनाची साधने गावात नसुन इतर गावातून आणून केले जातात किंवा गावाबाहेरून करून गावात येतात पण त्याची जाण अणांना होऊ देत नाहीत पण त्याचे प्रमाण कमी आहे. जर अण्णांना ही गोष्ट लक्षात आलीच तर अण्णा आता त्या व्यक्तीला पोलीसांच्या स्वाधीन करतात, गावात पान, तंबाखु, सिगारेट, विडी, गुटखा, दारू इ. व्यसनाचे प्रमाण होत आहे हे अभ्यासातून दिसून आले आहे आणि त्याचे कारण असे समजले की, गावातील काही तरूणवर्ग हा सैन्यामध्ये असल्यामुळे त्यांना बंधनकारक नाही त्यामुळेच गावातील इतर तरूणांनाही त्यांच्या सोबत छुप्या पध्दतीने व्यसन करण्यास संधी सहजच मिळत जाते पण हा सर्व प्रकार अण्णापासून लपवून केला जातो. असे निरीक्षणातून निष्पन्न झाले.

५. एकूण ११० ग्रामस्थांपैकी ९०.९१ टक्के ग्रामस्थ हे श्रमदानात सहभागी होतात तर ०९.०९ टक्के ग्रामस्थांना कामाच्या निमित्ताने श्रमदानात सहभागी होता येत नाही.

श्रमदानात सहभागी होऊन सार्वजनिक कार्य पार पाडली जातात. जवळपास सर्वाधिक लोक (९०.९१ टक्के) हे श्रमदानात सहभागी होतात तर फक्त (९.०९ टक्के) लोक फक्त श्रमदानात सहभागी होत नाही. जे लोक प्रत्यक्ष सहभागी नसतात ते आपल्या ऐवजी एखादया व्यक्तीस वेतन देऊन त्या ठिकाणी कामास पाठवतात.

## १४. राळेगणसिध्दीतील आरोग्य विषयक माहिती:

१. गावात सर्दी, ताप, खोकला इ. आजार होण्याच्या ग्रामस्थांची संख्या ८८ म्हणजे ८० टक्के आहे आणि जुलाब, उलटया होणाऱ्या आजारांची संख्या १८ म्हणजेच १६.३६ टक्के आहे तसेच कावीळ आजार होणाऱ्यांची संख्या ०४ म्हणजे ३.६३ टक्के आहे हे एकूण ११० ग्रामस्थांच्या प्रतिसादातुन असे दिसुन आले.

अशा प्रकारे गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे पण संपूर्ण गावाची लोकसंख्येच्या प्रमाणात ते अपुरे आहे. आणि गावातील एकूण हवामान चांगले असल्यामुळे तसे मोठया आजाराचे प्रमाण किरकोळ आहे. साधारणत: सर्दी, ताप, खोकला इ. आजार येणारे ग्रामस्थांची संख्या इतर आजाराच्या तुलनेत जास्त आहे. तसेच जुलाब व उलटया कावीळ आजारांची संख्या कमीच आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठया आजारासाठी तालुक्यास पाठविले जाते.

२. राळेगणसिध्दी या गावात प्राथमिक आरोग्य केंद्रावर मिळणाऱ्या सुविधांबाबत ९५.४५ टक्के ग्रामस्थांनी समाधानी आहेत असे सांगितले तर फक्त ५.५५ टक्के ग्रामस्थांनी असमाधानी आहेत असे सांगितले.

अशा प्रकारे दिसुन आलेल्या माहितीवरून असे म्हणता येईल की, राळेगणसिध्दी या गावातील लोकांना छोटया छोटया आजारावर औषध मिळते परंतु डेंग्यू, मलेरीया यासारख्या आजारांवर तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते.

गावामध्ये वेळेवर स्वच्छता असल्यानेही गावात इतर आजारांचे प्रमाण कमी दिसुन येते. झाकलेले गटारे, वेळेवर औषध फवारणी यामुळेही आजार कमी दिसतात.

## ५.४ उपाययोजना:

१. अण्णांनी राळेगणसिध्दीचे राजकारण नियंत्रित राहण्यासाठी वैयक्तिक पातळीवर लक्ष दयावे.

२. सर्व समाजातील लोकांपर्यत शासकिय योजना पोहचत नाहीत त्यामुळे माजातील कांही लोकांचा विकास अर्धवट होतो त्या गोष्टी टाळण्यासाठी अण्णांनी लक्ष दयावे.

३. गावातील प्रवाशांसाठी बसस्थानकाची गरज आहे.

४. गावात महाविद्यालयीन व तांत्रिक शिक्षणाची सुविधा करण्यात यावी.

५. गाावपातळीवर आरोग्याची तात्काळ सुविधेसाठी रुग्णवाहिकेची गरज आहे व तज्ञ खाजगी डॉक्टरांची सुविधा करणे गरजेचे आहे.

६. कॅनॉलच्या पाण्याचे वाटप सर्व शेतकऱ्यांना सारखा व्हावा त्यासाठी सरकारने वैयक्तिक लक्ष दिले पाहीजे.

७. शेतकऱ्यांसाठी शेततळयाची आवश्यकता आहे.

८. कुटंब नियोजनामध्ये पुरुषांचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे.

९. स्त्रीयांनी जास्तीत जास्त ग्रामसभेमध्ये हजर रहावे.

## ५.५ नवीन संशोधनाची दिशा:

सदर अध्ययनात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधकांना संशोधनासाठी भरपूर वाव आहे.

१. अण्णांनी केलेल्या देशपातळीवरील कार्याचा अभ्यास करणे.

२. राळेगणसिध्दी व हिवरे बाजारच्या ग्रामीण विकासाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. अण्णांच्या दृष्टीकोनातून देशाची राजकिय व्यवस्था कशी चालावी, असावी याचाही अभ्यास करता येईल.

४. ग्रामीण विकासासाठीचे व्यवस्थापन आणि नियोजन इतर समाज सुधारक व अण्णा हजारेंनी केलेली कार्यें यांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

५. राळेगणसिध्दी मध्ये महिला ग्रामसभा भरविण्यावर भर देणे आवश्यक.

# संदर्भसूची:


- Ancor desmond, rural development problem & strategics, international lembar, review 1973 p.n.108.
- Hoshiyar singh: administration of rural development in India, sterling publication p.ltd. New Delhi, 1975, p.n.6.
- अवस्थी ए पी विकास प्रकाशन, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा २००७
- अस्पी एच.डायरेक्टर मास कम्युनिकेशन ए बेसिस स्टडी, पवार आर.एस. एवं श्रीकांत शर्मा, समन्वित ग्रामिणविकास एवं प्रादेशिक नियोजन,डिस्कव्हरी हॉऊस,नवी दिल्ली २००७,पृ.क्र.१२८.
- कुऱ्हाडे, पांगारे, लोकुर , आदर्शगाव संकंल्प आणि प्रकल्प,जनतेच्या कार्यात शासनाचा सहभाग, प्रकाशन, पुणे हिंद स्वराज्य ट्रस्ट (१९९६).
- कटारीया सुरेद्र, वैद्य गुज्जन: भारत में ग्रामीण विकास: रणनितीया वं चुनौतियॉ, मलिक ॲन्ड कंपनी, जयपूर, दिल्ली, २००८, पृ.क्र.१७१ते १७९.
- कुलकर्णी एस.के., कुप्पास्वामी सोशल चेंज इन इंडिया विकास नवी दिल्ली १९८२ पृ.क्र. ५१ केसरी ४ सप्टेंबर १९९२ देशाच्या विकास नकाशात राळेगणसिध्दी.
- खोरे अरूण, (ऑक्टोबर २०१०) ‘‘लोकराज्य: गांधीजींचे तत्वज्ञान कधी नव्हे इतके आज प्रस्तुत’’ मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.
- गांधी एम. के. हरिजन, ग्रामस्वराज्य का त्रिवीध स्वरुप राधा पब्लीकेशन, दिल्ली, २००६, पृ.क्र. ११
- ग्रामसभा (२००८) ‘‘ग्रामसभा: अधिकार व माहिती’’
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर, सन२००८.
- झगडे रामचंद्र शंकरराव, मृदगंध, पाणलोट क्षेत्र विकासातून समृध्दीकडे, आवृत्ती (२०१४) लेखप्रकाशन, हिंद स्वराज्य ट्रस्ट राळेगणसिध्दी.

- त्रिपाठी रेणु: ग्रामीण विकास और निर्धनता उन्मुलन ओमेगा पब्लिकेशन, दिल्ली २००८ पृ.क्र. ६१—६९
- तुळपूळे बगाराम, २००५, विकास, वाटचाल आणि समस्या, प्रकाशक— समता दर्शन प्रतिष्ठान, सोलापूर
- महाजन अतुले, प्रा. झाडोकर अजय, प्रा. झोपे किशोर, २००४, समता, सामाजिक न्याय आणि लिंगभेद, प्रकाशन—यशदा, पुणे. धारुर वि.ल. दुरदर्शन आणि लोक संस्कृती पृ.क्र.१०९.
- थिओ अलेक्स, सोशिऑलॉजी हार्पररो अन्ड इन्ट्रोडक्शन, न्युयॉर्क १९८९ पृ.क्र ३१५.
- सटाले सिध्देश्वर नामदेव यांनी ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ’’ अंतर्गत राज्यशास्त्र विभागात सप्टेंबर २०१२.
- संध्या नरे, आपला महानगर, कर्मयोगी ०७/०९/१९९०.
- सप्तरंग, दै. सकाळ,२६.१०.०८.
- सुदाम सखाराम, यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अंतर्गत राज्यशास्त्र विभागात सन २००८.
- सोनवणे माणिक फेब्रुवारी २०१३. Anna Hazre- A New Gandhi .
- हजारे अण्णा, माझे गाव माझे तीर्थ पृ.क्र.९०—९३.
- हजारे अण्णा, राळेगणसिध्दीचा कर्मयोगी, आवृत्ती (२००३).
- प्रधान ग.प्र. सकाळ २३ ऑगस्ट १९९८ अण्णा हजारे ‘‘आदर्श ग्रामविकासाची दिशा’’.
- नेहुलकर रामदास, रविवार केसरी २७—४—२०११ राळेगणसिध्दतील फकीर.
- बोठे, बाळ ज सकाळ २१ ऑगस्ट २००९ सुराज्याची लढाई लढणारा महात्मा’’.
- भावे विनोबा गाव सुखी हम सुखी सर्व सेवा संघ, वाराणसी, १९६६ पृ. क्र९.

➢ पठाडे संजय, स्वातंत्र्याची दुसरी लढाई आवृत्ती (२०११), प्रकाशन, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन (न्यास), राळेगणसिध्दी.

➢ पांडुळे अमृत, 'राळेगणसिध्दी येथील नापासांच्या शाळेत दैनदिन कामकाजात शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास', एम.एड पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर अप्रकाशित प्रबंध २००८

➢ पारधे शर्मिला भाऊसाहेब यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिक्षणशास्त्र आणि विस्तार या विभागात जानेवारी २०११

➢ भालेराव शाम, वाट हि संघर्षाची, आवृत्ती (२००७) प्रकाशन, सिग्नेट पब्लिकेशन्स पुणे.

➢ मेश्राम लेखचंद उध्दव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, अंतर्गत राज्यशास्त्र विभागात जानेवारी २००८

➢ यादव रामजी, भारता मे ग्रामीण विकास, अर्जुन प. हाउस.२००८, नवी दिल्ली, पृ.क्र. १९०

➢ रावते प्रभाकर, मार्च १९९०, ग्रामीण विकास: समस्या व उपाय, प्रकाशक—सौ. प्रेमा कुंमार, लातूर.

➢ रविवार सकाळ १ ऑगस्ट १९९९:

➢ लोकराज्य (ऑक्टोबर २०१०) महात्मा गांधी प्रणीत पंचायतराज मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

➢ वाघ बाळासाहेब, ग्रामविकासाची पाऊलवाट राळेगणसिध्दी आवृत्ती (२००९) प्रकाशक, मिडिया सेंटर राळेगणसिध्दी.

➢ वाघ बाळासाहेब, ग्रामिणविकासाची पाऊलवाट, राळेगणसिध्दी, प्रकाशक: मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी, पृ.क्र.१७—२२.

➢ वारघडे सुरेशचंद्र राळेगणसिध्दी: ग्रामविकासाची पाऊलवाट आवृत्ती (२००९), प्रकाशन, राळेगणसिध्दी परिवार.

➢ वारखडे सुरेशचंन्द्र, प्रकाशन कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे.

- शर्मा सिमा रमा कवर, नि.राठोड, भारतीय ग्रामीण स्थानिय प्रशासन, पंचशील प्रकाशन, जयपुर, २००८ पृ.क्र. १६९
- शौरी अरूण, महानगर०३/०१/१९९७''अण्णा हजारे: सचोटीचं मूर्तिमंत प्रतिक''

**Web bibliography:**

- http:/en.wikipedia.org/wiki/parnertaluka#prominent personalities
- http://www.annahazare.org
- www.google.com

# परिशिष्टे

## संमती अर्ज

**‘‘राज्यशास्त्र एम.फिल् पदवीसाठी शोध प्रबंध,प्रश्नावली संशोधन विषय ‘‘मा. अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान विशेष संदर्भः राळेगणसिध्दी’’ ता. पारनेर जि. अमदनगर.**

| मार्गदर्शक | संशोधक |
| --- | --- |
| डॉ. माणिक सोनावणे | आचमारे जितेंद्र प्र. |

सर्वेक्षण प्रश्नावली
संशोधन केंद्रः राज्यशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सदाशिव पेठ, पुणे

**शैक्षणिक वर्ष २०१३—२०१५**

प्रति,

मी माझे एम.फील्चे संशोधन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे शीर्षक ‘‘मा. अण्णा हजारे यांचे ग्रामविकासातील योगदान विशेष संदर्भ राळेगणसिध्दी’’ या विषयावर अभ्यास करत असून त्या दृष्टीने आपणां सर्वांकडून काही माहिती हवी आहे. या गावातील आपले अनूभव माझ्या शैक्षणिक संशोधनाच्या दृष्टीने बहुमुल्य ठरेल. तरी कृपया सोबतच्या प्रश्नावलीच्या आधारे आपण आपल्या प्रतिक्रिया प्रश्नांच्या आधारे सांगव्यात. आपण सांगितलेली माहिती ही गोपनीय राहील. तिचा कुठेही उल्लेख केला जाणार नाही.

# प्रश्नावली

संपूर्ण नावः————————————————————————————————

वय :———————— शिक्षणः——————————————लिंगः————————

गाव :———————— व्यवसायः————————————————————————

कुटुंबातील व्यक्तीची संख्याः——— पुरूष ☐ स्त्री ☐

धर्मः—————————————जातः———————————

१) गावाच्या ग्रामविकासात झालेल्या बदलाशी तूम्ही सहमत आहात का?

१) होय ☐ २) नाही ☐ ३) उत्तर दिले नाही ☐

कारणेः————————————————————————————————————————

२) गावात महिन्यातुन कीती वेळा ग्रामसभा भरवली जाते?

१) प्रत्येक महिन्याला होते २) ३ ते ६ महिनामध्ये एकदा होते

३) दोन महिन्यातुन एकदा होते.

२.१) ग्रामसभेत किती जण उपस्थित राहतात?

१) १०० टक्के ☐ २) ७५ टक्के ☐ ३) ५० टक्के ☐

४) २५ टक्के ☐ ५) ० टक्के ☐

२.२) प्रत्येक ग्रामसभेत अण्णा उपस्थित असतात का?

१) होय ☐ २) नाही ☐

२.३) ग्रामसभा भरली जाते तेंव्हा कोणकोणत्या विषयावर चर्चा केली जाते?

१) ग्रामसुधारणा ☐ २) शासकीय योजना ☐

३) लोकशिक्षण ☐ ४) कुटूंबनियोजन ☐

५) इतर ☐

२.४) ग्रामसभेमध्ये निर्णय घेतांना तुमचे मत विचारात घेतले जाते का?

होय ☐ नाही ☐

३) ग्रामविकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विकास कार्यात तुमचा सहभाग असतो का?

होय ☐ नाही ☐

अनूभव सांगा:———————————————————————————————

————————————————————————————————————

४) ग्रामपरिवर्तन दिन साजरा केला जातो का? केव्हा केला जातो.

१) २ ऑक्टोबर म. गांधी जयंती ☐

२) १ मे महाराष्ट्र दिन ☐ ३) २६ जानेवारी ☐

४) १५ ऑगस्ट ☐

या दिवशी कोणते कार्यक्रम घेतले जातात? त्याचा अनुभव सांगा.

——————————————————————————————————————————

५) गावात सण, समारंभ, सार्वजनिक उत्सव एकत्रिपणे साजरे केले जातात का?

होय ☐ नाही ☐

६) शेजारील गावे व राळेगणसिध्दीमधील वेगळेपण जाणवते का? तुमचा अनूभव.

————————————————————————————————————

————————————————————————————————————

६.१) गावातील सार्वजनिक शेतीमध्ये एकत्रितपणे श्रमदान केले जाते का?

होय ☐ नाही ☐ इतर ☐

७) श्रमदानाच्या कार्यक्रमात तुम्ही सहभाग घेता का?

होय ☐ नाही ☐ इतर ☐

कोणत्या स्वरूपाच्या कामात सहभागी होतात?

————————————————————————————————————

८) शेतीसाठी पाण्यांची साधने कोणती?

१) विहिरी ☐ २) कैनाल ☐ ३) बंधारे ☐

४) बोरवेल ☐ ५) इतर ☐

९) पंचसुत्री व्यवस्थेवरील माहिति

९.१ गावात चऱ्हाईबंदी लागू केली आहे ती सर्वांसाठी सारखीच आहे का? काहींना सुट दिली जाते का?

होय ☐ नाही ☐

जनावरांना चाऱ्याची उपलब्धता कोणती?

________________________________________________

९.२) कुऱ्हाडबंदी केल्यामूळे राहनीमानात काय बदल झाला आहे का?

________________________________________________

९.३) गावामध्ये कुटुंबनियोजन करतांना कुणास प्राधान्य दिले जाते? तुमच्या घरी कोणाचे केले आहे?

१) स्त्री ☐ २) पुरूष ☐

९.४) तुमच्या कुटुंबात व्यसनाची सवय होती का? सध्या आहे का?

१) स्त्री ☐ २) पुरूष ☐ ३) इतर ☐

९.५) गावात नशा केल्यावर गावकरी काय कार्यवाही करतात?

१) पूर्वी २) सध्या ३) तुमच्या घरी केले जाते का?

**राळेगणसिध्दीमध्ये विविध शासकीय विभागातील तसेच सरपंच, उपसरपंच यांच्यासाठी प्रश्नावली:**

१०) गावात कोणत्या प्रकारचे आजार जास्त प्रमाणात आढळतात?

१०.१) आजारांची नावे:________________________________________

१०.२) उपाय कोणते:__________________________________________

१०.३) ग्रामस्थाचे आरोग्य व्यसनमुक्त राहण्यात तुमचे योगदान काय?

________________________________________________

१०.४) गावात कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम राबवल्यास तुमचे योगदान काय?

________________________________________________

१०.५) याची पडताळणी कशी केली जाते?

________________________________________________

१०.६) ग्रामस्थांना आरोग्य केंद्रातून मोफत औषधे दिली जातात का?

होय ☐ नाही ☐ इतर ☐

११) गावात विविध शासकीय योजना राबवण्यात तुमचे योगदान काय?

____________________________________________

११.१) ग्रामस्थांना कोणकोणत्या पध्दतीने कर लादला जातो व तो कसा गोळा केला जातो?

____________________________________________

११.२) ग्रामस्थांना शेतीसाठी इतर क्षेत्रासाठी कर्ज उपलब्ध करून देता का?

____________________________________________

११.३) शासनाच्या विविध योजना गावात राबविण्यासाठी कधी अडचणी येतात का?

होय ☐ नाही ☐ इतर ☐

येत असल्यास त्याचे स्वरूप कोणत्या प्रकारच्या?

____________________________________________

११.४) अण्णांनी केलेल्या जलसंधारण विषयक कार्याशी तूमचे मत काय?

____________________________________________

११.५) गावात पाण्याची सुविधा पुरेशी आहे का? व त्यावरील उपाययोजना?

____________________________________________

११.६) पाणलोट क्षेत्राचा विकाय योजनेअंतर्गत गावकऱ्यांना काही लाभ दिले आहेत का?

____________________________________________

११.७) ग्रामविकासात पाणलोट क्षेत्रामुळे आलेले तोटे व फायदे काय?

____________________________________________

११.८) पाणलोट क्षेत्राच्या नियोजनामुळे गावाच्या विकासात काही भर पडली आहे का?

____________________________________________

१२) ग्रामविकास योजना राबविताना गावातील तरूणांचे सहकार्य घेतले जाते का?

होय ☐ नाही ☐ इतर ☐

१३) अण्णांच्या अनुपस्थितीत त्यांची भूमिका कोण निभावतो?

__________________________________________

१४) ग्रामस्थांना धान्य बॅकेचे लाभ कोणी व किमी प्रमाणात आहेत?

__________________________________________

१४.१) गावातील सण व उत्सव आण्णा साजरे करतात त्यात तुमचे योगदान काय?

__________________________________________

१५) ग्रामविकासात महिलांच्या सहभागाबाबत तुमचे मत काय?

__________________________________________

१६) ग्रामविकासातंर्गत नवीन प्रकल्प चालू किंवा येणार आहेत का? व कोणते?

__________________________________________

**सन २००१—२००२ ते सन २०११—२०१२ अखेर झालेल्या अण्णांच्या काळातील विकास कामांची माहिती ग्रामपंचायत राळेगणसिध्दी, ता. पारनेर,जि.अहमदनगर.**

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | वर्ष | कामाची स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | इंदिरा आवास घरकुले — ६ | इंदिरा आवास योजना | २००१—२००२ | पुर्ण |
| २ | सामाजिक सभागृह | स्थानिक निवास निधी | २००२—२००३ | पुर्ण |
| ३ | अंगणवाडी | जागतिक बॅंक प्रकल्प | २००२—२००३ | पुर्ण |
| ४ | पाण्याची टाकी (मा.व.) | जवाहर रो. योजना | २००२—२००३ | पुर्ण |
| ५ | शॉपिंग सेंटर गाळे—१० | मुलभूत सुविधा | २००३—२००४ | पुर्ण |
| ६ | शौचालय (मा.व.) ६ | स.ग्रा.रो.योजना | २००३—२००४ | पुर्ण |
| ७ | नळ पाणीपुरवठा योजना | स्वजल धारा | २००४—२००५ | पुर्ण |
| ८ | पशुवैद्यकिय दवाखाना | स.ग्रा.रो.योजना | २००४—२००५ | पुर्ण |
| ९ | शौचालय (मा.व.३, जनरल ३) | | २००४—२००५ | पुर्ण |
| १० | घरकुल | स.ग्रा.रो.योजना स्त्रोत | २००४—२००५ | पुर्ण |
| ११ | ग्रामपंचायत कार्यालय | जि.ग्रा.वि.निधी | २००५—२००६ | पुर्ण |
| १२ | घरकुले ३ | इंदिरा आवास योजना | २००६—२००७ | पुर्ण |
| १३ | नळ पाणीपुरवठा दुरुस्ती | १२ वा वित्त आयोग | २००६—२००७ | पुर्ण |
| १४ | अंतर्गत रस्ते | १२ वा वित आयोग | २००६—२००७ | पुर्ण |
| १५ | परिसर स्वच्छ व देखभाल | १२ वा वित आयोग | २००७—२००८ | पुर्ण |
| १६ | घरकुले ५ | इंदिरा आवास योजना | २००७—२००८ | पुर्ण |
| १७ | नळपाणीपुरवठा योजना | भारत निर्माण योजना | २००८—२००९ | पुर्ण |
| १८ | ऑफिस देखभाल दुरुस्ती | १२ वित्त आयोग | २००८—२००९ | पुर्ण |
| १९ | सामाजिक सभागृह | स्था.वि.निधी | २००८—२००९ | पुर्ण |
| २० | कॉंक्रेट रोड व पाण्याची टाकी | द.व सु.योजना | २००८—२००९ | पुर्ण |
| २१ | पद्मावती मंदिर सभा मंडप | स्था.वि.निधी | २००८—२००९ | पुर्ण |
| २२ | सामाजिक सभागृह | स्था.वि.निधी | २००८—२००९ | पुर्ण |
| २३ | पद्मावती मंदिर परिसर संरक्षण भिंत बांधणे | यशवंत ग्रामसमृध्दी योजना | २००८—२००९ | पुर्ण |
| २४ | पद्मावती मंदिर परिसर संरक्षण भिंत बांधणे | तिर्थ क्षेत्र विकास | २००८—२००९ | पुर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | घरकुले—५ | इंदिरा आवास योजना | २००९—२०१० | पुर्ण |
| २६ | पद्मावती मंदिर परिसर स्वच्छता गृह | उर्वरित वैधानिक विकास महामंडळ | २०१०—२०११ | पुर्ण |
| २७ | रस्ता कॉंक्रीटीकरण सुतार—भालेकर गल्ली | २५१५ | २०११—१२ | पुर्ण |
| २८ | रस्ता कॉंक्रीटीकरण भैरवनाथ गल्ली | खासदार निधी | २०११—१२ | पुर्ण |
| २९ | गावठाण अंगणवाडी | जिल्हा नियोजन | २०११—१२ | पुर्ण |
| ३० | सार्वजनिक शौचालय | द.व. सुधार योजना | २०१४—१५ | पुर्ण |

**संदर्भ—** ग्रामपंचायत राळेगणसिध्दी.

## मा. अण्णा हजारे यांच्या राळेगणसिध्दीतील ग्रामविकास:

मा. अण्णा हजारे यांच्या कडून झालेल्या राळेगणसिध्दीचा विकास पुढील प्रमाणे आहे,

अ) विकासाचे पहिले पाऊल (काल आणि आज)

| १९७५ पूर्वी आणि १९७५ नंतरची स्थिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सामाजिक कार्य उपक्रम | वर्णनात्मक माहिती | | राबवलेल्या उपक्रमाचे स्वरूप | दिसून आलेले फरक |
| | | १९७५ पूर्वीची स्थिती | १९७५ नंतरची स्थिती | | |
| अ | व्यसनमुक्ती | • दारूडे गाव म्हणून गावची ओळख<br>• ३५ ते ४० दारू भट्टया<br>• दारू पिणाऱ्यांचे वाढते व्यसन, बाहेरगावच्या व्यसनी लोकांचा वाढलेला वावर.<br>• त्यातून वादविवाद, भांडण, तंटे. | • गावातील व्यसनाधीन लोकांना व्यसन मुक्तीसाठी प्रबोधन<br>• दारूचे दुष्परिणाम सांगणे<br>• परिवाराच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम<br>• दारूभट्टयांचे उच्चाटन<br>• बाहेरच्या व्यसनी | • व्यसनमुक्तीचे महत्व पटवून दिले.<br>• ग्रामप्रबोधन—लोकजागृती केली.<br>• ग्रामसभेत एकमताने निर्णय<br>• हातभट्टया उध्वस्त केल्या.<br>• दारू पिणाऱ्याला प्रथम समजावून सांगितले, नंतर मंदिरात शपथ दिली, तरीही नाही ऐकेले तेव्हा मंदिरा समोरिल खांबाला दिवसभर बांधून ठेवले.<br>• गावातील मंदिराचे काम सुरू | • व्यसनाचे दुष्परिणाम समजले.<br>• ग्रामसभेतील निर्णय सर्वांनी स्विकारला.<br>• दारू पिणाऱ्याला मंदिरासमोरील खांबाला बांधल्यामुळे दारूडयांच्या मनात भिती निर्माण झाली.<br>• त्यामुळे परिणामी संपूर्ण गांव व्यसनमुक्त<br>• सर्व प्रकारे गाव व्यसनमुक्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | लोकांना गावात येण्याला बंदी. | केल्याने हात भट्टया चालविणाऱ्या ग्रामस्थांना रोजगार मिळाला, काम मिळाले.<br>सिगारेट, बिडी, तंबाखू यांची होळी केली. | |
| ब. | जलसंधारण | • अवर्षणग्रस्त गाव<br>• ४०० ते ५०० मि.ली. पाऊस कमी.<br>• उन्हाळयात पाणी टंचाई पाण्याचा अभाव, परिस्थिती भयानक | • गावच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी जलसंधारण विकास कार्यक्रम श्रमदानाच्या माध्यमातून सुरू केला.<br>• पाण्याचा योग्य | • ग्रामसभेतील निर्णय<br>• श्रमदानाच्या माध्यमातून डोंगरावर 'माथा ते पायथा हा प्रकल्प पाणी आडवा व पाणी जिरवा हि योजना राबवून जलशोषक चर खोदण्यात आले.<br>• ग्रामस्थांच्या सहकार्याने पाझर तलावाची दुरूस्ती. | • पाणी जमिनीत जिरून भुजल पातळी वाढण्यास मदत आली.<br>• विहिरी पाण्याने भरून वाहू लागल्या.<br>• खरिपाच्या पिकाबरोबर रब्बी हंगामाची पिके ग्रामस्थ घेऊ लागले.<br>• नगदी पिकांचेही उत्पादन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वापर व उपलब्ध पाण्याचे नियोजन. | • पुर्व पश्चिम वाहणाऱ्या दोन ओढयांवर श्रमदानांच्या माध्यमातून नालाबांध, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, सामुदायिक विहिरी बांधल्या.<br>• ओढयाचे खोलीकरण, रूंदीकरण केले. | गावातील १५०० एकर पर्यंत बागायत क्षेत्र पोहचले. (१९७५ पूर्वी ७० ते ८० एकर होत)<br>• पंचसुत्रीचा अवलंब ग्रामस्थ योग्यरित्या करू लागले.<br>• ग्रामस्थांचे दरडोई उत्पन्न २००० रू. च्या वर आहे. |
| क. | हरितक्रांती व धवलक्रांती | • गावात वृक्षांची संख्या कमी<br>• मोजक्याच लोकांकडे गायी, म्हशी<br>• दुधाचे उत्पन्न कमी | • वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले.<br>• शेतीला जोडधंदा दुग्धव्यवसाय, गावात एकूण ३७५ देशी व संकरीत गायी | • जमिनीची धूप थांबविण्यासाठी वृक्षारोपण.<br>• कुरणविकास साधण्यासाठी चऱ्हाईबंदी.<br>• वृक्षाचे महत्व समजल्याने कुऱ्हाडबंदी.<br>• श्रमदान, नसबंदी, नशांबदी, | • गावातून दुध संकलन केंद्राच्या माध्यमातून ३०० लिटर दुध बाहेर जाते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | • दरडोई उत्पन्न २०० ते २२५ रूपये. | असून २२ म्हशी आहेत. दुग्धव्यवसायात महिला व तरूणांचा जास्त सहभाग. | चऱ्हाईबंदी, कुऱ्हाडबंदी हि विविध विकास प्रकल्पातून पंचसुत्री तयार केली. | |
| ड. | आरोग्य व कुटुंब नियोजन | • गरीब कुटुबांत ८ ते १० मुले<br>• कुटुंब नियोजन नाही<br>• अस्वच्छता जास्त | • प्रत्येक कुटुंबाची पाहणी करून लोकजागृती, लोकशिक्षण केले<br>• शाळेमार्फत मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावल्या.<br>• ग्रामसफाईला महत्व दिले. | • ग्रामसभेतील निर्णय<br>• लोकशिक्षण, लोकजागृतीचा प्रयत्न.<br>• प्रत्येक कुटुंबाची पाहणी केली.<br>• शाळेमार्फत चांगल्या सवयी लावल्या.<br>• कुटुंबनियोजनासाठी ग्रामसभेतील निर्णया नुसार कुटुंबनियोजन व शासकीय योजना यांची सांगड घालून | • लहान मुलांना स्वच्छतेच्या सवयी लागल्या. ग्रामसभेतील निर्णयानुसार कुटुंब नियोजनासाठी ग्रामस्थांचा पुढाकार.<br>• परिणामी आज एकाच मुलावर किंवा मुलीवर कुटुंब नियोजन करणारे युवक आहेत. |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रामस्थांना नसबंदी करायला प्रवृत्त केले. (३ ते ४ मुले असणाऱ्यांना) | |
| इ | महिला सबलीकरण | • स्त्रीयांनी चूल आणि मूल सांभाळावे.<br>• विचार, मत, स्वातंत्र्य प्राधान्य नाही.<br>• शिक्षण नाही | • अबलांना सबला करण्यासाठी प्रबोधन.<br>• विचारांना, मतांना प्राधान्य दिले.<br>• शिक्षणाची संधी दिली.<br>• आर्थिक व्यवहार समजावे, करता यावे यासाठी प्रयत्न व प्रबोधन | • राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी यांचे उदाहरणे देऊन गावातील स्त्रीयांचे सबलीकरण प्रबोधन करण्याचे प्रयत्न.<br>• ग्रामसभेत महिलांना विचार मांडण्याची संधी दिली गेली.<br>• ग्रामसभेतील निर्णयांनुसार महिलांवर जबाबदारी सोपविण्याचा एकमताने निर्णय त्यांच्या आत्मविश्वासाची जागृती. | • महिलांचा समाजिक कार्यात सहभाग.<br>• ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी महिला.<br>• १९८९—९० ला राज्यातील पहिली सदस्यांची ग्रामपंचायत शांताबाई मापारींच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आली.<br>• त्यानंतर इंदूबाई भालेकर सरपंचपदी.<br>• बचतगटाच्या निमित्याने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | • बचतगटांची स्थापना.<br>• मशिनकाम, भरतकाम, यासारख्या सुविधा निर्माण करून महिलांना सबल करण्याचा प्रयत्न. | विचारांचे आदानप्रदान महिला करू लागल्या. |
| ई | धान्य बॅक | • ६५ टक्के लोक बाहेरचे धान्य आणत.<br>• १५ टक्के लोक अर्धपोटी रहात.<br>• फक्त २० टक्के लोकांकडेच वर्षभर पुरेल ऐवढे धान्य. | • गावातील गरजू ग्रामस्थांसाठी गावात धान्य बॅकेची निर्मिती.<br>• ग्रामसभेतील निर्णय | • ग्रामसभेतील निर्णय.<br>• गरजू लोकांसाठी धान्यबॅकेतून धान्य पुरवठा.<br>• धान्य वितरणाची पध्दती<br>• १ क्विंटल धान्य घेतले तर पुढच्या वर्षी ५ पायल्या (२५ किलो) धान्य वाढवून परत करायचे.<br>• ज्यांच्याकडे जास्त धान्य पिकले त्यांनी स्वच्छेने मंदिरात | • गरजू कुटुंबाना धान्य बॅकेतून धान्य मिळते.<br>• गावातील गरजू लोकांचाही विचार केला जाऊ लागला.<br>• धान्य गंगाजळीत वाढ. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | धान्य जमा करायचे. | |
| फ | ग्रामसभा | • ग्रामसभा होत नव्हती.<br>• लोकांचा सहभाग नव्हता. | • गावच्या सर्वांगिण विकासात सर्व ग्रामस्थांचा सहभाग | • गावाच्या सर्वांगिण विकासाबाबत ग्रामसभेत चर्चा, निर्णय त्यातून गावचा विकास घडत गेला. श्रमदानाचे कामे केली गेली.<br>• दर महिन्याला ग्रामसभा होते.<br>• ग्रामसभेला ग्रामस्थांची १०० टक्के उपस्थिती. | • ग्रामसुधारणा, ग्रामविकास, लोकशिक्षण यातून गावाचा सर्वांगिण विकास साधला गेला.<br>• सर्वानुमते निर्णय<br>• गावच्या विकास कामात ग्रामस्थांचा १०० टक्के सहभाग. |
| ग. | ग्राम परिवर्तन दिन | | • महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधन गावाचा वाढदिवस ग्राम परिवर्तन दिन साजरा करण्याचा | • ग्रामसभेततील निर्णयाची अंमलबजावणी या दिवशी गावातील सर्वात वयोवृध्द स्त्री पुरूषांचा ग्राम मातापिता समजून पूजन करायचे.<br>• एका वर्षातील गावात | • गावात एकतेची भावना वाढीस लागली.<br>• नवीन पिढीवर चांगले संस्कार होतात. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामसभेत निर्णय | आलेल्या सर्व जातीधर्माच्या नवीन सुना, नवजात बालके यांचे स्वागत.<br>• शाळेतील विद्यार्थ्यांनी, युवकांनी विविध क्षेत्रातील नैपुण्याबद्दल सन्मान<br>• एका मुला/मुलीवर कुटुंब नियोजन | |

राळेगणसिध्दीचा नकाशा



## राळेगणसिध्दी गाव




## आधुनिक राळेगणसिध्दी



www.alamy.com - BKXNB2

यादवबाबाच्या मंदिरात अण्णा हजारे



राळेगणसिध्दी मधील शेती



ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना मा. अण्णा हजारे



राळेगणसिध्दी गावातील उत्सव



राळेगणसिध्दी गावातील विकास कामे पाहणी करताना मा.अण्णा हजारे



राळेगणसिध्दी गावातील नागरिकांची मुलाखत घेताना संशोधक



राळेगणसिध्दी गावातील नागरिकांची मुलाखत घेताना संशोधक



राळेगणसिध्दी गावातील नागरिकांची मुलाखत घेताना



तलाठी दाखला.

तलाठी कार्यालय राळेगणसिद्धी
ता० पारनेर जि० अहमदनगर

मौजे : राळेगणसिद्धी येथिल एकुण क्षेत्र ९८२।३७ असुन त्यापैकी लागवडी लायक क्षेत्र ७७०।१४ हेक्टर व लागवडी अयोग्य क्षेत्र २।७२ हेक्टर आहे. यापैकी सरासरी क्षेत्र ४:- बागायती आहे. यापुर्वी म्हणजे पुर्वी फक्त जमिन महसुल आकारला जात होता परंतु त्यात आता बदल होऊन त्या महसुलानुसार सन खालील प्रमाणे कर आकारणी केला.

१) जमिन महसुल – ८००/-
२) रोहयो कर – ३१०/-
३) शिक्षण कर – १५८१/-
४) बिगरशेती कर – १४१६६/-

राळेगणसिद्धी एकुण क्षेत्रापैकी फॉरेस्ट १।८०
गायरान – ४।०० तलाव ५।३१
रस्ते व पाण्याचे पाट - २१।५४ रस्ते मार्ग व शिव
नव मार्ग व कालवे – व अकृषिक क्षेत्र १।१२
या प्रमाणे आहे
एवढे आहे.

ग्राम अधिकारी तथा तलाठी
(तलाठी)
मौजे ---- . ----
ता. पारनेर जि. अहमदनगर.

॥ ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे. ॥

॥ पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना राबवा गावचा विकास घडवा ॥

# ग्रामपंचायत कार्यालय राळेगण सिध्दी

ता. पारनेर, जि. अहमदनगर

| श्री. आर. के. कंदलकर | श्री. लाभेष गणपतराव औटी | श्रीम. मंगल वसंत पठारे |
|---|---|---|
| ग्रामसेवक | उपसरपंच | सरपंच |

जा. क्र.

दिनांक १६/११/२०१५

ग्रामपंचायत राळेगणसिध्दी ★ स्था. २७/२/१९५८ ★ ता. पारनेर, जि. अहमदनगर

शुभेच्छा पत्र :-

ग्रामसेवक ग्रामपंचायत राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अ. नगर यांजकडुन शुभेच्छा पत्र देण्यात येते की टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मुकुंदनगर गुलटेकडीचे विद्यार्थी श्री. जितेंद्र पी. भवमारे यांनी आज दि. १६/११/२०१५ रोजी ग्रामपंचायत राळेगणसिद्धीस भेट देऊन ग्रामविकासासंदर्भात चर्चा व प्रश्नावली तयार करुन संपुर्ण माहिती घेतली त्यांच्या भावी कार्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

| | |
|---|---|
| ग्राम अधिकारी तथा तलाठी | ग्रामसेवक |
| मौज-राळेगण सिध्दी. | ग्रामपंचायत राळेगणसिध्दी |
| ता पारनेर जि अहमदनगर | ता.पारनेर, जि.अहमदनगर |